शनिवार । १७ एप्रिल १९८२ । दीड रुपया

# माणूस



सबला : पृष्ठ....१०

## बापकमाई !

' मी कोटयाधीश म्हणून जन्माला आलो आणि कोटयाधीश म्हणूनच मरणारही आहे ', असे महाराष्ट्रातील इंदिरा कॉंग्रेसचे बंडखोर आमदार सुरेश जैन म्हणाल्याचे प्रसिद्ध झाले आहे. खरं म्हणजे या म्हणण्यात थोडी गफलत झालेली आहे. सुरेश जैन कोटयाधीश म्हणून जन्मास आले. जर ते खरेखुरे व्यापारी बच्चे असतील तर केवळ कोटयाधीश म्हणून मरण्यात कसला आला आहे पुरुषार्थ ? त्यांनी मरताना किमान अब्जाधीश असण्याची तरी महत्त्वाकांक्षा बाळगायला हवी. केवळ कोटयाधीश म्हणून सुरेश जैन मरू पहात असतील तर बापाच्या कमाईत मुलाने कसलीच भर घातली नाही, मुलगा बापकमाईवरच उडया मारत होता, असे लोक म्हणतील व व्यापारी समाजातही सुरेशभाईची मान त्यामुळे उंच राहणार नाही. तेव्हा लवकरात लवकर सुरेशभाईनी आपली बोलण्यातली चूक सुधारून घ्यावी व अब्जाधीश होण्यासाठी एस. टी. महामंडळ नाही तर दुसरे एखादे महामंडळ बळकावता येते का ते पाहावे. शिवाय यापुढे कोटयाधीश असणेही पुरेसे नाही. महागाई सारखी वाढत आहे. आमदारांच्या एकेका सहीसाठी, मतासाठी अधिकाधिक किंमत मोजावी लागणार ! तेव्हा कोटभर रुपये तसे कितीसे पुरे पडणार आहेत ? सध्याच फुटीर आमदार लाखा-दोन लाखांच्या खाली मिळत नाही. बाबासाहेब भोसल्यांच्या विरुद्धचे सुरेशभाईचे बंड यशस्वी व्हायचे तर दीड-दोनशे तरी सह्या त्यांना गोळा कराव्या लागतील ! करा हिशोब किती कोट रुपये लागतील हे बंड उभे करायला ! सुरेशभाईना अद्याप दोनमुद्धा सह्या गोळा करता आलेल्या नाहीत. आणि सह्या मिळाल्या म्हणजे त्या कायमच राहतील असेही नाही. एकदा केलेल्या सह्या खोडल्या जातात, दोन।दोन ठिकाणीही, एकाच वेळी सह्या देणारे महाभागही निघत असतात ! तेव्हा सुरेशभाईनी या राजकीय फंदात न पडणेच चांगले. राजकारणात पैसे लागतात ; पण पैशाची ताकद राजकारणात विशिष्ट मर्यादेपर्यंतच उपयोगी पडते. कोटयवधी रुपये हाताशी असूनही अंतुल्यांना शेवटी जावेच लागले. सुरेशभाई, तुम्ही तर काय ? अंतुल्यांचे केवळ मुनीम ! मुनिमाने बंडाचे निशाण वगैरे फडकवण्याची भाषा कशाला करावी ? कोटीचे अब्ज कसे होतील हे पाहावे. अंतुल्यांचे ताबूतही जेथे थंड पडले तेथे सुरेशभाईसारख्यांची काय कथा ! एखादी सार्वत्रिक निवडणूक जरी सुरेशभाईनी यापुढे जिंकून दाखवली तरी पुरे आहे.

—सं.

# चंदिगड मेळावा

बिगरकम्युनिस्ट विरोधी पक्षांचे ऐक्य साधण्यासाठी जनता, काँग्रेस (एस) लोकदल यांच्या संयुक्त मेळाव्याची घोषणा आणि चरणसिंग यांची सक्रिय राजकारणातून निवृत्तीची घोषणा या घटना एकाच वेळी घडल्याने, भारतीय राजकारणात सध्या असलेल्या नाट्यमयतेत भर पडली आहे. या दोन्ही घोषणा परस्परविरोधी वाटल्या तरी त्यात एक विशिष्ट नाते आहे. 'कारभार करणारे सरकार निवडून द्या' या घोषणेने निवडून आलेल्या इंदिरा सरकारची कृतिशून्यता, असहाय्यता यामुळे सामान्य जनतेचा अधिकाधिक भ्रमनिरास होत आहे. त्यामुळे कोणत्याही विचारी माणसाला विरोधी पक्षाचे हे ऐक्य लवकरात लवकर व्हावे असेच वाटते. ज्या पक्षांच्या ऐक्याची चर्चा गेले काही दिवस चालली आहे त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये तर ही भावना प्रबल राहिली आहे. कार्यकर्त्यांनी आपापल्या पातळीवर ही भावना प्रभावीपणे व्यक्त केल्याने संबधित पक्षाचे नेतेही ऐक्यास अनुकूल झाले.

तथापी ऐक्याचा मार्ग अपेक्षेपेक्षा अधिक काटेरी दिसू लागला आहे. ऐक्याची बोलणी सुरू झाल्यापासून मोरारजी, सुब्रह्मण्यम् स्वामी वगैरे जनतापक्षीय श्रेष्ठी व नुकतेच 'राष्ट्रीय नेते' झालेले शरद पवार, हे उच्च स्तरीय अनौपचारिक बैठकांमध्ये एक विचित्र अट सतत घालीत असतात. ती अट म्हणजे, चरणसिंग याची सक्रिय राजकारणातून निवृत्ती! या नेत्याच्या मते, चरणसिंग हे महत्त्वाकांक्षी आहेत, त्यामुळे नवीन पक्षाच्या अध्यक्षपदावर ते हक्क सांगतील. अजून अस्तित्वात यायच्या पक्षाच्या अध्यक्षासंबंधी असे विचार करणाऱ्या या नेत्याच्या राजकीय दूरदृष्टीची यावरून कल्पना यावी. अखेर चरणसिंग यानी आपली निवृत्ती जाहीर केली आणि 'माझ्याशिवाय समर्थ पर्यायी पक्ष करता काय, मग करा!' असे राजकीय आव्हान या नेत्याना दिले आहे. त्यावर त्याचे काय उत्तर असेल हे चंदिगड मेळाव्याने समजेलच; पण मुळातच ज्याना राष्ट्रीय राजकारणाचे वस्तुनिष्ठ भान आहे त्यांना, चरणसिंग वगळून इंदिरा काँग्रेसला समर्थ पर्याय कसा उभा राहणार, असा प्रश्न पडणे अपरिहार्य आहे. पूर्वग्रहदूषित वृत्तपत्रे आपला चरणसिंगविषयक राग, द्वेष कितीही हिरीरीने प्रगट करोत, चरणसिंग ही भारतीय राजकारणातली अशी शक्ती आहे की जिला टाळून राष्ट्रीय पातळीवरील पुनर्मांडणीसंबंधी काही विचार करणेच अशक्य आहे! महाराष्ट्रातील वर्तमानपत्रे व मध्यमवर्गीय वाचक चरणसिंग यांच्याविषयी जे विचार, प्रतिक्रिया व्यक्त करतात त्यांचा मागमूसही महाराष्ट्राबाहेर कुठे दिसत नाही. साऱ्या देशात इंदिरा-लाट असताना, सर्व वर्तमानपत्रे विरोधात असताना, चरणसिंग आपल्या पक्षाचे ४५ खासदार निवडून आणू शकतात आणि अशा चरणसिंगाना निवृत्त करण्यासाठी, ज्यांना आपापल्या राज्यातही काही किंमत नाही असे तथाकथित राष्ट्रीय नेते जिवाचा आटापिटा करीत आहेत. या 'राष्ट्रीय' नेत्याची भीती खरी आहे, असे गृहीत धरले तरी प्रश्न शिल्लक उरतोच की, व्यापक जनाधार, राजकीय शक्ती आणि काही ठोस, नवीन, राजकीय, आर्थिक विचारसरणी असलेला असा कोणता नेता आज आहे, की जो नव्या पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो? डोळे उघडे ठेवून राजकारण पाहणाऱ्या कोणाही माणसाला चरणसिंग हेच नव्या पक्षाचे अध्यक्ष म्हणून 'नॅचरल चॉइस' आहेत हे पटल्याशिवाय राहणार नाही! पण अगदी शरद पवारांपासून मोरारजीपर्यंत ज्यांच्या अनजस्टिफाइड ॲम्बिशन्स आहेत अशी मंडळी आपले पितळ उघडे पडू नये म्हणून चरणसिंगांना महत्त्वाकांक्षी म्हणून बदनाम करीत फिरत आहेत. मुंबई–पुण्याच्या प्रमुख वृत्तपत्राच्या संपादकांनी त्यांना अनुकूल वातावरण आधीच तयार करून ठेवले आहे.

आतासुद्धा चरणसिंगांच्या निवृत्तीच्या घोषणेवर विश्वास ठेवणे कठीण आहे, अशा आशयाचे अग्रलेख लिहून ही वृत्तपत्रे, मुख्य मुद्द्याला शिताफीने बगल देत आहेत. चरणसिंग निवृत्त होऊ नयेत, असे खरोखरच वाटणारे लाखो लोक या देशात आहेत. त्यांचा आवाज वर्तमानपत्राच्या कानी येऊन पोचू शकत नाही, यावर त्यांचा विश्वासच बसत नाही. त्यामुळे 'निवृत्तीचे नाटक' अशा शब्दात ते या सर्व प्रकारणाची संभावना करीत आहेत. चरणसिंग निवृत्तीचे नाटक करीत आहेत, असे म्हणताना मोरारजीनीही निवृत्त व्हावे, असा सल्ला मात्र ते मुळीच देत नाहीत.

काँग्रेस (एस्) वाल्यांचे एक बरे आहे. काँग्रेस हे 'पवित्र' नाव कायम ठेवून विरोधी पक्षामध्ये वावरण्याची संधी त्यांना मिळाली आहे; पण याचा अर्थ ते विरोधी पक्षात


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : सेहेचाळिसावा

१७ एप्रिल १९८२

किंमत : दीड रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

मनाने आहेत असे नव्हे. टांग मारणे हा त्यांच्या राजकारणाचा मूलाधार आहे ! ते कधी कुणाला टांग मारतील व कशी टांग मारली म्हणून वर फुशारकी मारतील, याचा नेम नाही. महाराष्ट्रात अनेकांना याचा अनुभव आला आहे; पण एवढ्या भाडवलावर राष्ट्रीय नेतृत्व करता येत नसते. गेले काही दिवस विरोधी पक्षांच्या ऐक्याची जी बोलणी चालली आहेत त्यात समाजवादी कॉंग्रेसचे नेते वारंवार परस्परविरोधी भूमिका घेत आहेत. याचे कारण त्यांना ' होमवर्क ' देण्यात आले आहे. या विरोधी पक्षांना आपसात झुंजत ठेवून त्यांची शक्ती कमी करा, यांच्यातल्या सामर्थ्यशाली नेतृत्वाचे प्रतिमाभंजन करून त्यांचा प्रभाव कमी होईल असे पाहा आणि एवढे करून आमच्याकडे या, तुमचे स्वागतच आहे. योग्य ती बक्षिसी मिळण्याचे आश्वासनही या होमवर्कबरोबर देण्यात आल्याने समाजवादी कॉंग्रेसचे नेते अधिक उत्साहात आहेत.

जनता पक्षात जे व्यापक जनाधार असलेले समजूतदार नेते आहेत त्यांना चरणसिंग काय आहेत, हे माहीत आहे; पण लोकांशी संबंध नसलेले, येन केन प्रकारेण प्रसिद्धी पुरुष झालेले अपस्टार्ट नेतेच चरणसिंगविरोधी अपप्रचार करीत असतात अशा परिस्थितीत विरोधी राजनीतीविषयी सीरियस असलेल्या या मंडळींच्या हाती जर नव्या एकत्रित पक्षाची सूत्रे गेली तर विरोधी राजकारणाचे भवितव्य खरोखरच अंधःकारमय होईल ! जॉर्ज फर्नांडिससारखे सीरियस नेते वेळीच या प्रकारापासून अलिप्त झाले, हे या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

म्हणूनच चंदिगड मेळाव्यातून देशात नवे उत्साहाचे वातावरण निर्माण करणारे काही निष्पन्न होईल, अशी शक्यता नाही.

— डॉ. रत्नाकर महाजन

# दूध आंदोलन :

## मंत्री, खासदार, आमदार ह्यांना सावधानतेचा जाहीर इशारा यापुढे निसटते, सटकते, मोघम, गुळगुळीत, फसवे बोलू नका !

आम्ही तरुण दूध–उत्पादक शेतकरी सर्व सत्तारुढ व विरोधी पक्षातील आमदारांना व खासदारांना असे आवाहन करतो की, गेल्या दोन-अडीच वर्षांपासून शेतकरी संघटनेने शेतीमालाला भाव वाढवून मिळावेत ह्यासाठी जी आंदोलने केली त्याबाबत आतापर्यंत एकाही आमदाराने किंवा खासदाराने वा मंत्र्याने ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत तोंड उघडले नाही. तोंडात एक व पोटात एक, गावी आल्यावर एक व मुंबईला गेल्यावर एक, अशी दुटप्पी भाषा आपण सर्वांनी आजपर्यंत केलीत. आजपर्यंत आमच्या भोळ्या-भाबड्या आई-वडिलांच्या हे आपले कुटिल डावपेच लक्षात आले नाहीत. वास्तविक तुम्ही सर्व मंडळी आमच्या जातीचे, आमच्या रक्ताचे, आमच्या जिवावर मोठे झालेले, परंतु मुबईला गेल्यावर शेतकऱ्यांवर लाठ्या, गोळ्या, चालविणाऱ्या सरकारच्या लूटमारीच्या कारस्थानात सामील होत गेलात व कृतघ्नपणाचा कळस केलात. स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली ३४ वर्षे आमच्या आजोबांनी, आई-वडिलांनी, बहिणींनी फुकट मजुरी केली, फुकट शेण-पाणी केले, त्यांना राबवून घेतले व सरकारने ते सर्व लुटून नेले.

तेव्हा येत्या काही दिवसात आपण दूध आंदोलनाविषयी व भाव वाढवून मिळावेत ह्याविषयी आपले जाहीर मतप्रदर्शन करावे. जर आपण सत्तेवर राहून शेतकऱ्यांच्या अन्नात विष कालविण्याचा किंवा त्यांच्या जिवांशी खेळण्याचा प्रयत्न करीत असाल तर एकाही आमदाराला, खासदाराला किंवा मंत्र्याला आमदारकी, खासदारकी व मंत्रीपद उपभोगण्याचा हक्क पोहचत नाही. कारण तुमची ही कुटिल कारस्थाने व नाटके आता आमच्या तरुण मंडळीच्या लक्षात आलेली आहेत.

यापुढे मोघम, निसटती, सरकती, गुळगुळीत, फसवी, लाघवी, लोचट, निर्लज्ज भाषा करू नका. आमच्या जिव्हाळ्याच्या व जीवन-मरणाच्या प्रश्नावर स्पष्ट बोला व कृती करा. पोटात एक, तोंडात एक, ओठात एक, हे आता चालणार नाही. ही आपणास शेवटची संधी आहे, हे लक्षात ठेवा.

आपण सर्व आमदारांनी, खासदारांनी व मंत्र्यांनी ह्या विषयी जाहीर मतप्रदर्शन न केल्यास पुढे येणाऱ्या सर्व परिस्थितीबाबत तुम्ही जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार व मंत्री जबाबदार राहाल, हे आम्ही आज जाहीर करतो.

टीपः—हे पत्रक ज्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हातात पडेल त्या कार्यकर्त्यांनी ह्या पत्रकाच्या १००० ते १५०० प्रती काढून वाटाव्यात.

## शेतकरी संघटनेचा विजय असो !

प्रकाशक — माधवराव खंडेराव मोरे

## पुणे वार्ता

# मैत्री करारांचा धोका

तुम्हाला 'मैत्री–करार' म्हणजे काय माहीत आहे? माहीत असेल तर प्रश्नच नाही. नसेल तर वाईट वाटायला नको. कारण एक तर आपल्या पुण्यात हा प्रकार नवीन आणि सध्या तरी ऐकीवच आहे. ज्या मैत्री करारा-बद्दल आपण पूर्णपणे अज्ञानात होतो ते हे मैत्री करार गुजराथमध्ये मात्र सर्रास, म्हणजे महिन्याला सुमारे आठशे, या प्रमाणात होतात. गुजराथमध्ये पसरलेलं हे लोण कालातराने मुबईमार्गाने पुण्यात दाखल होणार, हे उघडच आहे. तरीसुद्धा मैत्री–करार म्हणजे नक्की काय प्रकार आहे, हा मूलभूत प्रश्न मात्र रहातोच.

पुणेकर सभ्य स्त्री–पुरुषाना या कराराचा धोक्याचा कंदील दाखवण्यासाठी युनिव्हर्सिटी वुमन्स असोसिएशनने गेल्या ७ एप्रिलला एक कार्यक्रम आयोजित केला होता. गरवारे कॉलेजच्या लायब्ररी हॉलमध्ये सध्याकाळी बरोबर सहा वाजता हा कार्यक्रम सुरू झाला. मैत्री–करारावद्दल कायदेशीर दृष्टिकोनातून तज्ज्ञानी केलेली चर्चा, असं कार्यक्रमाचं स्वरूप होतं. न्यायमूर्ती शेलार, अॅड. बी जी. कर्णिक आणि अॅड. सुप्रिया सरवटे यानी चर्चेत भाग घेतला. सुप्रिया सरवटे यांनी चर्चेचं संचालन केलं.

'पती, पत्नी और वो' मधल्या 'वो' ला कायदेशीर मान्यता मिळवून देणारा हा कायदा आहे आणि या कराराचं वैशिष्ट्य म्हणजे, करार करणारा पुरुष, त्याची बायको आणि मुलं, मैत्रीण आणि तिची मुलं या सर्वांचं भवितव्य या करारात गुरफटलं आहे, अशा शब्दात सरवटेबाईनी कराराचं महत्त्व सांगितलं. कराराची पूर्ण कल्पना येण्यासाठी पांचाल (वय ३२) आणि पटेल (वय २७) यांनी २४ जानेवारी १९८१ रोजी केलेल्या कराराची रजिस्टर्ड लेखी प्रत उदाहरणा-दाखल घेतली होती. विवाहबाह्य मैत्रीत कायदेशीर आडकाठी नको, म्हणून हा करार केला आहे. यातल्या काही अटी खालील-प्रमाणे होत्या–

१) या कराराची मुदत २ वर्षे असून या अवधीत करारबद्ध स्त्री–पुरुष प्रेम करतील.

२) स्त्रीच्या दैनंदिन खर्चाची तरतूद म्हणून बँकेत ३६००० रु. ठेवले जातील. त्यातील दरमहा १५०० रु. काढायची तिला परवानगी आहे.

३) कराराच्या अवधीत झालेल्या मुलाची काळजी घेणे ही पुरुषाची नैतिक जबाबदारी राहील.

या व यासारख्या अनेक बारीक–सारीक अटी या करारपत्रात होत्या

या लेखी कराराबाबत बोलताना श्री. शेलार म्हणाले, 'या कराराचं मूळ आहे अमर्याद, अतिरेकी पैशात. अहमदाबादमधल्या व्यापाऱ्याना पैशाचं काय करायचं, हा प्रश्न आहे. या पैशामुळे त्यांचे शौक वाढले. स्वतः-च्या चैनीसाठी या विवाहबाह्य संबंधाना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याची कल्पना निघाली असावी. असे रजिस्टर्ड लेखी करार करून गैरसंबंधांना राजमान्यता मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे. या करारात स्त्रीचं स्थान रखेलीचं आहे. या स्त्रियाची संतती अनौरस ठरणार आहे. त्यामुळे गरीब मुलीची ही शुद्ध फसवणूक आहे.'

'हुंडा पद्धतीमुळे हे सुटसुटीत करार करा-यला स्त्रिया प्रवृत्त होतात का?' या प्रश्नाला उत्तर देताना अॅड बी. जी. कर्णिक म्हणाले, 'हे खोटं आहे. हुंड्याची अनिष्ट रुढी फक्त गुजरायमधेच आहे का? स्त्री–स्वातत्र्याची लाट, नैतिक अवमूल्यन आणि अमर्याद पैसा, हेच या कराराच्या मुळाशी आहे.'

चर्चेचा समारोप करताना ते म्हणाले, 'करार करावेत की करू नयेत, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. विवाहबाह्य संबध पूर्वी-पासून आहेत. पण त्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे घातक आहे. भारतीय संस्कृतीत लग्न हा प्रेमाधिष्ठित संस्कार आहे, करार नाही. या कराराचे परिणाम अनिष्ट आणि भेसूर आहेत. मांगल्याकडून अमागल्याकडे नेणारी ही विषवेल वेळीच काढून टाकायला हवी.'

मैत्री करार का होतात? याचा विचार चर्चेत नीटसा झाला नाही. त्याला काही अन्य कारणे असतील का? या प्रश्नांची चर्चा व्हावी असं श्रोत्यांना वाटत होतं. पण या लोकांचं प्रमाण अगदीच नगण्य. बहुते-काची भूमिका दंडुके घेतलेल्या संस्कृतीसंर-क्षकांचीच होती आणि तीच योग्य आहे. कारण अशी फसवणूक करणाऱ्या करारांना तरुण आणि मध्यमवयीन स्त्रिया सहज बळी पडत आहेत. बरं, या मागे काही वैचारिक तात्त्विक बैठक असेल तर तेही नाही. दोन-तीन वर्ष एखाद्या पुरुषाची रखेली म्हणून रहाण्यात जर स्त्रियांना मुक्तता लाभत असेल तर नाइलाज आहे. या दोन-तीन वर्षांत स्त्री–पुरुषाची जी मानसिक–भावनिक गुतवणूक होईल त्याचा विचारच या करारात केलेला नाही. वेश्या व्यवसायाला कायदेशीर मान्यता मिळवून देणारे हे करार आहेत, यात शंकाच नाही.

मैत्री–करारावद्दल चर्चा घडवून आणून संयोजकानी जो धोक्याचा कंदील दाखवला त्याबद्दल पुणेकर त्याचे आभारी राहतील. चर्चा कशी असावी, याचं हे उत्तम उदाहरण होतं. कारण चर्चा करताना आणि ऐकताना वक्ते आणि श्रोते, दोघाचेही चेहरे चक्क प्रसन्न दिसत होते. वक्त्यांनी केलेले विनोद (कधी सहज, कधी मुद्दाम) श्रोत्यांना कळत होते. या गोड औषधाचा परिणाम कसा काय होतो ते पाहूच.

पुणेकरानी या करारानं घाबरून जायचं कारण नाही. कारण अजूनही इथे वटसावि-त्रीच्या पूजा धुमधडाक्याने साजऱ्या होतात. हे चांगलं की वाईट हे ज्याचं त्याने आणि तिनं ठरवावं. पश्चिमेकडून भारतात येणाऱ्या वाऱ्याबरोबर वाहूनच जायला पाहिजे, असं नाही. या चर्चांच्या निमित्ताने या वाऱ्याला विचारपूर्वक दिशा दाखवणे आपल्याला सहज शक्य आहे.

–मेधा देशपांडे

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# फॉकलँडचा संघर्ष

## सार्वभौमत्वाचे निकष कोणते?

वा. दा. रानडे

फॉकलंड बेटावर अर्जेंटिनाने आपल्या नाविक बोटी पाठवून ते ताब्यात घेतले. त्यातून ब्रिटन आणि अर्जेंटिना यांच्यात निर्माण झालेल्या संघर्षाने एल साल्व्हाडोर, पोलंड हे प्रश्न काहीसे मागे पडले. बेटे पुनः आपल्या ताब्यात घेण्यासाठी इंग्लडनेही आपल्या नाविक बोटी फॉकलंडकडे पाठविल्या. बेटापासून दोनशे मैल अंतरापर्यंतचे क्षेत्र युद्धक्षेत्र म्हणून जाहीर केले. या प्रश्नावर युद्धास आपली तयारी आहे असे अर्जेंटिनानेही जाहीर केले. यातून लष्करी संघर्ष होऊ न देता प्रश्न शांततेने व वाटाघाटीच्या मार्गाने सोडवावा असे प्रयत्न अमेरिकन परराष्ट्रमंत्री हेग यानी सुरू केले. लंडन, ब्यूनोस आयरेस व पुन: लंडन अशा वाऱ्या त्यानी केल्या. त्याना कितपत यश येते याचा निर्णय हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत लागलेलाही असेल ! येथे फक्त या प्रश्नाची पार्श्वभूमी व त्या अनुरोधाने काही विचार मांडीत आहे.

या छोटया बेटांचा प्रश्न अनेक दृष्टीनी गुतागुतीचा आहे. दक्षिण अटलांटिकमध्ये अर्जेंटिनापासून ६०० मैल अंतरावर आणि इंग्लंडपासून ४००० मैल अंतरावर ही बेटे आहेत. जॉन डेव्हिड यांनी १५९२ मध्ये या बेटाचा शोध लावला. ब्रिटनची साम्राज्यसत्ता असताना त्याने ही बेटे जिंकून आपल्या साम्राज्याचा भाग बनविला. ब्रिटनने लष्करी बळावरच ही बेटे जिंकलेली असल्याने, आता आम्ही त्याच मार्गाने ती ताब्यात घेतली तर त्यास हरकत घेण्यास ब्रिटनला कोणताही अधिकार नाही, असे अर्जेंटिनाचे म्हणणे आहे. ब्रिटनला तार्किक उत्तर म्हणून ते ठीक असले तरी शांततेचे व वाटाघाटीचे सर्व मार्ग संपल्यावर अर्जेंटिनाने हा मार्ग अवलंबणे समर्थनीय झाले असते.

ही बेटे इंग्लंडने लष्करी बळावर जिंकली असल्याने इंग्लंडचा त्यांच्यावर हक्क नाही. बेटाचे भवितव्य तेथील लोकानीच ठरवावे हा लोकशाही मार्ग होय; पण ही सूचना अर्जेंटिनास मान्य होणार नाही. कारण बेटांवर वस्ती १८०० असून ते सगळे ब्रिटिशच आहेत. जनमताचा कौल घेतल्यावर तो ब्रिटनच्याच बाजूने लागणार हे उघड आहे. म्हणून बेटाचे भवितव्य ठरविण्याचा हा निकष अर्जेंटिनास मान्य नाही. ऐतिहासिक व भौगोलिक निकष लावून बेटाचे भवितव्य ठरविले पाहिजे अशी त्याची मागणी आहे. अर्जेंटिना व फॉकलंड बेटे पूर्वी स्पॅनिश साम्राज्याचा भाग होते. स्पेनची सत्ता गेल्यानंतर फॉकलंड बेटे स्वाभाविकपणेच अर्जेंटिनाचा भाग होतात असा अर्जेंटिनाचा दावा आहे.

या छोटया बेटांचे भवितव्य ठरविताना ऐतिहासिक घटकाचा जरूर विचार करायला हवा; पण त्याचबरोबर ज्या प्रदेशावर हक्क सांगायचा तेथे हक्क सांगणाऱ्या देशाचे लोक रहात असले पाहिजेत. त्याचा एकही माणूस येथे रहात नाही. मग हा प्रदेश या देशाचा कसा म्हणावयाचा असा युक्तिवाद करायला मग जागा रहात नाही. या संदर्भात आठवण होते ती काश्मीरच्या अक्साईचिन भागावर चीनने सांगितलेल्या दाव्याची. येथे एकही भारतीय रहात नाही, झाडाचे एक पान उगवत नाही असे या प्रदेशाचे वर्णन करण्यात आले होते आणि पंडित नेहरूनीही ते मान्य केले होते. चीनने त्या प्रदेशातून तिबेट आणि सिंकियांग या आपल्या दोन प्रांताना जोडणारा जवळचा रस्ताही काढला होता आणि हा आपलाच प्रदेश असल्याचा दावा केला होता. सार्वभौमत्व नुसते तार्किकदृष्टया सिद्ध करून चालत नाही. ते प्रत्यक्षात प्रस्थापित करावे लागते. त्या प्रदेशावरचा आपला हक्क व अस्तित्व तेथे वस्ती करून सिद्ध करावे लागते. अक्साईचिनच्या बाबतीत आपण ते केले नाही आणि फॉकलंड बेटांच्या बाबतीत अर्जेंटिनाची हीच चूक झाली; पण म्हणून ब्रिटनचा त्या बेटावरचा दावा समर्थनीय ठरत नाही. ब्रिटिश रहिवासी तरी तेथे आले कसे ? ब्रिटनने बेट जिंकून घेतल्यानंतरच ते तेथे गेले. तेवढयामुळे ती बेटे त्याची होत नाहीत.

ब्रिटिशापूर्वी डचांनी ही बेटे प्रथम जिंकली होती. नंतर फ्रेंच आले व त्यानंतर ब्रिटिशांच्या ताब्यात ती गेली. युरोपातील हे लोक तेथे येण्यापूर्वी आदिवासी तेथे होतेच. त्याचे काय? या बेटाचे भवितव्य ठरविण्यात त्यांना काहीच स्थान नाही का हा प्रश्नही उपस्थित होतो.

ब्रिटन आणि अर्जेंटिना यांच्यातील या संघर्षात रशिया अर्जेंटिनाच्या बाजूस आहे. कारण अर्जेंटिनात लष्करी हुकुमशाही असली तरी अमेरिकेने रशियाच्या अफगाणिस्तानातील लष्करी हस्तक्षेपाच्या निषेधार्थ त्यांची धान्यमदत काही काळ बंद केली. तेव्हा अर्जेंटिनानेच रशियाला धान्य पाठविले होते.

बेटावरील आपला दावा टिकणार नाही याची ब्रिटनला कल्पना आलेली आहे. बेटांवर अर्जेंटिनाचे सार्वभौमत्व मान्य करण्यात येईल; पण प्रत्यक्ष कारभार ब्रिटनने पहावा अशी एक सूचना मांडण्यात आली. बेटे दोन्ही देशांच्या संयुक्त नियंत्रणाखाली असावी अशीही एक सूचना पुढे आली. अर्जेंटिनाने या दोन्ही सूचना फेटाळल्या आहेत. या बेटांवर ब्रिटनचे सार्वभौमत्व अंशतः मान्य करण्याची अर्जेंटिनाची तयारी नाही. तसेच कारभार ब्रिटनने पाहणेही त्यास मान्य नाही पण तेथील ब्रिटिशांच्या हक्काचे, हितसंबंधाचे काय ? तेल कसे सुरक्षित राहील ? याची ब्रिटनला चिंता आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना याबाबतीत काही तोड काढू शकणार नाही का ? ही बेटे काही काळ यूनोच्याच नियंत्रणाखाली द्यावी, दरम्यानच्या काळात वाटाघाटी चालू ठेवून उभय संमत तोड काढावी अशीही सूचना करण्यात येत आहे. वाटाघाटीना अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी अर्जेंटिनाने बेटांवरील फौजा काढून घ्याव्या, ब्रिटननेही आपल्या नाविकदलाच्या बोटी मागे घ्याव्या हे दोन्ही बाजूनी मान्य करायला हवे. बेटावरील ब्रिटिश रहिवाशाचे हक्क व हितसंबंध सुरक्षित राहतील याची हमी अर्जेंटिनाचे अध्यक्षानी दिली आहे. ती प्रत्यक्षात पाळली जाते की नाही यावर यूनोची देखरेख असावी असेही सुचविण्यात येत आहे.

फॉकलंट बेटांजवळच्या समुद्रात तेल व इतर खनिजे सापडण्याची शक्यता आहे. सध्याच्या तेलटंचाईच्या दिवसांत त्यामुळे या बेटाचे महत्त्व वाढले आहे. त्यासाठीच बेटावरील आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याची घाई अर्जेंटिना करीत आहे. ही बेटे त्यामुळेच संघर्षक्षेत्र झाली आहेत. संघर्ष मिटवून या भागात शातता प्रस्थापित करण्यासाठी दक्षिण अमेरिकन राष्ट्रानी शांततादल ठेवावे अशी सूचना पनामाने केली आहे. बेटावरच्या सार्वभौमत्वाच्या या वादातून मोठा संघर्ष होऊ न देता वाटाघाटीनीच त्यातून मार्ग काढण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे हीच जगातील शांतताप्रिय जनतेची या प्रश्नाचे बाबतीत अपेक्षा आहे. □

उत्तरमीमांसा : ४६ :

स. शि. भावे

# दोन नंबरची सोपी वाट

मित्र सांगत होता...

'काल प्रथमच काळ्या बाजारात तिकिटं काढून सिनेमा पाहिला.'

माझा विश्वास बसला नाही. कारण मित्र 'स्वच्छ' कंपनीपैकी होता.

'तुला खरं वाटत नाही ना? जयंताला विचार. तो होता काल बरोबर. त्यानंच तर पटवून दिलं मला की, काळा बाजारच स्वस्त पडतो.'—मित्र.

'कसा काय स्वस्त पडतो?' माझा अविश्वास. त्याला विरोधाची धार.

'म्हणजे बघ. 'अप्सरा'शी आम्ही दोनलाच गेलो. तर बाहेर हाउस–फुलचा बोर्ड. सारी फाटकं बंद. आधी बुकिंग केलं असतं तर अशी पाळी आली नसती, असं मी जयंताला खडसावलं. तर तो कसा म्हणतो—'एवढा घाबरतोस कशाला? मिळतील तिकिटं.'

'चारचे दहा, चारचे दहा' असं कुजबुजत अनेक लहान मुलं आम्हाला घसटून जात होती.

'ब्लॅकनं नको बाबा', मी जयंताला म्हटलं. तशी जयंता म्हणाला, 'खुळा की काय, दहा कोण द्यायला बसलाय. मी तर सात रुपयाच्यावर नवा पैसा देणार नाही.'

'पण सात तरी का द्यायचे?' मी (म्हणजे मित्राने) विचारले. 'त्यापेक्षा आपण परत जाऊ आणि घरी जाऊन झोप काढू.'

'वेडाच आहेस. इतकं लाब तणत आल्यावर तसंच परत जायच होय? ते शक्य नाही.' जयंता म्हणाला. 'आणि असं बघ. एकूण विचार केला तर हे सात सात रुपयेच स्वस्तात पडतील.'

मित्राच्या चेहऱ्यावर (आत्ता माझ्या चेहऱ्यावर होता तसाच) अविश्वास. तो पाहून जयता सागू लागतो...

'आता आपण रिक्षानं परत जाणार, म्हणजे झाले चार रुपये. मग उद्या बुकिंगला जाण्या–येण्याचे बसचे दोन रुपये. शिवाय उद्या किंवा परवा पुन्हा सिनेमाला येण्या-जाण्याचे आठ रुपये. म्हणजे एकूण किती झाले? तर चौदा.'

'शिवाय आपण आता आलो ते चार. आणि तिकिटाचे आठ.'—मित्र.

'बरोबर. म्हणजे सव्वीस झाले. म्हणजे ज्या सिनेमाला आठ आणि आठ सोळा पडायचे, त्याला दहा रुपये जास्त पडले. शिवाय दोन दिवस जा-जा ये-ये. शिवाय बुकिंगसाठी उन्हात दोन दोन तास उभं राहायचं म्हणून दहा जास्ती देण्याऐवजी सहा जास्ती देणं बरं!' जयंताने समारोप केला. आणि सात सात रुपयांत तिकिटं खरीदली. असा आम्ही ब्लॅकमध्ये सिनेमा पाहिला आणि चार रुपये, आणखी एक दिवस आणि दगदग, असं सारं वाचवलं.'

मित्राचे म्हणणे मला पटत नव्हते. म्हणून मी छेडले. 'पण हा गैरव्यवहार झाला, असं नाही का तुला वाटत? भ्रष्टाचार संपला पाहिजे, असं तूच जिथे-तिथे सागत असतोस. तुझं असं सिनेमा पाहणं हे भ्रष्टाचाराला उत्तेजन नव्हे का?'

मित्र क्षणभर शांत राहिला. बहुधा तो आपले विचार जुळवीत असावा, मग म्हणाला,

'हा भ्रष्टाचार आहे, असं मलाही पूर्वी वाटत असे; पण आता असं वाटतं की, एक तर हा भ्रष्टाचार नव्हे, तर केवळ पर्यायी आचार आहे. आणि भ्रष्टाचार मानला, तरी तो चालूच राहणार. Because it is socially functional. सिनेमाची तिकिटं काळ्या बाजारात विकणारी ही मुलं आवश्यक सामाजिक मध्यस्थाचं काम करीत असतात.'

'गाढवाचं नाव गोपाळशेठ, असं करतो आहेस तू.'—मी.

'तूच वस्तुस्थितीकडे डोळेझाक करतो आहेस', मित्र म्हणाला, 'असं पहा, तुला दिवसभर काम आहे. तू तुझ्या नोकराला बुकिंगच्या रांगेत उभं राहायला पाठवतोस ना; तो तसा दोनदोन तास उभा राहतो. मग रात्री तुम्ही ऐटीत 'हाउसफुल्ल' ची पाटी मागे टाकीत शेवटच्या क्षणी थिएटरात प्रवेशता.'

'त्या कामाबद्दल मी बक्षिशी देतो त्याला.' मी माझा निःस्पृह बाणा दाखविला,

'किती देतोस?'

'कधी पाच, कधी दहासुद्धा. थिएटर किती लांब आहे, किती वेळ वाट पाहावी लागली, गर्दी किती होती, असा सगळा विचार मी करतो.'

—मी माझा मानवतावादी, उदार दृष्टिकोण विशद केला.

'पाच म्हण. दहा म्हण. म्हणजे एकूण तू तिकिटांसाठी दर्शनी किंमतीपेक्षा जास्त पैसा देतोस.'—मित्र.

'होय. त्या नोकराच्या श्रमाचे ते पैसे असतात.'—मी.

'ही पोरंदेखील तुझे नोकरच समजायचे, फक्त न नेमलेले. ही पोरं रांगेत उभी राहतात. नंतर आपल्या श्रमाचे जास्त पैसे घेऊन तिकिटं विकतात. तुझा नोकर जाणं जर वाईट नाही, तर या पोरांनी तेच काम करणं वाईट कसं?' मित्राच्या आवाजात आव्हान होतं.

'पण ते श्रम करीत नाहीत. ते बुकिंग क्लार्कला जादा पैसे देऊन तिकिटं लाटतात, श्रम करून नव्हे.' मी माझ्या मताने योग्य फरक केला होता.

'तू काय, आणखी इतर श्रीमंत लोक काय, स्वतःचा जादा पैसाच वापरीत असता.'

'तो कसा?'

'तुमच्याजवळ जास्त पैसा असतो, म्हणून तुम्ही खाजगी नोकर ठेवू शकता. किंवा कचेरीतील इतर नोकराना किंवा गरजू लोकाना बक्षिसी देऊ शकता. ते कष्ट करतात आणि तुम्ही तुमचे सुख, तुमचा आराम जास्त पैशानं विकत घेता.'—मित्राने ठणकावून सागितले.

'आमच्याजवळ काही उधळायला जास्त पैसा नसतो. आमच्या अभिरुचीप्रमाणे आमचा खर्च असतो.' माझे जरा चिडके समर्थन.

'याचा अर्थ इतकाच की, तुमची अभिरुची तुम्हाला परवडते. बाल्कनीतल्या फोम लेदरच्या खुर्च्यांवर बसायला गरिबांना काय आवडणार नाही? पण त्यांना ते परवडत नाही. म्हणून ते लोअर स्टॉलचं तिकिट काढतात. सिनेमाला येता-जाता सायकल किंवा पाय वापरतात, मध्यन्तरात आइस्क्रिम किंवा थंड पेय न घेता चणेडाळ, भजी घेतात.

पृष्ठ...२९ वर

अवतीभवती । शरद कृष्णन्

# तेलगु देशम् : आंध्रमधील इंदिराविरोधी प्रादेशिक पक्ष

विख्यात तेलगू अभिनेते एन्. टी. रामाराव यांनी तामीळनाडूमधील अण्णा डी एम के पक्षाच्या धर्तीवर एक नवीन प्रादेशिक पक्ष स्थापन केला असून, आपल्या या नवीन पक्षाच्या वतीने ते आंध्र प्रदेशात निवडणुका लढवणार आहेत. दक्षिण भारतामधील चार राज्यांपैकी आंध्र प्रदेश व कर्नाटक या दोन राज्यात इंदिराजीच्या पक्षाचे प्रचंड वर्चस्व आहे. केंद्रस्थानी सत्तेवर आल्यापासून इंदिराजीनी आंध्र प्रदेशात आपल्या मनाप्रमाणे दोन मुख्यमंत्री बदलले. डॉ. चेन्ना रेड्डी याना हलवून श्री. टी. अंजय्या याना मुख्यमंत्री करण्यात आले. प्रचंड संख्याबळ पाठीशी असूनही अंजय्या याना राज्य करता आले नाही. अगदी अलीकडे त्याचीही उचलबागडी करण्यात आली असून ज्याच्याबद्दल जराही अपेक्षा नव्हती त्या श्री. बी वेंकटराम यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्यात आले. अंतर्गत गटबाजीने इंदिरा कॉंग्रेस पक्ष पुरता पोखरून निघाला असून नवीन मुख्यमंत्र्यांनाही स्वपक्षीय कारस्थानाचा जास्त त्रास होतो. अगदी अलीकडेच झालेल्या राज्यसभा निवडणुकीमध्ये श्री. हशिम हे राज्यामधील माजी गृहमंत्री पराभूत झाले. हशिम याची निवड स्वत: इंदिराजीनी केली होती. कोणत्या ४५ आमदारानी त्याना आपली प्रथम क्रमाकाची मते द्यायची हेही निश्चित करण्यात आले होते. या ४५ आमदारांमध्ये प्रामुख्याने डॉ. चेन्ना रेड्डी, टी. अंजय्या या दोन माजी मुख्यमंत्र्यांच्या समर्थकाचा समावेश होता. पक्षाचा आदेश असूनही यापैकी बहुसंख्य आमदारानी हशिम याना आपली मते दिली नाहीत. परिणामी हशिम पराभूत झाले. याउलट विरोधी पक्षानी पाठिंबा दिलेले जनता पक्षाचे बाबूल रेड्डी यांना २८ मते अपेक्षित असताना प्रत्यक्षात प्रथम क्रमाकाची ५६ मते पडली. पक्षाचा आदेश गुडाळून ठेवून पक्षाच्या २४ आमदारांनी आपले पहिल्या क्रमाकाचे मत चक्क विरोधी पक्षाला बहाल करून टाकले. केवळ संख्याबळाच्या सामर्थ्यावर सुस्थिर राज्य करता आले असते, तर आंध्र प्रदेशात इंदिरा कॉंग्रेसला आपले पाय मजबूत रोवता आले असते; पण आज परिस्थिती अशी दिसते की, आमदाराचा ताफा पाठीशी असूनही इंदिरा कॉंग्रेसला राज्यात आपला म्हणावा तसा प्रभाव पाडता आलेला नाही. डॉ. चेन्ना रेड्डी व टी. अंजय्या याचे काय करायचे असा प्रश्न असतानाच, टी. अंजय्या यानी थोडया-फार पक्षविरोधी कारवाया करण्यास प्रारंभ केला आहे. चेन्ना रेड्डी याना काहीसे त्याच्या मर्जीविरुद्ध राज्यपाल पद देऊ करण्यात आले असून, पंजाबचे राज्यपाल म्हणून ते लवकरच सूत्रे हाती घेतील, अशी अपेक्षा आहे. राज्यामधील इंदिरा कॉंग्रेस पक्ष पूर्ण विस्कळीत झाला असताना आणि नवीन मुख्यमंत्री आपल्या मंत्रिमंडळाचा कोणताही ठसा उमटवू शकत नसताना, एक प्रचंड लोकप्रिय असलेला फिल्मी-सितारा एन्. टी. रामाराव नवीन प्रादेशिक पक्षाचा झेंडा घेऊन उभा राहिला आहे. एम्. जी. रामचंद्रन या तामीळ अभिनेत्याने ज्या पद्धतीने राज्य पातळीवर आपला पक्ष यशस्वी करून दाखवून राज्याची सत्ता संपादन केली आहे, त्याचप्रमाणे आपणही आंध्र प्रदेशामध्ये यश मिळवू, अशी श्री. रामाराव यांची अपेक्षा आहे.

आज साठ वर्षांची उमर असलेले रामाराव तेलगू चित्रसृष्टीमधील एक विलक्षण लोकप्रिय कलावंत आहेत. त्यांच्या चाहत्यांचे सुमारे ९०० क्लब्ज् असून आंध्र प्रदेशाच्या सर्व भागात ते विखुरलेले आहेत. आजवर त्यानी सुमारे १८० चित्रपटामध्ये भूमिका केल्या असून असंख्य पौराणिक चित्रपटातून राम व कृष्णाच्या भूमिका केलेल्या आहेत. पौराणिक चित्रपटामधील भूमिकामुळे त्याना खेडयापाडयामधील गोरगरीबांमध्येही दांडगी लोकप्रियता मिळवता आली आहे. इंदिराजींच्या राज्यामध्ये खऱ्या जमातीला दुय्या भावाने वागवले जाते अशी सतत तक्रार केली जाते. या जमातीची एक इंदिराविरोधी लॉबी राज्यामध्ये तयार होत असून या लॉबीचे नेतृत्वही श्री. रामाराव याच्याकडेच आहे. रामाराव यानी नवीन पक्ष स्थापन करताच इंदिरा कॉंग्रेसच्या चार आमदारानी आपल्या पक्षाचा राजीनामा देऊन तेलगू-देशम् या नवीन पक्षामध्ये प्रवेश केला आहे. या चार आमदारांमध्ये दोन हरिजन आमदाराचा समावेश आहे. खेरीज, एक दुय्यम मंत्री व रामाराव याचे जामात एन्. चद्राबाबू नायडू व मुख्यमंत्री पदाचे एक इच्छुक उमेदवार व खामा जमातीचे एक प्रमुख नेते एन्. भास्करराव यानीही इंदिरा कॉंग्रेसला राम राम ठोकला असून रामाराव यानी स्थापन केलेल्या नवीन प्रादेशिक पक्षामध्ये प्रवेश केला आहे. भास्करराव हे इंदिरा कॉंग्रेसचे कट्टर समर्थक होते आणि गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये त्यानी इंदिरा कॉंग्रेस पक्षासाठी झटून काम केले होते. तथापि व्यक्तिश: आपली व आपल्या जमातीची उपेक्षा होते, या भावनेने त्यानी पक्षत्याग केला असून रामाराव याच्या नवीन पक्षामध्ये प्रवेश केला आहे. भास्करराव यांना त्याच्या स्वत:च्या जिल्ह्यात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीमध्ये दूर ठेवण्यात आले. विजयवाडा महानगरपालिकेमध्ये इंदिरा कॉंग्रेस पक्षाला पराभव पत्करावा लागला, यामागे भास्करराव यांची उदासीनता, हे एक प्रमुख कारण आहे.

नवीन स्थापन झालेला तेलगू देशम् हा पक्ष प्रादेशिक भावनेला फुंकर घालून आपला जम बसवण्याच्या प्रयत्नात आहे. अगदी अलिकडेच 'एनाडू' या तेलगू दैनिकाला श्री. रामाराव यांनी जी मुलाखत दिली, त्या मुलाखतीवरून नजर टाकली तरी नवीन पक्षाचे धोरण स्पष्ट होते. तेलगू भाषिक जनतेला एकत्र आणण्यासाठी व दिल्लीमधील सत्ताधाऱ्यांकडून आंध्र प्रदेशामधील नेत्याना जी हिण-

कस वागणूक दिली जाते त्याला आव्हान देण्याच्या हेतूने आपण हा पक्ष काढत असल्याचे त्यांनी या मुलाखतीमध्ये सांगितले आहे. या नवीन पक्षाचे पहिले अधिवेशन गेल्याच सप्ताहामध्ये हैद्राबादमध्ये पार पडले. त्या वेळीही रामाराव यांनी आपल्या पक्षाची उद्दिष्टे स्पष्ट केली असून तमाम तेलगू भाषिक जनतेचा विश्वास संपादन करून आपण राज्यात सत्ता मिळवू शकू, असा विश्वास व्यक्त केला आहे. 'कोथा विंथा पाथा रोथा' अशी एक तेलगू म्हण आहे. त्याचा मतितार्थ असा की, उत्सुकतेपोटी कोणतीही नवीन गोष्ट स्वीकारली जाते. आपल्या पक्षाचाही असाच स्वीकार होईल, असा त्यांना विश्वास वाटतो. एन. टी. रामाराव यानी गेल्या २९ तारखेला आमदार निवासावर जोरदार भाषण करून इंदिरा काँग्रेस विरुद्ध सुरू झालेल्या मोहिमेची पहिली तोफ डागली. आपल्या नवीन पक्षाचे संस्थापक-अध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर उपस्थितांसमोर बोलताना रामाराव म्हणाले, 'दिल्लीमधील सत्ताधाऱ्याचे लागूलचालन करून राज्यामधील इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी तेलगू जनतेच्या स्वाभिमानाला डंख केला आहे. या नेत्यांनी स्वार्थापलीकडे काहीही न पाहिल्याने तेलगू जनतेची मोठी निराशा झाली आहे. आपल्या राज्यामधील संपत्तीचा ओघ दिल्लीकडे वहात असून राज्याच्या कल्याण योजनाना केन्द्राचा मिळावा तसा पाठिंबा मिळत नाही. खेरीज, ज्या थोडचा-फार योजना मार्गी लागतात त्या नादान राज्यकर्त्यांमुळे यशस्वी ठरू शकत नाहीत.' आपल्या राजकीय धोरणांबाबत बोलताना रामाराव म्हणाले, 'माझा पक्ष कोणत्याही परिस्थितीमध्ये इंदिरा काँग्रेसशी कसलाही संबंध ठेवणार नाही. राज्यामध्ये सत्ता सपादन करणे हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असून ते साध्य व्हावे यासाठी अन्य राजकीय पक्षाबरोबर गरजेप्रमाणे जागांची थोडी फार देवाण-घेवाण व तडजोड होऊ शकेल.' त्यातही आपल्याला भाजप, जनता व लोकदल या पक्षाबद्दल थोडे-फार ममत्व आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. 'आपला पक्ष प्रादेशिक असला तरी केवळ गरजेमुळे निर्माण होत असून राष्ट्रीय एकात्मतेला छेद जाईल असे काहीही करण्याची आपली वा आपल्या पक्षाची तयारी नाही. घटनात्मक चौकटीमध्ये राहूनच आपला पक्ष काम करेल.' केन्द्र-शासनाबरोबर या पक्षाचे अथवा या पक्षाचे सरकार आले तर त्याचे, संबंध कसे असतील? या प्रश्नाला उत्तर देताना रामाराव म्हणतात, 'कोणत्याही राज्य सरकारला केन्द्राबरोबर संघर्षाचे संबंध ठेवून चालणार नाही. राज्याचे हित हे माझे प्रमुख उद्दिष्ट असल्याने, समजा माझा पक्ष सत्तेवर आला तर केन्द्रामध्ये जे शासन सत्तेवर असेल त्या शासनाशी मिळते-जुळते संबंध ठेऊनच राज्यामधील सत्ता राबवावी लागेल. अशा परिस्थितीत आंध्रमधील जनतेने माझ्या प्रश्नाचा पाठपुरावा केला तर इंदिरा सरकार बरोबरही मी संघर्षाची भूमिका स्वीकारणार नाही. आंध्रमध्ये सध्या जी अगतिकता आली आहे ती मोडून काढून, येथील जनतेच्या स्वाभिमानाला फुंकर घालायचे काम करायचे आहे. राज्याची गेलेली प्रतिष्ठा परत मिळवण्याच्या जिद्दीने मी राजकारणात प्रवेश करत आहे. आंध्रमधील सध्याची परिस्थिती पाहून मला शरम वाटते. सार्वजनिक जीवनामधील प्रामाणिकपणा नाहीसा झाल्याने जनतेचा नेत्यावर विश्वास नाही. हरवलेला प्रामाणिकपणा पुन्हा यावा यासाठी माझा पक्ष प्रयत्न करील. आंध्रमधील प्रादेशिकवादाला मी स्थान देणार नाही. आपण सर्व तेलगू भाषिक एक आहोत ही भावना रुजवली जाणे आवश्यक आहे.'

एन्. टी. रामाराव सुशिक्षित असून, कलाक्षेत्रामध्ये वावरत असूनही राजकारणाचे ते सुजाण निरीक्षक आहेत. त्यांना स्वतःला आठ मुले असली तरी आपल्या सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या आपण पूर्ण केल्या आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. आंध्रमधील अत्यंत धनाढ्य व्यक्तींमध्ये त्याचा समावेश होतो. कलाजीवनामधील आपल्या असाधारण लोकप्रियतेचा फायदा घेऊन त्यांनी तेलगू समाजाच्या प्रादेशिक भावनेला फुंकर घातली तर कदाचित त्यांचा पक्ष चागले मूळ धरील. आंध्रमधील समाजजीवनाचा आणि राजकीय विचाराचा अभ्यास करणाऱ्या जाणकाराच्या मते एन्. टी. रामाराव व त्याचा पक्ष लक्ष ठेवून राहण्याइतक्या तोलामोलाचे काम जरूर करू शकेल.

## महाराष्ट्र : सुरेश जैन यांचा मस्तवालपणा !

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना आपले बूड अजून स्थिर करता आलेले नाही. एक तर ते नको तेव्हा नको ते बोलतात आणि वादळ उठवून देतात. अंतुले जरी सत्तेवर नसले तरी त्यांच्या मागे एक सामर्थ्यशाली गट आहे, याची भोसल्याना जाणीव असूनही त्यानी सुरेश जैन याना दुखावले. जैन, अंतुले याचे जवळचे मित्र. त्यांनी तर सध्या भोसले याच्या विरोधात आघाडीच उघडली आहे. खेरीज, अंतुले यांच्यावरही त्यांनी टीका केली व त्यानी विदर्भाच्या संदर्भात मंजुरी दिलेल्या काही योजनांचे बंधन आपल्यावर नाही हे स्पष्ट केले. अंतुले यांच्या समर्थकांनी बाबासाहेबांना सध्या संत्रस्त करून सोडले आहे. अंतुले याचे विरोधक बाबासाहेबाच्या भोवती गोळा झाले आहेत. त्यामध्ये प्रदेश काँग्रेसच्या माजी अध्यक्षा प्रेमलाबाई चव्हाण आहेत. आमदार बाबासाहेबांच्या मागे आहेत हे दाखवण्यासाठी सध्या सह्याची मोहीम उघडण्यात आली आहे. 'बाबासाहेबाना विरोध म्हणजे इंदिराजीना विरोध' असे घोषवाक्य तयार करण्यात आले असून इंदिराजीनी निवडलेल्या बाबासाहेबांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सर्वसाधारपणे सत्तेवर असलेल्या मुख्यमंत्र्याच्यापाठी अर्ध्याहून जास्त स्वपक्षीय आमदार नेहमीच असतात. मुख्यमंत्र्यांचे स्थान डगमगू लागले तर थोडी फार पळापळ होते. परंतु सत्तेवर मांड ठोकून असलेल्या मुख्यमंत्र्याला दुखवणे आमदार पसत करत नाहीत. स्वाभाविकपण सह्यांची मोहीम निघाली तर सव्वादोनशेहून जास्त असलेल्या आमदारांमधून पावणे दोनशेच्या आसपास सह्या गोळा करणे अवघड नाही. पण सह्याच्या या चळती मुख्यमंत्र्याचे स्थान सुस्थिर करू शकत नाहीत. त्याचे काम, त्याची प्रतिमा, त्याच्या विरोधात असलेल्या स्वपक्षियांची ताकद आणि दिल्लीचे धोरण यातून पुढील गोष्टी ठरत असतात. सध्या तरी बाबासाहेब दोलायमान खुर्चीवरच विसावलेले आहेत. ते सुस्थिरही नाहीत आणि अस्थिरही नाहीत. केंद्रीय नेते त्याच्या मागे खबीरपणे उभे असून त्यानी त्याचा पाठपुरावाच चालवला असल्याने बाबासाहेबाना लगोलग धक्का लागेल असे वाटत नाही. महाराष्ट्रामधील राजकीय परिस्थितीचे निरीक्षण करून गेलेले प्रणवकुमार मुखर्जी यानी, अंतुलेच चावटपणा करत आहेत, असा अहवाल दिला आहे आणि इतके असूनही इंदिराजी बाबासाहेबाना पंधरा मिनिटात बाहेर काढतात, पण अंतुलेजीबरोबर मात्र अर्धा-तास


पर्यंत चर्चा करतात. अंतुलेजीचे 'राजनारायण' सुरेश जैन दिल्लीला नेत्याबरोबर चर्चा करून आल्यानंतर अंतुलेजीच मुख्यमंत्री होणार, असे उघडपणे सांगत आहेत. मस्तवालपणे पैशाच्या सामर्थ्याचे महात्म्य ऐकवत आहेत. याचा अर्थच असा की, अंतुलेजी जरी गुलदस्तामध्ये राहिले तरी त्याचे अनुयायी विद्यमान मुख्यमंत्र्याविरुद्ध जोरदार आघाडी उघडून आहेत. बाबासाहेबांनी मंत्रिमडळाची जडण-घडण करताना अनेक ज्येष्ठ मंत्र्यांना डावलेले आहे. त्यापैकी काहीना दुखावलेही आहे. ही सारी मंडळी वातावरण बाबासाहेब विरोधी जात असेल तर खत-पाणी घालणारच. बाबासाहेबांना अनुकूल ठरणारी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, त्याना तडकाफडकी दूर करणे केंद्रीय नेत्यांनाही परवडण्यासारखे नाही. मनात आणू त्या नेत्याला सत्तेवर बसवू, अशा ताठर भूमिकेतून बाबासाहेबांना सत्तेवर आणले आहे. त्याना वेळ पडेल त्याप्रमाणे कानपिचक्या दिल्या तरी सत्ता त्यांच्यामार्फतच राबवणे सोयीचे आहे. बाबासाहेबांचे दिवस भरले असे म्हणणारी मंडळीही बाबासाहेब आणखी किमान वर्ष-सहा महिने तरी काढतील, असे खाजगीत बोलून दाखवतात. बाबासाहेबांनी सत्ताग्रहण केले त्या वेळी मी त्यांची तुलना अंजय्या यांच्याबरोबर केली होती. अंजय्या यानी जशी आणि जितकी गोंधळाची परिस्थिती निर्माण केली होती, तशी आणि तितकी परिस्थिती निर्माण झाल्यावर बाबासाहेबांकडे बघण्यात येईल. कितीही वादळी परिस्थितीतून जात असले तरी सध्या तरी बाबासाहेब वाटचाल करत रहाणार, असे दिसत आहे. दरम्यान अंतुलेनी मनेका गांधीबरोबर संपर्क साधून असल्याच्याही बातम्या आहेत. उघड संपर्क सध्या संभवनीय नाही; पण अंतुलेजीची वाकडी चालही परवडण्यासारखी नसल्याने त्याना पुन्हा दिल्लीमध्ये ओढले जाईल, असे वाटते.

महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रावर हुकमत गाजवणाऱ्या राज्य सहकारी बँकेचे अध्यक्षपद प्रदेश कांग्रेसचे अध्यक्ष गुलाबराव पाटील याच्याकडून वसंतदादा गटाकडे गेले आहे. पाच अब्ज रुपयांचे भांडवल नियंत्रित करणारी ही बँक आपल्या आर्थिक सामर्थ्याची चुणूक राजकीय क्षेत्रातही दाखवून देते, एवढी नोंद इथे करणे आवश्यक वाटते.

माजी मुख्यमंत्री शरद पवार याचे चेले सुरेश कलमाडी राज्य सभेच्या निवडणुकीत यशस्वी झाले आहेत. पक्षादेश धुडकावून लावून इंदिरा कांग्रेसच्या आठ आमदारांनी त्याना प्रथम क्रमाकाची मते दिली. हे आमदार मनेका गांधी गटाचे असल्याचे शरद पवार सांगतात. राजीव गाधीची व त्याची जवळीक चागलीच वाढल्याच्या बातम्या आहेत. बाबासाहेबांना पर्याय शोधला जाईल तेव्हा संधीसाधू शरदरावांचे नावही संभाव्य उमेदवाराच्या यादीमध्ये निश्चितपणे असेल.

## □ विदेश दौऱ्यावर जाणारा क्रिकेट संघ

या महिना अखेरीस इंग्लड दौऱ्यावर जाणाऱ्या भारतीय संघाची निवड गेल्या सप्ताहामध्ये घोषित करण्यात आली. इंग्लडचे जे अनेक नामवंत खेळाडू अलीकडेच दक्षिण आफ्रिकेमध्ये क्रिकेट खेळावयास गेले होते, त्याना वगळून कसोटी सामन्यासाठी इंग्लिश संघ निवडला जाणार असल्याने हा संघ तसा दुय्यम असणार आहे. त्यामुळे भारतीय दौरा संपवताना इयान बोथमने इंग्लडमध्ये येणाऱ्या भारतीय संघाचा आपण ३–० असा पराभव करू अशी जी मस्तवालपणाची भाषा केली होती ती हवेत विरून जाण्यासारखी आहे. देशामधील उपलब्ध टॅलेंटचा विचार करता निवडण्यात आलेला भारतीय संघ हा आगामी मालिका निश्चितपणे जिंकूनच परत यावा व इंग्लडच्या दुय्यम संघाला तोंड देणे त्यांना जराही जड जाऊ नये, हे लक्षात घेऊनच निवडण्यात आला आहे. निवडलेल्या खेळाडूवर नजर टाकली तर जाणवण्यासारखा प्रमुख बदल म्हणजे दुसऱ्या क्रमाकाचा यष्टिरक्षक या संघामध्ये नाही. आणखी एका खेळाडूची सोय करण्याच्या दृष्टीनेच हा बदल करण्यात आला आहे. याबाबत खुलासा करताना निवड समितीचे सदस्य पॉली उम्रीगर यानी सांगितले की, हा दौरा तसा लहान असून केवळ तीनच कसोटी सामने खेळले जाणार असून एक दिवसाचे तीन सामने, पाच सर्वसाधारण सामने, काही दोन दिवसाचे सामने खेळले जाणार आहेत. त्यामुळे एकट्या किरमाणीवर काम भागू शकेल, खेरीज गरज लागेल त्या वेळी गुलाम परकार यष्टिरक्षण करू शकेल. आघाडीचा खेळाडू व अपरिहार्य परिस्थितीमधील यष्टिरक्षक म्हणून पारकरची निवड करण्यात आली आहे. इतर नावावरून नजर टाकली तर असे दिसून येते की, ज्याना कसोटी सामन्याचा अजिबात अनुभव नाही अशा दोन खेळाडूना निवड समितीने संधी दिली आहे. त्यामध्ये बिहारचा मध्यमगती गोलंदाज रणबिरसिंग व मुबईचा फलंदाज व मध्यमगती गोलंदाज सुरु नायक याचा समावेश आहे. या दोघानीही इंग्लिश संघाविरुद्ध साध्या सामन्यात खेळ केला आहे. वगळण्यात आलेल्या प्रमुख नावांमध्ये तामिळनाडूचा आघाडीचा फलंदाज के. श्रीकातचा उल्लेख करता येईल. भारताचा दौरा केलेल्या इंग्लिश संघाविरुद्ध श्रीकांतने चार कसोटी सामन्यात भाग घेतला होता. याच संघाविरुद्ध तीन कसोटी सामने खेळलेला दिल्लीचा किर्ती आझादही वगळण्यात आला आहे. खेरीज, रणजी करंडक अंतिम सामन्यात कर्नाटकच्या वतीने उत्तम फलंदाजी करून शतक झळकवणाऱ्या रॉजर बिन्नीचीही वर्णी लागू शकलेली नाही. रॉजर बिन्नीने यापूर्वीच्या ऑस्ट्रेलिया–न्यूझीलंड दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघामध्ये स्थान मिळवले असले तरी इंग्लंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेमधील एकाही सामन्यासाठी त्याची निवड झाली नव्हती. किरमाणी पाठोपाठ दुसऱ्या क्रमाकाचा यष्टिरक्षक म्हणून तामीळनाडूच्या भरत रेड्डीचे नाव घ्यावे लागेल! परंतु यावेळी प्रथमच दुसऱ्या क्रमाकाचा यष्टिरक्षक वगळला गेल्याने त्याची वर्णी लागू शकलेली नाही. पंकज रॉय यांचा मुलगा प्रणव रॉय याची कसोटीमधील कामगिरी पुरेशी समाधानकारक वाटल्याने त्याच्या रणजी करंडक मालिकेमधील अपयशाचा विचार बाजूला ठेवून त्याची निवड केली गेली. चेतन चौहानला आता निवड समितीने कायमचा रामराम ठोकला आहे, असे समजण्यास हरकत नसावी. या वेळी निवड समितीने प्रथमच दौऱ्यावर न जाणाऱ्या, परंतु गरज भासली तर ज्यांना बोलावून घेतले जाईल अशा पाच राखीव खेळाडूची नावे जाहीर केली आहेत. बहुधा त्यापैकी कुणाची गरज लागणार नाही; पण कोणी सागावे, अडचण आल्यामुळे ऑस्ट्रेलिया–न्यूझीलंड दौऱ्याच्या वेळी रवी शास्त्रीला बोलावून घेण्यात आले होते तसे या पैकी कोणाला बोलवावे लागले तरच त्याना संधी मिळू शकेल. वाट पहात बसणाऱ्या या मंडळीमध्ये अरुण लाल (बंगाल–फलंदाज), मोहिंदर अमरनाथ (दिल्ली–फलंदाज व मध्यमगती गोलंदाज), रमेश शर्मा (दिल्ली–फिरकी गोलंदाज व फलंदाज), गोपाळ शर्मा (उ. प्र. फिरकी गोलंदाज व फलंदाज) व झुलिफकर परकार (मुबई–यष्टिरक्षक व फलंदाज) याचा याच क्रमाने समावेश आहे. निवडण्यात आलेल्या या संघाबद्दल कर्णधार गावस्कर समाधानी आहे हवामानाने साथ दिली व खेळाडूची तंदुरुस्ती समाधानकारक असली तर आपण मालिका यशस्वीपणे जिंकूनच परत येऊ, असे त्याने बोलून दाखवले आहे. □



## स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी सत्यघटनेवर आधारित लघुकादंबरी

# सबला

• माधव शिरवळकर •

(एक)

झाल्या प्रकाराने एरणगाव हादरून गेलं. घराघरातून, झोपडी-झोपडीतून तीच चर्चा होत होती. एस. टी. स्टॅंडवर, देवळाच्या पारावर, शाळा सुटून गेल्यानंतर तेथल्या व्हरांड्यात, लहान लहान चिटुक किराणा मालाच्या दुकानातून, न्हाव्याकडे, शिप्याकडे एकच एक विषय गंभीरपणे बोलला जात होता. एरणगावातल्या एकमेव हवेलीत तर आकाश कोसळल्यासारखी स्थिती झाली होती. आप्पासाहेब चव्हाणांना बाहेर तोंड काढायला जागा उरली नव्हती.

एरणगावात आप्पासाहेब चव्हाण ही व्यक्ती म्हणजे गावकऱ्यांचा एक जिवंत देव होता. चव्हाणांच्या चौरसचौरस हवेलीत मदतीसाठी गेलेला माणूस आप्पासाहेबांना दुवा देतच बाहेर पडणार, ही गावची रीत होती. आप्पासाहेबांनी अशा तऱ्हेने एरणगावाला आंजारून गोंजारून आपलंसं ठेवलं होतं. राजकारणाच्या पटावर एरणगाव म्हणजे आप्पासाहेबांचा वजीर होता. आप्पासाहेब म्हणतील त्याप्रमाणे तो कसाही चालायचा. एरणगावच्या जनतेनें हातात फासे घेतले तर आप्पासाहेब म्हणतील तेच दान पडायचं. एवढं असताना आज आप्पासाहेबांना आपल्या हवेलीबाहेर तोंड काढायला जागा उरलेली नव्हती ती मुकुंदरावामुळे.

मुकुंदराव चव्हाण हा आप्पासाहेबांच्या खानदानीचा पुढल्या पिढीचा एकमेव दुवा. आप्पासाहेबांचा एकुलता एक मुलगा. आप्पासाहेबांच्या बापजाद्यांनी एरणगावा आसपास एवढी बागायती जमीन ठेवलेली होती की ती राबवण्यातच आप्पासाहेबांचा जन्म गेलेला होता. आप्पासाहेबांच्या पश्चात हवेलीसकट ती शेकडो एकर उसाची जमीन आणि त्या हवेलीत सुरक्षित जागी रांजणात ठेवलेले ते शेकडो तोळे शुद्ध सोन्याचे दागिने अशी सारी संपत्ती मुकुंदरावाच्याच पायाशी येणार होती. मुकुंदराव एरणगावचा अनभिषिक्त राजा होणार होता. पण मुकुंदरावाच्या एका करणीनंच आप्पासाहेबाचं मन पार उडून

गेलं. ह्या कुलदीपकाने साऱ्या हवेलीला आग लावली असती तरी चाललं असतं पण ...

आप्पासाहेब प्रशस्त पडवीतून अस्वस्थ येरझारा घालीत होते. हवेलीचा एरवी सताड उघडा असणारा दणकट दरवाजा मुद्दाम कडी लावून बंद ठेवलेला होता. झाल्या प्रकारान खुद्द एरणगावाचं मतही मुकुदरावाच्या बाबतीत चागल राहिलेलं नव्हत

मुकुंदरावाच्या करणीने हवेलीतल चव्हाण कुटुब जसं व्यथित झाल होत तसं एरणगावच्या पोस्टाच्या माडीवर नुकतच रहायला आलेलं देसाई कुटुबही घरादाराला वणवा लागावा तसं बेभान प्रक्षुब्ध झालेलं होतं. सबध एरणगावची सहानुभूती ह्या देसाई कुटुबाला मिळणार होती. खुद्द आप्पासाहेब चव्हाणसुद्धा त्यावेळी एरणगावाबरोबर देसाई कुटुबाचीच बाजू घेत होते. अस्वस्थ होऊन हवेलीत थरथरत होते. आपल्या भारदस्त चेहेऱ्यावर जमणारा घाम वारवार पुसत होते. मुकुदराव मात्र त्यावेळी एरणगावात नव्हता.

देसाई कुटुब फार मोठं नव्हत. अवघ सव्वादोन माणसाच. एक श्यामकात देसाई, दोन कल्पना देसाई आणि तिसरी त्यांची अडीच वर्षांची गोड मुलगी नीलू. एवढयाशा ह्या छोटया कुटुंबाने त्या दहा-पंधरा हजाराच्या एरणगावात असंतोषाची चूड पेटवलेली होती. ते रहायला आल्यापासून पुढल्या दोन महिन्यातच हे घडल होत. ह्या चुडीची पहिली ठिणगी पडायला मात्र कारणीभूत होती ती श्यामकात देसाईची सुशील पत्नी कल्पना.

श्यामकात देसाईचं एरणगावात नव्यानं रहायला येण हे त्याच्या मनाविरुद्ध झालेल होतं. त्याच तीस वर्षाचं एकूणच आयुष्य पुण्यासारख्या शहरात गेलेलं होतं. पुण्याच्याच पोस्टात तो प्रामाणिकपणे गेली आठ-नऊ वर्षे नोकरी करीत होता. वयाची तीस वर्षे पुण्यात गेलेली असताना एके दिवशी अचानक एरणगावला बदली झाल्याचा हुकुम त्याच्या हाती पडावा हे त्याच पहिल दुर्दैव होतं. बदली होऊ नय म्हणून त्यानं केलेल्या प्रामाणिक प्रयत्नाना यश आल नाही, हे त्याच दुसर दुर्दैव आणि एरणगावात येऊन पुरते दोन महिनेही झाले नसताना एक प्रचड तुफान मुकुदरावाच्या करणीने त्याच्या कुटुबात तयार होणं, हे तिसर दुर्दैव होत.

पण श्यामकात देसाई शात मनाचा होता. स्वभावानं सज्जन होता. आपल सडसडीत मध्यम उचीचं शरीर आपल्या मनाबरोबर भडकत व्हाणार नाही, याची तो काळजी घेत होता. आपल्या कारकुनी पेशाला साजेल अशा त्याच्या त्या निमगोऱ्या चेहेऱ्यावर चितेचं सावट अवश्य आलेल होत, पण तरीही पोस्टाच्या माडीवरल्या त्याच्या खोलीतल्या पलगावर तो शातपणे पडून होता. 'एरणगाव कसं सोडायचं' हा त्याच्या चेहेऱ्यावर साडलेला मुख्य प्रश्न होता.

ह्या एकंदर झझावाताला कारणीभूत झालेली श्यामकांताची बायको कल्पना हे एक अप्रतिम लावण्य होतं. चिखलातून कमळानं उगवून याव तशी गरिबीतून कल्पना उमलेली होती, आणि तिच्या अप्रतिम सौंदर्याला भुलून श्यामकातानं तिला मागणी घातलेली होती. एवढच होत की पैशाऐवजी श्यामकांतला तिच्या सौंदर्याचा हुडा मिळालेला होता. ह्याला त्यातून प्रचड समाधान–सुख लाभलेलं होत. एरणगावात हे असं सौंदर्य कल्पवृक्षाइतकच दुर्मिळ होतं. झाल्या प्रकाराने कल्पनाला एक प्रकारचा तीव्र मानसिक धक्का बसलेला होता आणि त्यातून ती स्वतःला सावरू पहात होती. आपल्या अडीच वर्षाच्या नीलूचे निसर्गतःच सोनेरी असलेले केस हळुवारपणे विचरत ती झाला प्रकार विसरायचा करीत होती.

¤

त्या दिवशी दुपारच्या वेळी मुकुदराव एस. टी. स्टॅण्डवर आला होता. साधारणतः दीड-दोनचा सुमार असेल. एरणगावच्या सडकेवर वीतभर खोल साठलेली धूळ चागलीच तापलेली होती. हाताच्या बोटावर मोजण्याइतके प्रवासी आपली गाठोडी-बोचकी आवरून पुढल्या एस. टी. ची वाट पहात होते. तिकड लक्ष न देता करज्याच्या एका बुटक्या डेरेदार झाडाखाली मुकुदरावाने आपली हिरवीगार जीप कच्चकन ब्रेक मारून सावलीत उभी केली. गरमागरम धुळीत पच्चकन थुकून तो पानाच्या दुकानाजवळ आला. पुरत सावलीत येताच त्याने बाहेरच्या उन्हाकडे परक्या नजरेने पाहिले आणि मग जास्तीत जास्त उची सिगरेटच पाकिट खरेदी करून काही क्षण तो पानवाल्याकडेच गप्पा ठोकीत उभा राहिला. दुपारनतर त्याला उसाच्या मळयातून ती जीप फिरवायची होती.

सिगरेट पेटवण्यासाठीच म्हणून लायटर पेटवायला आणि समोरच्या धुळीत मळकी एस. टी. येऊन उभी रहायला एकच गाठ पडली. माफक प्रमाणात गडबडीचा आवाज झाला आणि स्थानिक वातावरणात सवयीसारखा धुरळा उडाला. तो धुरळा घशात गेल्यासारखा मान मागे करून मुकुदराव खाकरला आणि लायटर विझवून त्याने पुन्हा फटा-फटा पेटवला. बेफिकीरपणे सिगरेटचा लाब झुरका हवेत सोडून दिला. बसचा धुरळा खाली बसल्यावर चटकन जीप काढून मळयात जायच, हा मुकुदरावाचा पक्का ठरलेला बेत होता.

ठणकन घटी आपटून एस. टी. निघून गेली. पुण्याहून एरणगावला आलेल देसाई कुटुब त्याच एस.टी.तून प्रथमच एरणगाव एस. टी. स्टॅण्डवर उतरत होत. पानाच्या दुकानाजवळ सावलीला उभा असलेला अठ्ठावीस वर्षाचा जवान मुकुदराव आवाक झाल्यासारखा पाहू लागला. गडबडून आपल्या उची पॅंटवरची धूळ झटकावी तशी त्यान हालचाल केली आणि आपल्या मिशीवरून निष्कारण हात फिरवला. प्रवासाच्या दगदगीतून उतरलेल देसाई कुटुब अपरिचितासारखे एरणगावाकडे पहात होत. बारीक बारीक पावल ओढत धुळीतून रस्त्याकडे सरकत होतं. नीलूच्या सोनेरी केसावर लाल डाळिंबी रुमाल बाधलेला होता आणि धुळीतून चालता येईना तेव्हा श्यामकाताने तिच्या सॅंडलसह तिला कडेवर घेतली होती. कल्पनाच्या हातात साधी जुजबी बॅग होती. बाकीच सामान मागून लॉरीने येत होत.

मुकुदराव जवळजवळ पाच-सात मिनिट त्या कुटुबाला पहात होता. मध्यम बांध्याची, शुभ्र गोऱ्या रगाची, प्रसन्न नजरेची, हिरवीगार साडी व्यवस्थित लपेटून नेसलेली, डोक्यात ताजा गजरा माळलेली, एस. टी. तून उतरल्यावर केस सावरणारी कल्पना जेव्हा प्रथम मुकुदरावाने पाहिली तेव्हा क्षणभर त्याला वाटून गेल की आपण हिच्याशीच लग्न करावं. त्यानं नीट निरखून पाहिल तेव्हा कल्पनाच मगळसूत्र त्याच्या खस्सकन नजरेस पडल आणि तो मनातून खट्टू झाला. कल्पना आणि मुकुंदराव याच्याच एकच साम्य होत आणि ते म्हणजे दोघेही अठ्ठावीस वर्षाचे होते.

मुकुंदराव अलगद येऊन जीपमध्ये बसला. सवयीप्रमाणे त्यानं

(पृष्ठ...३१ वर)

श्यामचा संसार : कथा तिसावी

फिरोझ रानडे

# कुत्रे आणि होयबा

हा सर्वसामान्य जगावेगळा मायना वाचून मनात नव-काव्यापेक्षाही जास्त गोंधळ होण्याचा संभव आहे. श्यामच्या वयाच्या लोकांना म्हणजे ज्याची चाळीशी उलटून बरीच वर्षं झाली आहेत त्या लोकांना, आपलं बालपण व तरूणपण ह्यामधले एक अडाणीपण असते त्याची आठवण येईल. त्या काळी मराठीत नव–कथेचे भरपूर पीक आले होते. त्या पिकाचा ह्या लोकांनी त्यांच्या अडाणीपणात आस्वाद घेतला होता. श्यामला आठवते आहे की, त्यावेळी उंट आणि लंबक नावाची एका मोठ्या अर्थशास्त्रज्ञाने लिहिलेली कथा फार प्रसिद्ध पावली होती. आता श्यामला कथेतला नायक उंट होता की लंबक होता ते आठवत नाही, पण त्यावेळी त्याचे तन आणि मन खूप हुळहुळले होते हे मात्र त्याला पक्के आठवते आहे.

पण वरचा मायना त्या नव–पद्धतीचा नसून परदेशात म्हणजे मस्कत मध्ये आल्यावर ज्या गोष्टी बघून वा न बघून व ऐकून आनंद झाला होता त्या गोष्टीबाबत आहे. खरं म्हणजे परदेश वर्णनात अबब म्हणायला लावणाऱ्या गगनचुंबी इमारती, तेथली नाट्यगृहे, तेथली पब्ज्, तेथली सुईपासून हत्तीपर्यंत सर्व गोष्टी विकणारी डिपार्टमेन्टल स्टोअर्स वा सुपर-बझार्स अशा गोष्टी यावयास पाहिजेत व मधे चवीला म्हणून मराठी लेखकांना वेळोवेळी भेटणाऱ्या हसतमुखी स्वागत सुन्दऱ्या, विक्रेत्या सुन्दऱ्या, हवाई सुन्दऱ्या असे चिवड्यातले काजू असावयास पाहिजेत.

पण श्याम काही इंग्लंड, फ्रान्स, इटाली वा हल्ली जास्त लोकप्रिय असलेल्या हॉलंड, अशा पुढारलेल्या देशात गेला नव्हता. तो गेला होता हिंदुस्तान सारख्याच प्रगतीशील देशात. तेथे कुठले आले आहेत पब्ज आणि वेगवेगळ्या तऱ्हेच्या सुन्दऱ्या? त्यामुळे श्यामचे परदेश अनुभव त्या मानाने काहीच नाही आहेत असे कोणीही म्हणेल व श्यामलाही मनातून थोडेसे तसेच वाटत होते. पण प्रत्येकाला आपली बायको कशीही असली तरी सुन्दर वाटते किंवा थोर गायक अमिताभ बच्चन ह्याच्या गाण्याप्रमाणे, 'जिसकी बिवी काली उसका भी बडा नाम है' वगैरे वगैरे प्रमाणे, बिवी कोणत्याही तऱ्हेची असो उसका भी 'बडा' नाम असतो, त्या चालीवर परदेश अनुभवाचे आहे. तो काळा असो, लंबा असो, मोठा असो, त्या लेखकाला तो बडा नामवाला वाटत असतो, व तो ते सगळ्यांना सागत सुटतो वा लिहीत सुटतो.

मस्कतला येऊन श्यामला आता १०–१२ दिवस झाले होते. आल्या आल्या ओमानी सरकारने त्याची मंत्रीशाही व्यवस्था ठेवली होती. पूर्वीच्या काळी राजेशाही व्यवस्था ठेवत पण आता लोकशाहीत मंत्रीशाही व्यवस्था ठेवण्याची पद्धत आहे, म्हणून मंत्रीशाही व्यवस्था. तो रहात होता ते हॉटेलसुद्धा कचेरीसमोर म्हणजे मोठ्या सोयीचे. खाणं व पिणं M व्हिटचामिनयुक्त म्हणजे मोफत व्हिटयामिनयुक्त असल्याने त्याची चंगळ होती. पण जसा सगळ्या भल्या व बुऱ्या गोष्टींना शेवट असतो तसा चगळीला पण असतो. सात-आठ दिवसानंतर त्याच्या मंत्रालयाने त्याला वेगवेगळे गाळे व बंगले दाखवायला सुरुवात केली होती.

श्यामची कचेरी सकाळी ७॥ ते २ पर्यंत असे. त्यानंतर जेवण–खाण वगैरे आटपून वामकुक्षी करून तो मंत्रालयाच्या कर्मचाऱ्याबरोबर ६–६॥ च्या सुमारास बाहेर पडत असे. चार-पाच दिवसात प्लॉट बघण्या करता गावात फिरताना व बंगले पाहण्याकरता गावाबाहेर फिरत असताना, त्याच्या मनात ह्या गावात काही तरी कमी आहे, असे वेळोवेळी जाणवत होते. पण नक्की काय ते त्याच्या लक्षात येईना. बंगले बघायला जावे तर बंगल्यासमोर मोठाल्या बागा असत, कुंपण असे, लोखंडी नक्षीदार फाटक असे. फाटकाजवळची घंटी वाजवून बाहेर थांबावे लागे. मग गडी येऊन दार उघडत असे व श्यामला व ओमानी माणसाला बंगले-मालकाला भेटायला नेत असे. पण हे तर किंवा असे तर काम हिंदुस्थानात पण होते. पण येथे काहीतरी फरक होता. फरक होता पण वळत नव्हता. हिंदुस्थानात छातीत धडधडते तसे येथे धडधडत नसे. असे का?

एक दिवस म्हणजे एका रात्री श्याम नऊ वाजताच्या सिनेमाला गेला होता. सिनेमा हिंदी होता त्यामुळे चागला १२॥ पर्यंत चालला होता. श्यामच्या हॉटेलपासून सिनेमा गृह थोडे अंतरावर होते. तो मोठ्या रस्त्यावर होता तोपर्यंत त्याच्या सोबतीला बाकी प्रेक्षक होते. पण मग तो एकटाच जाऊ लागला. सगळीकडे अगदी शांत होते. रस्त्यावर उंच व चकचकणाऱ्या दिव्यांनी वातावरण जास्त गंभीर वाटत होते. क्वचित एखादी भली मोठी गाडी सूं करत निघून जात असे, असे चालता चालता श्याम हॉटेलकडे जाणाऱ्या लहान रस्त्याकडे वळला. तो वळला व त्याच्या डाव्या बाजूने काही तरी काळे उडी मारून त्याच्या समोर आले श्यामच्या सर्वांगाला कापरे फुटले व त्याच्या शरीरातून व त्या फुटलेल्या कापरातून घाम फुटला. पण एका क्षणातच त्याला कळले की, ते माजर आहे व त्याला डबल-पॉवरचा आनंद झाला. पहिला पॉवर म्हणजे आता आपल्या समोर कुत्रे नसून माजर आहे व गेल्या किती तरी दिवसात आपल्याला चुकचुकल्यासारखे वाटते होते पण ते का वाटते आहे हे कळत नव्हते, पण कळले–म्हणजे ह्या गावात कुत्री म्हणून नाहीत. हा दुसरा पॉवर!

श्यामला जशी बहुतेक लोकांना वाटते तशी लहानपणापासून कुत्र्याबद्दलची भीती, आईबद्दल प्रेम वाटण्याच्या बरोबरच वाटू लागली होती. खरं म्हणजे त्याला कुत्रे चावले होते व त्यामुळे त्याची भीती दिवसेन् दिवस महागाईसारखी वाढत चालली होती असे काही नव्हते. एखादं माणूस आपल्याला आवडतं का वा नावडतं का? ह्याचे काही गणित करून उत्तर सांगता येत नाही. ह्याच प्रमाणे कुत्र्याच्या भीतीबाबत आहे. ती का वाटते, कशी वाटते, त्या भीतीवर विश्वास कसा बसतो, ह्याची चर्चा तर्कनिष्ठ डॉक्टरही–म्हणजे माणसाचे, जनावराचे वा कुत्र्याचे नव्हेत–करू शकणार नाहीत. जसं पंढरीच्या विठ्ठलावरच्या अंधप्रेमावर व इतर अंधश्रद्धांवर रकानेच्या रकाने लिहून जसा त्या लोकावर ढिम्म परिणाम होत नसतो, तसाच

परिणाम अशा चर्चांचा श्यामवर झाला असता.

कोठेही जावयाचे म्हणजे तेथे कुत्रे असेल का, ह्या प्रश्नानेच श्यामला गर्भगळीत व्हायला होत असे. ज्यांच्याकडे कुत्रे आहे हे प्रथम पासूनच माहित असले तर तो त्यांच्याकडे जाण्याचेच टाळत असे व टाळणे अशक्य असेल तर राधाला वा मुलांपैकी कुणाला तरी बरोबर घेऊन जात असे. मग अगदी २–२॥ वर्षाचे मूल का असेना. का कोणास ठाऊक बरोबर कोणी असले म्हणजे आपल्याला कुत्रे चावणार नाही अशी त्याची भावना !

ज्यांच्याकडे कुत्री पाळली जातात त्यांच्या मनोवृत्तीचा अर्थच श्यामला लागत नसे. बरं कुत्रे फक्त पहारेदार म्हणून पाळले असेल तर हरकत नाही, पण अगदी हॉल मध्ये अगदी सोफासेटवर प्रेयसीसारखे कवटाळून घेऊन बसण्यात लोकांना काय सुख वाटत असेल बरे ? बरं येवढ्यावरच हे प्रेम-प्रकरण थांबते तर श्यामला त्याची हरकत नव्हती पण त्या प्रेमिकाची अपेक्षा अशी की पाहुणे लोकांनी त्यांचे कौतुक केले नाही तरी चालेल पण त्यांच्या 'प्रेयसी'चे जरूर करावे.

आपण कोणाच्या घरी जावे, दार उघडावे व कुत्रे व मालक बसलेले आहेत हे पहावे. मालक उठण्याआधी कुत्रे उठते व जवळ येते. ते जसे जसे जवळ येते तसा तसा आपला देवावरचा विश्वास वाढत जातो. कुत्रे अगदी जवळ येऊन अंगाचा वास देते व घेते. कुत्र्याच्या चेहऱ्या व मोहऱ्यावरून ह्या माणसाला खावे की गिळावे एवढ्याच प्रश्नात ते असावे असे वाटते. हे सगळे भाव आपल्या आखडून घेतलेल्या चेहऱ्यावरून व अंगावरून मालकांच्या लक्षात येतात. पण त्याना आपल्या चेहऱ्याशी वा अंगाशी काही कर्तव्य नसते. त्याना आपले ते साल्या कुत्र्याचेच कौतुक ! मालक हसत हसत कौतुकाने म्हणतात, 'काही घाबरू नका, काही करत नाही आमचा बॉबी' आपण मनाशी म्हणतो, आणखी करायचे काय बाकी आहे ? तो करतो आहे तेच इतके आहे की, विचारू नका !

प्रथम पांडव बंधूतला थोरला पांडव स्वर्गात गेला त्या वेळी त्याच्या बरोबर कुत्रे होते हे वाचून श्यामला ही संपादकाची झोप वा उप-संपादकाच्या डुलक्या असाव्यात असे वाटले होते. चागले स्वर्गाला जावयाचे तर इतर बाकी बरे वाईट प्राणी सोडून धर्मराज कुत्र्याला बरोबर कशाला घेऊन जाईल ? त्याला कुत्र्याची भीती वाटत नव्हती का ? हा प्रश्न पहिला. घटकाभर समजा की धर्मराजाला कुत्र्याची भीती वाटत नव्हती. असतात असे काही शूर लोक. पण त्या स्वर्गाच्या द्वारपालाचे काय ? धर्मराजाबरोबर कुत्रे आहे बघून त्याने स्वर्गाचे दारच उघडले नाही तर ? म्हणजे कधी नव्हत ती स्वर्गात जाण्याची आलेली संधी कुत्र्याच्या चार पायी वाया जाणार की नाही ?

आता चांगली हाताशी आलेली स्वर्गसंधी कुत्र्याकरता वाया घालवण्याइतका काही धर्म 'हा' नव्हता. भले त्याने जुगारात राज्य घालवले असेल, भले त्याने जुगारात बायको गमावली असेल, पण म्हणून काय स्वर्गाला जाण्याची संधी तो घालवेल ?

मग धर्मराजाबरोबर स्वर्गात जाताना फक्त कुत्रे होते अशी कथा उगम कशी पावली असेल बरे ? दंतकथा तयार व्हायला दात असणे जरूर असते ना ? ह्या दातांचा विचार येताच श्यामला कुत्र्यांची लकलकणारी जीभ व चकचकणारे सुळ्यासारखे दात आठवले व त्याचा धर्मराजाबाबतचा प्रश्न सुटला. कुत्रे धर्मराजाचे बरोबर नसून त्याच्या मागे मागे असावे. म्हणजे त्याचे असे— महायुद्धात सगळे कौरव मारले गेले होते. चार पांडव व द्रौपदी स्वर्गाला जाताजाता रस्त्यातच मरून पडली होती. धर्मराज आपला एकटाच पुढे पुढे चालला होता. आपली प्रिय पत्नी व भाऊ मरून पडले असता स्वर्गात तरी आपल्याला काय सुख मिळणार ? ह्या विचारांनी त्याची पावले जड पडत असणार. अशी कोणाची पावले जड पडत चाललेली पाहिली की कुत्र्यांना कसा जोर चढतो हे आपणा सर्वांस माहित आहेच. झालं, जड पावलाचा धर्मराज पाहिला व त्याच्या मागे जे काही कुत्रे लागले ते अगदी थेट स्वर्गाच्या दारापर्यंत !

आता धर्मराजाला असे कुत्र्याचे भीतीने पळताना काही वार्ताहरांनी पाहिले होते. पण आता पांडवांचा युद्धात विजय झाला होता. युद्ध चालू असते तर धर्मराजाबद्दल खरे खुरे लिहिता आले असते. जसे निवडणूक होण्याआधी पत्रकारांना काहीही लिहिता येते व ते लिहित असतात. पण एकदा निवडणूक झाली की, जिंकलेल्या पक्षाबद्दल लिहिण्याची कोणाची काय हिंमत लागली आहे ? मग विजेत्याचे अवगुण गुण दिसू लागतात. तद्वतच धर्माच्या मागे कुत्रे अशी सत्य-स्थिती असता, वार्ताहरांना राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीकोनातून त्या प्रसंगाकडे पाहून 'धर्मा मागे कुत्रे'चे 'धर्माच्या बरोबर कुत्रे' असे केले. मग धर्माच्या मनाचा मोठेपणा वगैरे चिटकला गेला. हे चिटकवणे कसे चालते हे जे लोक हल्लीची वर्तमानपत्रे वाचतात त्याना वेगळे सांगावयास नकोच.

त्या दृष्टीने आपले दत्त-गुरुदेव बरे. त्यांनी काही भानगडच ठेवली नाही. आता साधा फकीर व साधू दिसला की, कुत्री भो भो करून उच्छाद मांडतात. येथे दत्त नुसता साधू नसून त्याला चांगली तीन तोंडे ! मग कुत्री तीनपट जोराने भुंकणे सहाजिकच होते. म्हणून त्यांनी कुत्र्याला म्हणे आपला गुरूच करून टाकले. आता कुत्र्यात लोकाना घाबरवण्याशिवाय शिकण्यासारखा दुसरा कोणता गुण आहे, हे काही श्यामच्या लक्षात आले नाही.

ओमानला येण्याआधी येथे किती वर्ष रहावयाचे वगैरेबद्दल खूप चर्चा झाली होती. साधारणपणे दोन-तीन वर्ष रहावे असे सगळ्याचे व श्यामचे मत. पण येथे कुत्री नाहीत ह्या आनंदात श्याम मनाशी म्हणाला, येथे आयुष्यभर सुखाने रहाता येईल !

असाच दुसरा पण वेगळ्या तऱ्हेचा आनंद श्यामला ओमानला आल्यावर पहिल्या एक दोन दिवसातच झाला.

'तो कर्वे म्हणजे नुसता होयबा आहे. त्या कर्वीणबाईने दिवसाला रात्र म्हटली वा पूर्वेला पश्चिम म्हटलं तर हा होयबा दिवसाला मध्यरात्र व पूर्वेला अति-पश्चिम म्हणेल.' राधाचे हे मत फक्त कर्व्याबाबतच होते असे नव्हे तर सर्वच कर्व्यांबाबत होते. आता श्याम तरी ह्या राधाच्या बोलण्यावर काय म्हणणार ? तो मुंडी हलवत 'होय ना' म्हणाला. अर्थात श्याम राधाच्या ह्याच मतावर नव्हे तर सर्वच मतावर होय ना म्हणत असे.

श्यामच्या राहून राहून मनात येत असे

की, आपण राधाच्या प्रत्येक वाक्याला होय ना म्हणत असतो. तसेच कर्वे पण आपल्या बायकोच्या प्रत्येक म्हणण्याला 'होय ना' म्हणत असतात. मग असे असता कर्वे होय बा कसे ठरतात? ते होय ना ठरावयास पाहिजेत? हा 'ना' चा 'बा' कोणत्या आनंदीबाईने केला असेल बरे? हा प्रश्न श्यामने खूप दिवस मनाशी खेळवला पण जशी ऑस्ट्रेलियन फलंदाजाची विकेट हिंदी गोलंदाजाकडून पडता पडत नाही तसा हा प्रश्न पडता पडेना!

एकदा काय झाले की, राधा व श्यामला पुतळी आड नावाच्या कोणी कचेरीतल्या माणसाने जेवायला बोलावले होते. पुतळी म्हणजे कारवारी, हे आशा पुतळी ह्या अमेरिकेत प्रसिद्ध असणाऱ्या गायिकेचे चरित्र ज्या लोकांनी वाचले असेल त्याना सागायला नकोच. ती कारवारी मंडळी आपसात बोलत असता बायकानी काही म्हटले की नवरे लोक हमखास 'होय बा' म्हणत. ते ऐकताच श्यामच्या डोक्यात दोन तऱ्हेचे प्रकाश पडले. प्रकाश पहिला, की कारवारी नवरेही कर्व्यांसारखेच होयबा आहेत. व दुसरा, मराठीत फलाणा होय बा आहे म्हणावयाची पद्धतीचे मूळ ह्या कारवारी होयबात आहे.

मस्कतला आल्यावर श्यामला कचेरीत घेऊन जाण्यात आले. प्रथम तो एका कनिष्ठ अधिकाऱ्याकडे गेला. तो कनिष्ठ त्याच्याही पेक्षा जास्त कनिष्ठाशी बोलत होता. कनिष्ठ काही बोलला की जास्त कनिष्ठ 'हाय वा' म्हणत असे. मग तो कनिष्ठ व श्याम एका मध्यम अधिकाऱ्याकडे गेले. आता तो मध्यम काही म्हणाला की तो कनिष्ठ 'हाय वा' म्हणत असे. त्याचे सगळे बोलणे अरेबिक भाषेत असल्यामुळे श्यामला बाकी काही कळले नाही तरी 'हाय वा' हा शब्द खूप परिचयाचा आहे असे त्याला सारखे वाटू लागले.

मग तो मध्यम श्यामला घेऊन मोठ्या अधिकाऱ्याकडे गेला. आता मोठा साहेब काही म्हणाला की मध्यम 'हाय वा' म्हणत होता. एकदम श्यामला आपले कचेरी–जीवन आठवले, तेथले सहकारी आठवले, कनिष्ठ, मध्यम व मोठे साहेब आठवले. मोठा साहेबाकडले काम सपताच श्याम व मध्यम बाहेर पडले. बाहेर पडता पडता श्यामने त्या मध्यमला विचारले की, हाय वा म्हणजे Yes sir ना? श्याम एका दिवसात अरेबी शिकला ह्याचे त्या ओमानीला खूप कौतुक वाटले.

ओमानला येण्याआधी तेथे किती वर्ष राह्यचे ह्यावर चर्चा चालली होती. त्या वेळी राधा म्हणाली होती–'पण तुमचे ओमानला रहाणे जसे तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे तसेच त्या ओमानी लोकावर पण आहे.' अर्थातच त्यावर श्यामने, होय ना, म्हणून मुंडी हलवली होती.

आता त्या मध्यमाच्या मागे मागे त्या थंडगार कॉरीडॉर मधून जाता जाता श्यामच्या मनात आले, की अरेबी भाषेतला सगळ्यात महत्वाचा शब्द म्हणजे 'हाय वा' व मी तो एका दिवसातच शिकलो आहे. आता हे ओमानी लोक मला वर्षोनवर्षे ठेवून घेतील! □

पुस्तके

# परवाची गोष्ट

आमच्या ग्रंथालयात दोन व्यक्ती येतात त्या अशा आहेत की, आमच्या लायब्ररीत येणाऱ्या पुष्कळ लोकाना ते ओळखतात. त्या व्यक्ती म्हणजे (१) श्री. श्री. ज. जोशी (२) श्री. दिनकर लोखंडे. त्यापैकी श्री. जं.च्या ओळखी बघून तर अंगावर शहारेच येतात! आमच्या ग्रंथालयात कुणाचा पाय पडला की, जोशीबुवांनी त्यांच्या अस्सल पुणेरी शैलीत, 'काय, कसं काय?' असे विचारलेच समजा. पुष्कळ वेळा समोरची व्यक्तीसुद्धा अस्सल मुबईच्या शैलीत 'ठीक आहे?' असे विचारीत असते. जोशीबुवाच्या गोष्टीवेल्हाळपणामागे एक चांगलेच 'श्रूड माइंड' आहे, हे मी हेरले होते. परंतु श्री. दिनकर लोखडे यांच्या गोष्टीवेल्हाळपणामागे एक अंतर्मुख मन दडलेलं असेल, अशी शंका माझ्या मनात कधीच आली नव्हती. या पुस्तकाच्या निमित्ताने त्याची तीन–चार तास भेट झाली. नंतर त्याचे पुस्तक वाचले व या दिनकर लोखंडेविषयी माझे मत बदलले. त्यांच्याठायी एवढी चिंतनशीलता असेल असे वाटत नव्हते!

नाण्याची दुसरी बाजू बघण्यात हे श्रीखंडे का लोखंडे, एक्स्पर्ट आहेत. बोलण्यात जाता जाता ते अशी काही असाइड मारतील की यंव! मला ते म्हणतात कसे – ' – तुम्ही कधी लाडोबा म्हापणकरचं लेखन वाचलं आहे?' 'माणूस' मध्ये ते भविष्य लिहित असत नाही?' मी विचारले. पण आतल्या आत सर्दच झालो! पण हे लोखंडे बोलताना लोखंडी 'असाईड' मारतात तशी लिहिताना कधीच मारत नाहीत! ही त्यांची निश्चितच खर्चाची बाजू! असो. असो. पण त्यांच्या इतर जमेच्या बाजू बऱ्याच आहेत. त्या आपण बघू या.

या पुस्तकाचं मुख्य आकर्षण म्हणजे चिंतनशीलता, हे मी आधीच सांगितलं आहे. दुसरं आकर्षण म्हणजे सात–आठशे शब्द. शब्दांची काटकसर. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात असं 'इन्स्टंट' लेखनच लोकांना आवडतं. पण या काटकसरीबरोबर लिखाणात थोडी जर आक्रमकता असती तर हे लेख अधिक वाचनीय झाले असते. थोडी मिस्किलता, जी त्यांच्या बोलण्यात नेहमीच कमी-अधिक असते, ती जर लिखाणात शिरली असती तर बरे झाले असते, असे मला तरी वाटते.

एकदा कै. दि. बा. मोकाशी म्हणाले होते की, त्यांना घट्ट आवळलेलं, टेन्स लिखाण आवडत नाही. त्यांच्या स्वभावाप्रमाणेच त्यांचं लिखाण नेहमी संथ व शांत असे. लिखाणाची शैली एकाच ढाच्याची ठेवली तर त्याची वाचनीयता कमी होते, हे तर उघडच आहे. माझ्या ग्रंथालयातील बऱ्याच वाचकांनी अशा एकसुरी लिखाणाबद्दल अनेक वेळा असमाधान व्यक्त केले आहे. एक एन्टरप्राईझिंग वाचक तर असं म्हणाला होता की, असे खाच-खळगे नसलेलं वाचन केलं की पॅसेंजर ट्रेनने प्रवास केल्यासारखं वाटतं!'

पण श्री. लोखंडे याच्या शैलीची संथता विषयाच्या वैविध्यतेने भरून निघते. इथे जॉकी कार्ल उम्रीगर आहे. इथे सामान्य माणसे आहेत, शेवटी, स्वतःचे आजारपण व 'लेखक' ही अक्षरे चिकटली, त्या विषयीची आठवण आहे, त्याचे मित्र आहेत,

ट्रकच्या मागील प्रबोधनांची पाटी आहे (जगा आणि जगवा) असे अनेक वेगवेगळ्या तळ्यात लोखंड्यांनी खडे टाकलेले आहेत. कारण हे लेख म्हणजे असे उमटलेले संथ तरंगच आहेत. इथं एक प्रकारचं सखोल नाही, पण ' मिडयम ' टाइपचं थिंकिंग आहे. ' मिडियम ' म्हणजे असं की, इथे टोकाचे विचार नाहीत, अतिरेकीपणा नाही, पण एका तरंगामुळे उठलेले दुसरे तरंग, अशी समकेंद्रित वलये आहेत. एक प्रकारच्या स्मरणसाखळीचे ' फोजिंग ' आहे, पण 'मिडियम ' ते आहेच !

एकदा श्री. लोखंडे आमच्या ग्रंथालयात बसले होते. एखाद्या लहान मुलाने जशी एकदम हाफपँट खाली करून 'नुन्नी' 'नुन्नी' दाखवावी तसा त्यांनी आपला शर्ट एकदम बाजूला सारून मला, त्यांच्या छातीत बसवलेले पेसमेकर दाखवले. मी पण बघणाऱ्या दुसऱ्या लहान मुलाइतकाच प्रभावीत झालो होतो. मी आतापर्यंत असं काही पाहिलंच नव्हतं. हिचकॉकनी पेसमेकर बसवलं होतं असं कितीतरीवेळा वाचलं होतं. म्हणजे पेसमेकर बसवल्यामुळे माणूस चिंतनशील होतो असे नव्हे. पेसमेकर बसवलेले काही हिचकॉकसारखे शेवटपर्यंत बहिर्मुख रहातात. तर इतर काही श्री. लोखंडेसारखे ' संतुलित अंतर्मुख ' रहातात. हा एक ज्याचा त्याचा ' डेस्टिनी'चा भाग आहे.

हे लेख ' विशाल-सह्याद्री ' वाचणाऱ्यांना नवीन नाहीत. १९७९ मध्ये ते या दैनिकात प्रसिद्ध झाले होते. हे लेख थेट हृदयाला जाऊन भिडतात वगैरे ' क्लीशे '-(cliche) टाइप भाषा मी वापरणार नाही. असे कायम ठशाचे ठोकळे वापरल्याने वाचकालाही ' न्याय ' देता येत नाही !

अगदी अलीकडे भाषेला मुरड किंवा ' ट्वीस्ट ' देण्याची एक नवीन लेखनशैली इंग्रजी भाषेत आली आहे. तशी ही शैली ' टाईम ' ने त्याच्या जन्मापासून अंगीकारली आहे. ' To get the hang of it हा इंग्रजीत एक वाक्प्रचार आहे. त्याचा ढोबळपणे अर्थ म्हणजे, त्याला त्या विषयाचा रोख (general idea) लक्षात आला. आता समजा, एखादा त्याच्या क्षेत्रात पडला किंवा तडफडला तर ' टाईम ' यावर म्हणेल, 'He got the fall of it ;' सॅम्युएल बेकेटने त्याच्या एका कवितेच्या पुस्तकाला Whoroscope (whores !) अशी Horoscope न बघून कलाटणी दिली होती ! अगदी अलीकडे इंग्रजी भाषा अशी पिळगुटणारी एक छान बाई आहे. या बाईने एक छान पुस्तक काढले आहे. हवं तर असं म्हणा की, या बाईने इंग्रजी भाषेला छान लपेटली आहे. सराईतपणे पिळगुटली आहे ! ही बाई भारतीय आहे. तिचे नाव आहे गीता मेहता. तिने 'कर्मा-कोला' नावाचे इंग्रजीत एक हेटाळणीपूर्ण पुस्तक लिहिले आहे. भाषेला मुरड घालण्याचे इथे अक्षरशः पेव फुटले आहे. बाई नटण्या-मुरडण्याने छान दिसते, तशीच पिळगुटण्याने निदान गीता मेहताची भाषा पण छान दिसते. लग्नात कोरे शालू घालून जाताना बायकाचा घोळका दिसला की, नवीन कपड्याचा अगदी वास येतो. तसाच वास गीता मेहताच्या भाषेला येतो. श्री. दिनकरराव लोखंडे, हा लाडोबाच्या वेळचा धनुर्धारीपणा नाही.

लोखंडेनी पण मराठी वाक्प्रचाराना अशा 'ट्विस्टस्' दिल्या आहेत. मराठीत असं कुणी केलेलं मला तरी स्मरत नाही. निदान अलीकडे तरी नाही. ' महानपण दे रे देवा ''सुखी माणसाची पिशवी' 'डोळे हे कलमी...अरे... ' परी 'नाम' रूपी उरावे. ' वाक्प्रचाराला असे पिळगुटणे ही तशी फार मोठी बाब नाही. परंतु त्याने वाचनीयता निश्चितच वाढते. भाषेचा गुळगुळीतपणा आणि मिळमिळीतपणा कमी होतो, हा ' जाता जाता ' (!) एक फायदा होतो.

एकदा श्री. अनील अवचट 'फिनिक्स'मध्ये बसले होते. (विषय पुस्तकपरीक्षणाचा होता म्हणून सांगतो !) 'अलीकडची परीक्षणे जाता जाता बरंच काही सांगून जातात !' असे ते म्हणाले ! तेव्हापासून मी तो वाक्प्रचार कधीच वापरला नाही. तेव्हापासून असे कायम ठशाचे ठोकळे वापरायला मी कचरतो. अवचटच ते ! जे काही थोडे गुळगुळीत भाषा न लिहिणारे आहेत त्यापैकी निश्चितच एक. परीक्षण लिहायला अशा ' गाईडलाईन्स ' मिळाल्या की बरे होते.

नाही तर काय सॅम्युएल बेकेट म्हणतच होते. स्वतःच्या भाषेत न लिहिणे हा एक मोठा फायदा आहे ! स्वतःच्या भाषेत माणूस वाट्टेल ती वटवट करतो, पण परकी भाषा बोलायची झाली की नेमकेपणा व मुद्देसूदपणा येतो. हा इंग्लीश (आयरीश) माणूस फ्रेंचमध्ये आधी लिहून मग स्वतःच्या मातृभाषेत भाषांतर करीत असे ! काय पण माणसं !

श्री. लोखंड्याकडून आणखी अशाच एका संथ, समकेन्द्रित वलयाचं पुस्तक प्रसवेल अशी आशा वाटते. पण ही वलये मोठा खडा टाकल्यासारखी अधिक घट्ट असावीत. अधिक रुंद असावीत. कधी मोठे खडे, कधी छोटे खडे ! तसे ते कागदातच मुरलेले. आधी जोशी-लोखंडे वगैरे.

आता लेखक !

—जे. एन. पोंडा

लेखक-दिनकर लोखंडे
पृष्ठ ११८, रु. १२/-


– नवीन दाखल झालेली पुस्तके –

१. नवरत्ने हरपली रणांगणी (पानिपत युद्धाच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी)-कै. वासुदेव बेलवलकर
२. संसार (कथासंग्रह)-वसुधा पाटील
३. भ्रष्टाचार्य अंतुले (राजकीय)-माधव गडकरी
४. मी-दुर्गा खोटे (आत्मचरित्र)
५. उध्वस्त विश्व-गंगाधर गाडगीळ
1. The Parsifal Mosaic (Best-seller)-Robert Ludlum
2. A Fourth Cnnings with Cardus (Cricket)-Neville Cardus
3. The Wind Chime Legacy (A Superfast Political Thriller)-A. W. Mykel

*PHOENIX–The library which constantly adds new dimensions to reading !*

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७, सदाशीव पोस्टासमोर, पुणे ३०.

**If you are a**

# MANUFACTURER/EXPORTER/IMPORTER

**you can't do without these**

# REFERENCE PUBLICATIONS

**REGISTER YOURSELF WITH THE DIRECTORATE OF PUBLICATIONS, CUSTOMS AND CENTRAL EXCISE TO GET REGULAR INFORMATION THROUGH THE FOLLOWING PUBLICATIONS (BILINGUAL : ENGLISH–HINDI).**

| | | Annual Subscription |
|---|---|---|
| 1. | All Customs & Central Excise notifications including Central Excise Tariff Advices | Rs. 350/– |
| 2. | All Customs & Central Excise notifications including Central Excise Tariff Advices and quarterly compilation of all notifications. | Rs. 374/– |
| 3. | All Customs notifications only. | Rs. 175/– |
| 4. | All Customs notifications and quarterly compilation of Customs notifications. | Rs. 187/– |
| 5. | All Central Excise notifications including Central Excise Tariff Advices. | Rs. 175/– |
| 6. | All Central Excise notifications and quarterly compilation of notifications. | Rs. 187/– |
| 7. | Quarterly compilations of Central Excise notifications incorporating all notifications issued during the quarter. | Rs. 12/– |
| 8. | Quarterly compilation of Customs notifications incorporating all notifications issued during the quarter. | Rs. 12/– |

This Directorate will also bring out the Central Excise Tariff Working Schedule and Customs Tariff Working Schedule shortly after the enactment of the Finance Bill, 1982.

For registration, write to the Administrative Officer, Directorate of Publications, Customs & Central Excise, Central Revenues Building, New Delhi enclosing a Demand Draft towards the subscription for the year 1982–83 for the publications for which you would like to register. These publications are mailed to the registered subscribers promptly. For further details please contact :

**The Public Relations Officer,**
**DIRECTORATE OF PUBLICATIONS,**
**CUSTOMS AND CENTRAL EXCISE,**
**Central Revenues Building,**
**New Delhi - 110 002**

davp 81/360

# लाला हरदयाळ होते तरी कोण?

# साम्यवादी? हिंदुत्ववादी? स्त्रीमुक्तीवादी? सुधारणावादी?

## लेखक : र. धों. घाणेकर

राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने परतंत्र राष्ट्रांना दोन अत्यंत महत्त्वाच्या चळवळी उभारावयाच्या असतात. त्या म्हणजे (१) प्रत्यक्ष देशात राज्यकर्त्यांच्या विषयी जनतेत तिरस्काराची व सूडाची भावना निर्माण करीत सशस्त्र–क्रांतीचे यज्ञकुंड जागृत ठेवणे व (२) जेत्यांच्या शत्रूंशी मैत्री संपादन करून, परस्पर बाहेरून सशस्त्र क्रांतीचा उठाव करणे. हिंदुस्थानात प्रसिद्ध क्रांतिकारक रामसिंग कुका व वासुदेव बळवंत फडके ह्यांचे उठाव सोडले तर, सन १८५७ च्या पहिल्या क्रांतियुद्धानंतर बरोबर ४० वर्षांनी क्रांतीची पहिली ठिणगी पडली ती २२ जून १८९७ ह्या मंगल दिवशी! त्यानंतर पुढील पन्नास वर्षे सशस्त्र क्रांतिकारक ब्रिटिश राज्यकर्त्यांच्याबरोबर निरनिराळ्या मार्गांनी टकरा देतच होते. राज्यकर्त्यांनी १९०५ सालात बंगालच्या फाळणीची घोषणा केली अन् टिळक, रवींद्रनाथ, अरविंद घोष, देऊसकर, रजनीकांत दास, लजपतराय, ब्रह्मबंध, बिपिनचंद्र पाल, सतीश मुकर्जी अन् अश्विनीकुमार दत्त ब्रिटिश राज्यकर्त्यांवर जबरदस्त प्रहार करीत राहिले. तसेच, हिंदुस्थानच्या बाहेरही चळवळ उभारली जावी व पारतंत्र्य झुगारून देता आले तर पहावे असा दृष्टिकोण डोळ्यापुढे ठेवून बुद्धिमान, तरणेबाड क्रांतिवादी ध्येयनिष्ठ हिंदू, शिक्षणाचे निमित्त पुढे करून परदेशात धाडले जाऊ लागले. अशा तरुणांमध्ये सावरकर. तारकनाथ दास, लाला हरदयाळ, बापट, भूपेंद्रनाथ दत्त, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, चंदा चक्रवर्ती व धीरेंद्रनाथ सरकार ह्यांचा नामनिर्देश करावाच लागतो. ह्यातील प्रत्येकाने आपआपल्या ताकदीनुसार सशस्त्र क्रांतिकारी चळवळ नेटाने उभारली व पुढे खेचत नेली. युरोपमध्ये ह्या तरुणांना ज्यांची फार मोठी महत्त्वाची मदत झाली अशांमध्ये श्यामजी कृष्ण वर्मा, बॅ. राणा व मॅडम कामा ह्या त्रिमूर्तींची नोंद करणे अत्यावश्यक आहे. पुढे उभारल्या गेलेल्या क्रांतिमंदिराच्या पायाचे भक्कम चिरेबंदी चिरे म्हणजे हे तीन ज्येष्ठ व श्रेष्ठ क्रांतिकारक. १९०५ ते १९१९ ह्या महत्त्वाच्या कालखंडामध्ये वरील दोन्ही प्रकारच्या चळवळी प्रचंड प्रमाणावर झाल्या व राज्यकर्त्यांना चांगलीच दहशत बसली. झाली त्यापेक्षाही प्रचंड व परिणामकारक चळवळ व उठाव हिंदुस्थानच्या बाहेर हिंदू क्रांतिकारकांना करता आला असता; परंतु नेतृत्वाचा अभाव व ब्रिटिशांनी पेरून ठेवलेले हेरांचे जाळे, ह्यामुळे पहिल्या महायुद्धाची पर्वणी येऊन देखील, हिंदुस्थान स्वतंत्र होऊ शकला नाही! परंतु, हे मात्र निश्चितच की हिंदू सशस्त्र क्रांतिकारकांची जी पुढची पिढी जन्माला आली, त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जोराची मुसंडी मारली अन् १९४७ साली पारतंत्र्याचे जू झुगारून दिले. अशा ह्या दैदिप्यमान कालखंडात सशस्त्र क्रांति–विचारांनी पछाडलेल्या हिंदू तरुणांनी कोणता वाटा उचलला हे अचूक ध्यानात येण्यासाठी त्या वेळच्या प्रत्येक क्रांतिकारकाची जीवन–चरित्रे अभ्यासावी लागतातच. त्या दृष्टिकोनातून पंजाबचे लाला हरदयाळ ह्यांचा जीवनपट न्याहाळावा लागेल. चरित्र म्हणून नव्हे, तर व्यक्तिदर्शन म्हणून निष्कपटी, सत्यनिष्ठ, बुद्धिमत्ता, कर्तृत्ववान 'बालकाप्रमाणे निरागस व कमलपुष्पाप्रमाणे कोमल व मृदू मन, औदार्य, नम्रता व मानीपणा–इतका गुणसंचय असूनदेखील आणि ऐन तारुण्यात सावरकर, बॅ. राणा, मॅडम कामा, परमानंद, लजपतराय ह्यांचे सान्निध्य लाभूनदेखील, पहिल्या महायुद्ध-कालामध्ये सशस्त्र क्रांतिकारक न बनता, हरदयाळ नुसतेच 'क्रांती'वर लेख खरडणारे क्रांतिदर्शी ठरले. ध्येयनिश्चिती व ध्येयनिष्ठा नसल्यामुळे हरदयाळांचे जीवनपुष्प पुरे न खुलताच सुकले व निर्माल्यवत झाले.

हरदयाळांचा जन्म ऐन क्रांतिकालात–सन १८८४ मध्ये–झाला. अत्यंत तेजस्वी व प्रखर बुद्धीच्या ह्या विद्यार्थ्याचा खालपासून तो थेट वरपर्यंत कायम पहिला क्रमांक म्हणूनच शासनाची त्यांना शिष्यवृत्ती मिळाली अन् १९०५ मध्ये ते इंग्लंडला गेले. का कोण जाणे पण आर्यसमाजिस्ट स्वामी दयानंदसरस्वती, ब्राह्मो समाजाचे राममोहन रॉय, सनदी नोकर रोमेशचंद्र दत्त, अरविंद घोष व पुण्याचे रँग्लर परांजपे ह्या पाच रत्नांचा जीवनपट हरदयाळाच्या भोवती सारखा घिरट्या घालीत राहिला व कदाचित् त्यामुळेच ते सशस्त्र क्रांतिकारकांची दाहक चळवळ पचवू शकले नाहीत. अस्थिर व धरसोड वृत्ती होती, तरी जात्याच पिंड लेखकाचा असल्यामुळे ते निरनिराळ्या विषयावर अमाप लेखन करीत. परंतु त्यांच्या लेखनाचे विषय असे चमत्कारिक की एकमेकांशी कोणताच संबंध नसून त्यात ध्येयनिश्चितता तर मुळीच नव्हती. उदाहरणार्थ (१) संपूर्ण त्यागी जीवन हेच मानवाचे परमोच्च कल्याण, (२) गोमातेचे रक्षण झालेच पाहिजे (३) आग लागो ह्या सामाजिक सुधारणांना. (४) पश्चिमेला चला व सुबुद्ध व्हा, (५) जर्मनी व तुर्कस्थानमधील माझे ४४ महिने, (६) ब्रिटिश–साम्राज्य हे वरदान आहे. (७) बुद्धवाद. (८) वैदिक काळातील सामाजिक क्रांति (९) नैराश्यवाद (१०) मार्क्सवाद हाच आपणास तारील (११) दहशतवाद हा एक थिल्लरपणा आहे.

ह्या लेखनात वैचित्र्य व बहुढंगीपणा सापडतो; परंतु वैचारिक एकजिनसीपणा व ध्येयनिश्चिती मात्र कोठेच प्रत्ययास येत नाही.

नाही म्हणावयाला सन १९१३ व १९१४ ह्या काळात त्यांनी केलेले 'गदर' साप्ताहिकातील लिखाण, 'गदरकी गुंज'मधील बरीचशी क्रांतिगीते, 'शाब्बास' नावाचे जहाल परिपत्रक ही त्यांच्या तेजस्वी व तल्लख बुद्धिमत्तेची व देशस्वातंत्र्याबद्दलची तळमळ जरूर दाखविते. असे असूनदेखील १९१५ सालानंतर हरदयाळांच्या डोक्यातून 'बॉम्ब–सशस्त्र क्रांती–पिस्तुले' हे विषय जे एकदा सटकले, ते कायमचेच! उर्वरित आयुष्यात त्यांच्या प्रभावी लेखणीतून ते कधीच बाहेर पडले नाहीत–डोक्यात तो विषय चुकून आलाच तर त्यांची लेखणी कापायला लागायची–अडखळायची. प्रचंड व अवाढव्य वाचनाची आवड अन् त्याबरोबरच प्रखर आणि तेजस्वी बुद्धीची जोड असा दुर्मिळ सगम त्यांच्यामध्ये झाला होता. तरी ध्येयवादाची अनिश्चितता राहिल्यामुळे, मन एकीकडे तर लिखाण तिसरीकडे भरकटलेले, असेच झाले. अभ्यास करून काटवाद मार्क्सवाद, सशस्त्र–क्रांतिवाद, हिंदुत्ववाद, गांधीवाद, नैराश्यवाद, निःसंगवाद व बौद्धवाद अशा सर्व 'वादां'वर त्यांनी एकाच वेळी झडप घालण्याचा प्रयत्न केला. आपल्या दृष्टिकोनातून त्यावर उत्कट भावनेने लेखन केले, स्वत:ची बहुरंगी व बहुढंगी भूमिका उत्कृष्टपणे वठविली आणि अशी भूमिका रंगवीत रंगवीत परिस्थितीशी उलटल्यावर ते कट्टे ब्रिटिश साम्राज्यवादी बनले! हिंदुधर्माचा त्याग करून बुद्धधर्मीय झाले आणि शेवटी अगडा एरिकसन् ह्या स्वीडिश युवतीबरोबर संसार थाटून बसले!

कल्पना व रूप ह्याचा सुसंवाद हे जर यशस्वी कलाकृतीचे मूळ मानले तर असे म्हणता येईल की, हरदयाळांच्या जवळ विस्तीर्ण व अफाट कल्पनासाम्राज्य होते; पण त्याला योग्य रूप, आकार व वळण लावण्याइतके प्रखर आत्मबल त्यांच्यापाशी नव्हते अन् म्हणून त्यांची प्रत्येक साहित्यकृती ही निर्जीव व अल्पायुषी ठरली. त्यांच्या तल्लख मेंदूतून कसबी गवयासारखे सप्तरंगी सूर सपासप बाहेर पडत, ओघळत; पण ते दिवाणे सूर एका लयीतून दुसऱ्या लयीत गेले की मूळ ठेक्यावर व समेवर कधीच येत नसत, कुठे भरकटत जात हे त्यांचे त्यानाच कळत नसे. जीवन–सुसंवाद हा त्याना कधीच साधला नाही. भाई परमानंदांची जर भेट झाली नसती तर? १ नोव्हेंबर १९१३ ते २० मार्च १९१४ ह्याकाळात 'गदर' साप्ताहिकाचे संपादक ह्या नात्याने त्यांच्या हातून क्रांतीवरील लेख तरी लिहून झाले असते की नाही, ही शंका येते.

## बॉम्ब आणि आश्रम

१९०५ च्या ऑगस्ट महिन्यात ऑक्सफर्ड येथे शिक्षणासाठी गेलेले हरदयाळ ऑक्टोबर १९०६ मध्ये हिंदुस्थानात येऊन पुनः इंग्लंडला परतले. ह्या वेळी भारत–भवनमध्ये असलेले सावरकर ह्यांच्याशी त्यांचा परिचय झाला. काही महिन्यांनंतर अभिनव भारत संघटनेचे ते शपथबद्ध सभासद झाले. वाचन अन् लेखन ह्यात मग्न झालेल्या सावरकरांची त्यांच्यावर विलक्षण मोहिनी पडली. त्यातच लाला लजपतराय व अजितसिंग ह्यांना हिंदुस्थानात अटक झाल्याचे समजल्यानंतर त्यांचे मन एकदम उदास, विषण्ण व निरुत्साही झाले. हिंदुस्थानात जाऊन आपण स्वतः राजकीय उत्थापनाचे कार्य करता आले तर पहावे अशी हरदयाळांच्या डोक्यात सणक आली मात्र! त्यांनी ताबडतोब १८–९–१९०७ ला सरकारी शिष्यवृत्तीचा त्याग केला, अन् पत्नीसह फेब्रुवारी १९०८ मध्ये ते हिंदुस्थानात परतले. आचार, विचार अन् पेहराव ह्यांच्यात संपूर्ण बदल झालेला पाहून त्यांच्या सर्व आप्तांना व स्नेहीमंडळींना जरा चमत्कारिकच वाटले. काही दिवस घरी राहून नंतर ते जे निघाले ते थेट पुण्याला टिळक व गोखले अन् नंतर कलकत्त्याला जोगेंद्र मोहन चतर्जी व द्वारकानाथ बोस ह्यांना भेटून लाहोराला गेले. तेथे त्यांनी एक हिंदू आश्रम स्थापन केला. घराबाहेर पाटी लावून ठेवली. 'No admission to Europeans and Christian' आश्रमात रहाण्यास कोणी विद्यार्थीच आला नाही म्हणून ते जरा खट्टू झाले; परंतु तितक्यात ३० एप्रिल १९०८ ह्या दिवशी मुझफरपूर येथे क्रांतिकारक खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी ह्यांनी अणुबमचा पहिला धुमधडाका उडविला! हिंदुस्थानात 'बॉम्बयुग' अवतरल्याची ती एक झलक होती.

अणुबमच्या त्या धुमधडक्याने हरदयाळांच्या कानठळ्याच बसल्या. छाती फाटून पाय लटलटा कापायला लागले. लाहोर सोडून ते कानपुरास गेले. तेथे एक हिंदू आश्रम स्थापन करण्याच्या हेतूने त्यांनी अमीरचंद व त्यांचे पिताजी ह्यांच्यापुढे एक आराखडा टाकला. ते कुटुंब फार वर्षांपासून त्यांच्या परिचयाचेच होते; पण अमीरचंद हाडाचे सशस्त्र क्रांतिकारक होते, हे त्यांना मुळीच माहीत नव्हते. ज्वलंत जहाल क्रांतिविचारांनी भारलेल्या हिंदू तरुणांची त्या वेळी तेथे एक संघटना होतीच. ह्या संघटनेतील प्रत्येकजण म्हणजे मूर्तिमंत ज्वलंत अणुबमच होता. कधी स्फोट होईल व कोणाच्या नरडीचा केव्हा अन् कसा घोट घेतला जाईल, हे समजणेच अशक्य होते ह्या संघटनेचा हरदयाळांना वास लागला मात्र, त्यांनी तेथून हळूच काढता पाय घेतला व १५ ऑगस्ट १९०८ ला जे पलायन केले ते थेट बोटीने लंडनला! हिंदुस्थानात राजकीय उत्थापन व क्रांती करण्याच्या उद्देशाने सरकारी शिष्यवृत्तीचा त्याग करून फेब्रुवारी १९०८ मध्ये लंडनहून हिंदुस्थानात दाखल झालेले हरदयाळ ३० एप्रिलच्या खुदिराम व चाकी ह्यांच्या अणुबमच्या आवाजाने इतके बेचैन झाले की तडकाफडकी तीन महिन्यातच पुनः लंडनला परतले. सगळेच विचित्र व चमत्कारिक!

कानपूरच्या सशस्त्र–क्रांतिकारकांच्या संघटनेतील प्रत्येक तरुणाला पुढे हौतात्म्य पत्करावं लागलं. चतर्जी, सुफी अंबाप्रसाद, अजितसिंग, बालमुकुंद, अवध बिहारी, बसंत विश्वास, अमीरचंद–हे सर्व शूर हिंदू क्रांतिकारक हसतखेळत फासाची दोरी स्वत:च्या हाताने स्वत:च्या गळ्यात अडकवून घेणारे बेडर तरुण! पहिल्या महायुद्धात जर्मनीत ज्यांची हाडे खिळखिळी केली व चीरफाड करून टाकली त्याच महायुद्धकालात, त्याच ब्रिटिश राज्यकर्त्यांनी रक्ताची चटक लागलेल्या लांडग्याप्रमाणे ह्या तरुण हिंदू क्रांतिकाऱ्यावर झडप घातली! ह्या व इतर अनेक हिंदू क्रांतिकारकांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबामधून पुढच्या दुसऱ्या महायुद्धकालात हजारो क्रांतिकारक निर्माण झाले अन् त्यांच्याच कर्तृत्वाने ब्रिटिश साम्राज्य खच्ची झाले, धुळीला मिळाले! धरपकडीच्या ह्या सत्रातून फक्त चारच क्रांतिकारक निसटले व ते म्हणजे रासबिहारी बोस, जितेन्द्रनाथ बानर्जी, डॉ. यदुगोपाळ मुकर्जी अन् जितेंद्र मोहन. १९१५ साल गाजले, ते असे.

ह्या शूर वीरांचे हौतात्म्य कळल्यावर स्विझर्लंडला असलेल्या

हरदयाळांना त्यांच्यावर लेख खरडण्याची स्फूर्ती झाली. त्यांनी लेख लिहिला. ' Rise and Liberate your motherland in chains like Prometheus Bound ' भडक अन् कडक लेख खरडला की सशस्त्र क्रांती झालीच असा त्यांचा समज झाला असावा !

२० डिसेंबर १९०८ ला लंडनच्या कॅक्स्टन हॉलमध्ये गुरु गोविंदसिंगाचा जन्मदिन साजरा झाला. त्याला हरदयाळ हजर होते; परंतु सावरकरांच्या भारत भवनकडे ते फिरकलेच नाहीत; कारण सावरकर, बापट, बोस वगैरे तरुण हिंदू क्रांतिकारक बाँब तयार करण्याचे प्रयोग व पिस्तुले हाताळण्याचे शिक्षण घेत असल्याचे त्यांच्या कानावर आलेले होते. सर्वसंगपरित्याग करून एकाकी जीवन व्यतीत करण्याचे हरदयाळांचे प्रयोग या वेळेपासून सुरू झाले.

सशस्त्र क्रांती ही बुद्धिवादाच्या निकषावर कधीच पडताळून पहाता येत नाही. त्यात साहस, बेडरपणा व वैचारिक झेप फार प्रचंड असते. बुद्धिवादी व बुद्धिनिष्ठ हरदयाळ क्रांतिकल्पनेत तरळत राहिले पण प्रत्यक्ष क्रांतिकार्यापासून चार पावले दूरच ! क्रांतिकार्यात झोकून देणाऱ्याचे जीवन प्रचंड सामर्थ्याने व आत्मविश्वासाने भारावून गेलेले असते. स्वतःचे जीवन–सर्वस्व त्यात ते ओतीत असतात अन् त्यांना जिवाची मुळीच पर्वा नसते. त्यांचा ध्येयवाद अत्यंत प्रखर असतो. ते ध्येयवेडे असतात, पछाडलेले असतात. त्यांचे अग्निकुंड कायमचेच धगधगत असते. नैराश्यवाद त्यांच्या हारीमोरी उभा राहूच शकत नाही. हरदयाळ लेखनात आशावादी होते; परंतु प्रत्यक्ष क्रांतिकार्यात संपूर्ण नैराश्यवादी. ' स्वातंत्र्यसंपादनाकरता हिंदू तरुणांनी काय करावयास पाहिजे ? ह्यावर ते समर्थपणे पानेच्या पाने खरडीत परंतु स्वतः काय करावयास पाहिजे, हे त्यांना शेवटपर्यंत उमगलेच नाही आणि म्हणूनच त्यांच्यासारख्या बुद्धिमंताची एका अर्थाने शोकान्तिका झाली. सावरकरांच्यासारख्या तेजोगोलकाच्या सान्निध्यात राहून, ऐनजवानीत देशस्वातंत्र्यासाठी सशस्त्रक्रांती करण्यास उत्सुक व उतावीळ असलेले हरदयाळ–नाही क्रांतिकारक झाले, नाही योगपुरुष झाले; नाही त्यागी जीवन जगले...आयुष्यात काहीच करू शकले नाहीत; तर १९१९ पासून १९३० पर्यंत ब्रिटिश सरकारच्या दरवाजाशी ' मला इंग्लंडला येऊन रहाण्याची परवानगी द्या.मी ब्रिटिश साम्राज्याचा मित्रच आहे,'अशी याचना करीत राहिले! लंडनमधील ' भारतभवन ' हे सावरकरांच्या अटकेनंतर श्यामजी कृष्णवर्मांनी विकून टाकले व ते स्वतः पॅरिसला स्थायिक झाले अन् लंडनला वास्तव्य करून रहाणाऱ्या क्रांतिकारकांची पण पांगापांग झाली. श्यामजींचे ' इंडियन सोशिऑलॉजिस्ट ' हे पाक्षिक पॅरिसहून निघू लागले व त्याचे संपादकत्व हरदयाळांनी स्वीकारले. १ जुलै १९०९ ह्या दिवशी शूर मदनलाल धिंग्राने सर कर्झन वायलीचा भर लंडन शहरात बळी घेतल्यामुळे लंडन शहरात दहशतीचे वातावरण फैलावले. ब्रिटिशांना जबरदस्त हबका बसला ! हरदयाळांनी पॅरिस सोडले व जिनेव्हा गाठले. तेथून ते ' वंदे मातरम् ' ह्या पाक्षिकाचे संपादकत्व करू लागले. पहिल्याच अंकात त्यांनी इंडियन नॅशनल काँग्रेसचे सुरेन्द्रनाथ बानर्जी व गोखले ह्यांच्यावर टीकेची झोड उठविली व हुतात्मा मदनलाल धिंग्रा ह्यांचे अभिनंदन करून त्यांचा 'एक शूर लढवय्या हिंदू क्रांतिकारक ' म्हणून गौरव केला पण चमत्कारिकपणा असा की, ह्याच हरदयाळांनी पुढे २६ मार्च १९१४ रोजी कालिफोर्नियात अटक झाल्यावर जी पोलिसांच्यापुढे जबानी नोंदविली त्यात ह्याच शूर क्रांतिकारक धिंग्राचा धि:कार केला !

१९०९ पासून १९१३ पर्यंत युरोपमध्ये निरनिराळ्या ठिकाणी राहून त्यांचे वाचन व लेखन चालूच होते; परंतु उक्ती व कृती ह्यांच्यात हरदयाळांचा कधीच मेळ बसला नाही. ' म्लेच्छांच्या सान्निध्यात कधीच येऊ नका ' असे अट्टाहासाने भाष्य व लिखाण करणारे हरदयाळ पुढे आयुष्यभर म्लेच्छांच्याच सहवासात राहिले म्लेच्छांच्याच भाषेत लिखाण करीत होते व म्लेच्छांच्याच देशात मृत्यू पावले !

दुःख होते ते अशा ह्या तरल, बुद्धिमंत, क्रांतिकारी विचारांनी तरुणपणी संपूर्ण भारलेल्या; परंतु विचित्र व चमत्कारिक वागणाऱ्या व लेखन करणाऱ्या हिंदूच्या वैचारिक ऱ्हासाचं होतं ! एक प्रचंड बुद्धिमान हिंदू वाया गेला म्हणून होत. तारुण्यात स्वातंत्र्य–संपादनाची त्यांची तीव्र लालसा पाहून, नंतरचा त्यांचा झालेला अधःपात हा तर अत्यंत खेदजनक वाटतो.

सप्टेंबर १९१० मध्ये हरदयाळांनी पॅरिसला रामराम ठोकला व ते फ्रान्सची वसाहत मार्टिनिक ह्या ठिकाणी गेले. दैववशात् भाई परमानंद इंग्लंडहून त्या ठिकाणी आले होते, त्यांची भेट झाली. हरदयाळ त्या शांत स्थळी आत्मिक बल वाढविण्यासाठी व यौगिक साधना करण्यासाठी राहण्यास गेले होते असे त्यांच्या बोलण्यात आले. परमानंदांनी त्यांची समजूत घातली. परतंत्री देशाला स्वतंत्रता मिळवून देण्यासाठी त्यांच्यासारख्या बुद्धिमान व्यक्तीची अत्यंत आवश्यकता असल्याचे त्यांच्या मनावर पुनः त्यांनी ठसविले व अखेर हरदयाळांनी फेब्रुवारी १९११ मध्ये मार्टिनिक सोडले व अमेरिका गाठली ! त्यांनी हारवर्ड युनिव्हर्सिटीत ' बुद्ध ' ह्या विषयावर संशोधन सुरू केले. तेथेच वुडस् ह्या नावाचा एक प्राध्यापक पातंजलांच्या योगशास्त्राचे इंग्लिश भाषेत भाषांतर करीत होते. त्यांच्या सान्निध्यात हरदयाळ काही काळ रमले. कालिफोर्नियात स्थायिक झालेले भाई तेजासिंग ह्यांनी हरदयाळांना अमेरिका व कॅनडा येथील शिखांची दयनीय स्थिती सांगितली व त्यांना कालिफोर्नियात येण्याविषयी विनविले. हरदयाळांनी ' बुद्धा 'वरील संशोधन थांबवले व ते मे १९११ मध्ये कालिफोर्नियात निघून गेले. कोणत्याही एका विषयाचा चिकाटीने सगतवार अभ्यास करून, त्या विषयात मन ओतून, पाठीमागं लागून, ध्येयपूर्वक निश्चित कार्यक्रम आखावयाचा हे त्यांच्यात नव्हतच. नेहमी मन सैरावैरा भटकत असे. अस्थिर असे. कालिफोर्नियात शिखांचे प्रश्न सोडविण्यास निघालेले हरदयाळ दीड वर्षानंतर तिकडं जाऊन पोहोचले ! मध्येच ' वायकिकी बीच ' येथील शांतस्थळी एकांतात बसून तपश्चर्या करणे सुरू झाले. निरनिराळ्या विषयावर लेख खरडून ते कलकत्त्याच्या 'मॉडर्न रिव्ह्यू'कडे धाडणे, हा त्यांचा उद्योग चालूच होता.वरवर हिंदुत्ववादी दिसणारे; परंतु ' जगाच्या कल्याणा ' आपण काही तरी दिव्य करीत आहोत अशी उच्च भूमिका धारण करून स्वतःलाच फसविणारे हरदयाळ बनारस येथे पंडित मदनमोहन मालवीय ह्यांनी हिंदू विश्व विद्यालय काढल्यानंतर, त्यांच्यावर तुटून पडले, त्यांच्याविरुद्ध लेख खरडू लागले. येवढेच नव्हे तर ख्रिश्चनांनी हिंदुस्थानात स्थापन केलेल्या ' डिप्रेस्ड क्लास मिशन्स 'मध्ये हिंदूंनी घुसावे व आपला

उद्धार करून घ्यावा—असले विक्षिप्तपणाचे विचार त्याच्या ह्या वेळच्या लिखाणातून आलेले पाहिले म्हणजे मन विषण्ण होते, ह्या 'मिशन्स'मध्ये गेलेले हिंदू शिक्षित वा अशिक्षित दोघेही—बूट पाटलोण वापरायला लागून बाटगे ख्रिश्चन बनले आणि हिंदूंचेच शत्रू बनले. बुद्धिवादी स्वतःची कशी वैचारिक फसवणूक करून घेतात, त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे हरदयाळ !

## अनार्किस्ट क्लब

काही महिने हवाई बेटात राहून नंतर हरदयाळ पुन: हारवर्डला गेले व तेथून त्यांनी कॅलिफोर्निया गाठला. कॅलिफोर्निया विश्वविद्यालयात 'हिंदू धर्माची मूलतत्त्वे व सिद्धांत' शिकविण्यासाठी नेमले गेलेल्या भाई परमानंदांनी ह्या हरदयाळांना प्राध्यापक पोप, जॅक लंडन, आर्वाव्हिंग स्टोन्स अन् ल्यूथर बरबॅंक ह्या विद्वानव्यक्तींच्या सहवासात बसविले. तेथेही ह्या बुद्धिमान व तल्लख बुद्धीच्या हरदयाळांच्या विचारातील व आचारातील वैचित्र्य, लहरीपणा व थिल्लरपणा ह्या विद्वान व्यक्तींच्या ध्यानात आलाच ! प्राध्यापक जॅक लंडनने 'Little Lady in a Big House' म्हणून पुढे एक कादंबरी लिहिली त्यात हरदयाळाची लहरी व बुद्धिवादी व्यक्तिरेखा रेखाटली; परंतु पात्राचे नाव घातले 'दयाळ हर !' हरदयाळांच्या लेखनात पहावे तो नेहमीच सेंटफ्रान्सिस, सेंट जॉन, रुसो व्हॉल्टेअर, मार्क्स, बाकुनिन, हेगेक ह्यांच्याच जीवनाची व ध्येयवादाची अफाट व अवास्तव स्तुती स्वतः हिंदू असून व स्वतःला ह्या वेळी हिंदू म्हणवून घेत असून, हजारो वर्षे हिंदुस्थानात नांदलेल्या भव्य आर्य हिंदूसंस्कृतीमध्ये हरदयाळाना एकही तेजस्वी व्यक्ती दिसली नाही ! दिसले ते सर्व परधर्मीय ! अलाहाबादच्या विश्वविद्यालयात ह्या वेळी असलेले रामभाऊ रानडे ह्यांनी ह्या विद्वान, पण विक्षिप्त हरदयाळांच्यावर कलकत्त्याच्या 'मॉडर्न रिव्ह्यू'मध्ये दोन सणसणीत लेख लिहून त्यांची चांगलीच खरडपट्टी काढली.

सप्टेंबर १९१२ मध्ये स्टॅनफोर्ड विश्वविद्यालयातील प्राध्यापकीचा हरदयाळांनी राजिनामा दिला व स्वतंत्र लेखन सुरू केले. १३ ऑक्टोबर १९१२ ला त्यांनी 'Fraternity of Red Flag' ह्या नावाचे एक पत्रक प्रसिद्ध केले व त्याला भरपूर प्रसिद्धी देवविली. काही दिवसांनंतर त्यांनी एक रॅडिकल क्लब स्थापन केला. त्याचे नाव होते. 'International Radical Communist Anarchist Club' सस्थेचे ध्येय व धोरण असे होते : (१) प्रत्येक सभासदाने संपत्तीचा त्याग केला पाहिजे, पैसा कमावता कामा नये. शक्य तो विवाह करू नये. सर्वसंगपरित्याग करून अत्यंत साधे जीवन जगावे. (२) साम्यवाद स्थापन करून खाजगी मालमत्तेला तिलांजली द्यावी. (३) स्वदेशाभिमानापासून दूर रहावे. धर्म, जात, गोत ही विचारात घेऊ नयेत. (४) जागतिक स्त्री-मुक्ती चळवळ उभारावी. स्त्रीला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य द्यावे व वैयक्तिक उन्नती करण्यास तिला हातभार लावावा.

ह्या संस्थेचे पत्रक बाहेर पडल्यावर एका अमेरिकन विधवेला काय पुळका आला कोणास ठाऊक, पण तिने आपली ६ एकर जमीन व स्वतःचे घर संस्थेला देणगी म्हणून दिले. हरदयाळांनी संस्थेचे पहिले नाव बदलून दुसरे नाव ठेवले. ते काय तर, 'बाकुनिन संस्था !' ह्या बाकुनिन १९ व्या शतकातील एक रशियन अराजक, बंडखोर व सर्वकष—नाशवादी Nihilist ह्या वृत्तीचा. 'राज्यांची तोडमोड करा, सामाजिक व धार्मिक बंधने झुगारून द्या, 'मार्क्सवाद' ही शुष्क ढोंगबाजी आहे, विषारी गरळ ओकणारा तो सर्प आहे—त्याच्या सान्निध्यात राहू नका !' असे धडे देणारा दहशतवादी रशियन बाकुनिन—अन् त्याच्या नावावर अमेरिकेत संस्था काढणारे हिंदू हरदयाळ ! सगळेच विचित्र व चमत्कारिक ! ह्याच वेळी 'मार्क्सवाद नीट समजून घ्या', 'श्रमजीवींची चळवळ कशी असावी ?' 'दहशतवादी चळवळ म्हणजे आत्मघातकी चळवळ' अशीही लेखमाला ते लिहू लागले.

हरदयाळ होते तरी कोण ? साम्यवादी होते, का हिंदुत्ववादी होते, का स्त्री-मुक्ती चळवळ करणारे होते, का सुधारणावादी होते—तरी कोण, हे कोडे शेवटपर्यंत कोणालाच उलगडले नाही. पाश्चिमात्य संस्कृतीचा जबरदस्त पगडा आपल्यावर आहे हे सांगताना जवाहरलाल नेहरूंनी आपल्या Towards Freedom ह्या ग्रंथात ३५३ पानावर असे लिहिले आहे A queer mixture of East and West, out-of-place everywhere, at home nowhere. I cannot get rid of either that past inheritance or my recent acquisition.'

थोड्याफार प्रमाणात हरदयाळांच्या बाबतीतही तेच दिसते.

२३ डिसेंबर १९१२ ला हिंदुस्थानात व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंजवर भर दिल्लीत सशस्त्र क्रांतिकारकांनी बॉम्ब फेकला. हे वाचून हरदयाळांनी बॉम्ब फेकणाराचे अभिनंदन केले व असे अनेक सुपुत्र जन्माला येवोत म्हणून लेख खरडला.

ह्याच वेळी स्टॉकटन् येथील एक श्रीमान शीख ज्वालासिंग हरदयाळांच्या सान्निध्यात आला. त्याने गुरु गोविंदसिंगांच्या नावाने ट्रस्ट उभा करून त्यामार्फत हिंदुस्थानातून काही तरुण बुद्धिमान विद्यार्थी शिक्षणासाठी कॅनडा व अमेरिकामध्ये आणावयाची योजना हरदयाळांच्या सल्ल्याने आखली. कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीने मदत द्यावयाचे ठरविले. १९१२ मध्ये हिंदुस्थानातून अमृतसरचा नंदसिंग, पुण्याचा कोकटनूर, मद्रासचा शर्मा, अलिगढचा महमूद व बंगलोरचा ख्रिश्चन पांडे ( Pandion ) यांची निवड झाली. विशेष उल्लेख करण्याचे कारण असे की, ह्यापैकी महमूद व पांडे ह्या दोघानाही आमिषे दाखवून ब्रिटिशांनी त्यांना हेर बनविले व क्रांतिकारकांच्यात सोडून दिले. हरदयाळांचे 'हार्डिंजवरील हल्ल्यासंबंधी' आलेले दोन लेख श्यामजी कृष्ण वर्मांनी पॅरिसमध्ये वाचले व त्यामुळे हिंदुस्थान सरकारने हरदयाळांच्यावर पाळत ठेवण्यासाठी अमेरिकेत कलकत्त्याच्या पोलीसअधिकाऱ्याला धाडून दिले. त्याचे नाव वुइल्यम हापकिनसन्. हा अधिकारी ८ जानेवारी १९१३ ला सॅनफ्रान्सिस्कोमध्ये पोहोचला. त्याला हिंदी, पंजाबी, उर्दू, बंगाली व गुरुमुखी भाषा अवगत होत्या. त्यानेच क्रांतिकारकांच्या भोवती अमेरिकेत व कॅनडात हेरांचे जाळे फेकले. त्यातीलच वर लिहिलेले महमूद अन पांडे हेर होत. ह्या दोघांनी क्रांतिकार्याची अत्यंत नासधूस केली; परंतु अखेर २१ ऑक्टोबर १९१४ ला ह्या हॉपकिनसन्चा व्हॅंक्यूव्हरच्या भर कोर्टामध्ये क्रांतिकारक मेवासिंगने मुडदा पाडला ! पावणेदोन

वर्षांच्या ह्या कालखंडात ब्रिटिश पोलीसअधिकारी हॉपकिनसन् ह्याने कॅनडा व अमेरिका येथील हिंदू क्रांतिकारकाना अत्यत सतावले. हिंदू, मुसलमान व शीख हेरांचे जाळे क्रांतिकारकांच्या भोवती फेकले. सशस्त्र-क्रातिकारी चळवळ पूर्णपणे दडपून टाकण्याचा विडा उचलला; पण अखेर क्रातिकारकांनी त्याचाही संपूर्ण नायनाट करून टाकलाच !

मे १९१३ मध्ये बर्कले ह्या गावी गोविंद बिहारीलाल, लाला हरदयाळ व करतारसिंग ह्यानी Hindu Association of Pacific Coast संघटना स्थापिली, त्या संघटनेमार्फत युगांतर आश्रम स्थापन केला. 'गदर' नावाचा राजकीय पक्ष उभारून एक साप्ताहिक काढण्याची घोषणा केली. Indian Independance League चे डॉ. पाडुरंगराव खानखोजे व पिंगळे त्यांना येऊन मिळाले. बाबा सोहनसिंग अध्यक्ष व लाला हरदयाळ कार्यवाह असा सुरेख संगम घडून आला. 'गदर पक्षाचा ध्येयवाद म्हणून काय विचारता ?' असा सवाल गदरच्या पहिल्याच अंकात ( १ नोव्हेंबर १९१३ ) संपादक हरदयाळ ह्यानी टाकला व स्वतःच उत्तर दिले : 'ब्रिटिश साम्राज्याचा नायनाट करणे व हिंदुस्थान स्वतंत्र करणे हे आपले ध्येय. ते साध्य करण्यासाठी शस्त्रधारी व्हा, झुंज घ्या. गोड बोलून अन् भीक मागून वळणारं हे घोडं नाही. उठा, मारा किंवा मरा– हेच तुमचे ह्यापुढचे कार्य !' दुसरा लेख असा होता : 'उठा, हिंदूनो, शिखांनो–उठा, शस्त्रधारी व्हा !' तिसरा लेख : 'हे १८५७ च्या हुतात्म्यानो, आम्ही तुम्हाला विसरलेलो नाही अन् विसरणे शक्यही नाही.' हरदयाळाच्या लेखाची ही सरबत्ती पुढील ६ महिने 'गदर'मार्फत चालूच होती. उर्दू, गुरुमुखी, हिंदी, इंग्लिश भाषेत त्याची कसदार लेखणी बेछूट प्रहार करीत राहिली.

'Philosophy of Bomb' ह्या सुंदर लेखात त्यानी लिहिले : 'It is the bomb that frightens the British Government into conceding rights to the people. The bomb is the messenger of mutiny and the fear of mutiny is the weapon for correcting the Government; while the general mutiny will be the means of total annihilation, bomb is the protector & benefactor of the poor and it has been brought across the seas; worship it, sing it's praise and bow to it Vande Mataram.'

३१ डिसेंबर १९१३ ह्या दिवशी सॅक्रामेंटो येथील सभेत त्यांनी स्पष्ट सांगितले की, जर्मनी व इंग्लंड ह्यांच्यात लवकरच युद्ध जुंपणार आहे. तेव्हा परदेशात राहिलेल्या हिंदूंनी ब्रिटिशाना हाकलून देण्यासाठी ताबडतोब हिंदुस्थानात जावे. त्याच सभेत कर्तारसिंग ह्यानी स्वरचित काव्य म्हणून दाखविले. त्यातील एक कडवे असे होते :

'चलो, चलिये–देशनु युद्ध करन।

ई! हो!, ई! हो! आखिरी बचन–ते फर्मान हो गये॥

'गदर' साप्ताहिकाचे उर्दू, गुरुमुखी व इंग्लिश भाषेतील अक हिंदुस्थान, इजिप्त, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, फिजी बेटे, हाँगकाँग, थायलंड, ब्रिटिश ग्वायना, इराण, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, मेक्सिको, पनामा, ब्राझिल इतक्या देशात जाऊन थडकले. जेथे जेथे म्हणून हिंदू सैनिक हिंदुस्थानातून युद्धासाठी ब्रिटिशांनी धाडले होते त्याच्यातही प्रसार होऊ लागला व क्रातिकार्याला एक निराळीच धार चढली. १८५७ च्या पहिल्या क्रातियुद्धानंतर १९१४ मध्ये क्रातिकारकानी हिंदू सैन्यांमध्ये नवीन चेतना व नवीन ध्येयवाद निर्माण केला तो ह्या 'गदर'द्वारे !

९ फेब्रुवारी १९१४ ला हरदयाळ एका प्रतिनिधीमंडळाबरोबर वॉशिंग्टनला गेले व तेथून परतल्यानंतर सॅन्फ्रान्सिस्कोला २५ मार्च १९१४ ला त्याना अटक झाली. एमिग्रेशन ऑफिसात बोलावून घेऊन त्याची जबानी घेण्यात आली; त्यात ते म्हणतात, 'हिंदुस्थान देश स्वतंत्र करणे हे माझे कर्तव्य आहे व ते मी करत आहे. मी कोणी सशस्त्र क्रातिकारक नाही व सशस्त्र क्रातीला मी कधीच प्रोत्साहन दिलेले नाही. मी एक बुद्धिवादी समीक्षक, वेदान्ती व रसज्ञ टीकाकार आहे. बुद्धवादाकडे माझा अधिक ओढा आहे.' त्याची जामिनावर सुटका झाली व काही मित्राच्या सल्ल्यावरून ते १६ एप्रिल १९१४ला जिनेव्हाला निघून गेले. तेथूनही काही आठवडे 'गदर'साठी ते लेख धाडीत होते. लेखाची शीर्षके होती. 'Oh, Soldiers of the Gader,' Oh, Stars of the eyes of India–Fight on ! 'Gader and Guns', 'Kill the Firanghis.' लेख प्रभावी व सुंदर होते.

## जर्मनी-तुर्कस्तानशी संधान

ऑगस्टमध्ये युद्ध सुरू झाले. ३ सप्टेंबर १९१४ ह्या दिवशी हिंदू क्रातिकारकांनी बर्लिनला एक करार केला. त्यात सह्या करणारे होते– वीरेन्द्र चट्टोपाध्याय, डॉ. भूपेन्द्रनाथ दत्त, पिल्ले, तरखनाथ दास, हेरंबलाल गुप्ता, भगवानदास व डॉ. खानखोजे. जर्मनीकडून शस्त्रास्त्राची मदत घेऊन हिंदुस्थानात क्रांतियुद्ध लढविणे हे मुख्य कलम करारात होते. दुसरे महत्त्वाचे कलम असे होते की, तुर्कस्तानच्या सुलतानाला ब्रिटिशाच्या विरुद्ध उठवून क्रातिकारकानी हिंदुस्थानातून जाणारे व जर्मनानी पकडलेले सैन्य ताब्यात घेऊन, त्याच्यातील फक्त मुसलमानी सेना हातात घेऊन, त्यांच्याकरवी उत्तरेच्या बाजूने हिंदुस्थानवर आक्रमण करणे व हिंदुस्थान देशातील मुसलमानाना आतून उठावणी करावयास लावणे.

ह्या क्रान्तिकारकांच्यामध्ये हरदयाळ सामील झाले; परंतु जर्मनी व हिंदुस्थानच्या बाहेरील मुसलमानी राष्ट्रे ह्याचा व्यूह हरदयाळांच्या ताबडतोब ध्यानात आला नाही. ह्या वेळी जे घडत होते ते असे : जर्मनीच्या कैसरने ९ सप्टेंबर १९१४ ला एक गुप्त पत्रक काढून, चालू युद्धात हिंदुस्थानातील सेनेमधील जे मुसलमान पकडले जातील त्याना तुर्कस्थानच्या खलिफाकडे धाडून द्यावे व हिंदू सैनिकांना तुरुगात डांबून ठेवावे. हे फर्मान हरदयाळाना कळल्यावर त्याच सप्टेंबर १९१४ मध्ये इस्तबूल येथील जर्मन वकिलातीकडे क्रातिकारक खानखोजे व आगाशे ह्याना बरोबर घेऊन जर्मन वकिलाला त्यानी अशी विनंती केली की, हिंदू सैनिकही मुसलमान सैनिकांच्याबरोबर तुर्कस्तानकडेच धाडले जावेत. वकिलाने स्पष्ट नकार दिला. पकडलेल्या मुसलमान सैनिकाना बरोबर घेऊन, त्यांना शस्त्रास्त्राचा पुरवठा करून बाहेरून हिंदुस्थानवर आक्रमण करावयाचे व आतील कडव्या व धर्मवेड्या मुसलमानांशी संगनमत करून मुसलमानांचेच राज्य हिंदुस्थानवर स्थापन करावयाचे, हा जर्मनीचा डाव होता. ते बरोबर

हेरल्यावर हरदयाळांनी १५ ऑक्टोबर १९१४, २० ऑक्टोबर १९१४ आणि २७ नोव्हेंबर १९१४ ह्या दिवशी निरनिराळ्या ठिकाणी तारा करून आपले जर्मनीबरोबरचे संबंध तोडल्याचे जाहीर केले व त्याबरोबरच INDIA COMMITTEE IN BERLIN व MUSLIM PAN-ISLAMISTS IN ISTAMBUL ह्या संघटनांमधून जानेवारी १९१५ मध्ये स्वतःचे अंग काढून घेतले. एवढ्यावरच हे प्रकरण थांबले नाही तर ऑगस्ट १९१५ मध्ये, तुर्कस्तान सोडून ते बुडापेस्टला निघून गेले. HAR DAYAL IN GERMANY हा माहितीपूर्ण निबंध प्राध्यापक होर्स्ट क्रूगेर ह्यानी दिल्ली येथे १९६४ च्या जानेवारीत प्राच्य भाषातज्ञाची जागतिक २६ वी परिषद भरली होती, त्यात वाचला. त्यातला विषय त्यांनी उत्कृष्ट हाताळलेला आहे. असे दिसते की, जर्मनी, तुर्कस्तान व अफगाणिस्तान ह्यानी रचलेल्या हिंदुस्थानच्या इस्लामीकरणाचा हा डाव, कावेबाजपणा, धूर्तपणा व हातचलाखी वीरेन्द्र चट्टोपाध्याय, दासगुप्ता, महेंद्रप्रताप ह्या हिंदू-क्रांतिकारकांच्या ध्यानात आलाच नाही. त्याच्यातील बर्कतुल्ला व ओबेदुल्ला हे दोघे मुसलमान पॅन-इस्लामिस्ट होते, हे तर निश्चितच.

बर्लिनहून एप्रिल १९१५ मध्ये दोन शिष्टमंडळे तुर्कस्तान, इजिप्त व अफगाणिस्तानकडे निघाली. एक शिष्टमंडळ होते हेंटिंग व महेंद्र-प्रताप ह्याचे व दुसरे होते ते वीरेंद्र चट्टोपाध्याय, तिरुमल आचार्य व सरखनाथ दास याचे. इजिप्तमधील क्रांतिकारकांशी हातमिळवणी करून हिंदुस्थानातून गेलेले व पकडून ठेवलेले सैन्य जर ब्रिटिशांच्या विरुद्ध फितूर करता आले तर पहावे, असा शिष्टमंडळाचा उद्देश होता त्यांनी इजिप्तचा हिलगी पाशा, अनव्हर पाशा आणि प्रमुख सुलतान ह्याची भेट घेतली. तुर्कस्तानचा कासिम बे (पॅन-इस्लामिस्ट) ह्याला आपल्याबरोबर घेतले. ते शिष्टमंडळ २० एप्रिलला इस्तंबूलहून निघून २७ मे ह्या दिवशी बगदादला पोहोचले. तेथे हेंटिंग व महेन्द्र-प्रताप ह्यानी प्रिन्स रेउस व जर्मन वकील निडरमियरची भेट घेतली. तेथून शिष्टमंडळ इस्पदातला व नंतर काबूलला गेले. अफगाणि-स्तानच्या भागात जे ब्रिटिश व रशियन सैन्य होते त्याच्या अधिकाऱ्यांना, हे शिष्टमंडळ पुढे जाऊ देऊ नये, असा हुकूम देण्यात आला होता. दिल्लीहून लॉर्ड हार्डिंजने अफगाणिस्तानच्या अमिराला 'शिष्टमंडळांना थारा देऊ नये' असे कळविले होतेच. अमीर हबिबुल्ला हा ठीक होता. विचारी होता; परंतु त्याचा भाऊ नसरुल्लाखान व मुलगा इनायतुल्ला हे दोघेही ब्रिटिशांचे हाडवैरी होते. हिंदुस्थानातील मुसलमानांना हाताशी धरून व जर्मन आणि तुर्कस्तानी फौजा घेऊन, हिंदुस्थानवर स्वारी करावी व ब्रिटिशांना हाकलून द्यावे, ह्या विचाराचे ते होते. तेथील ब्रिटिशविरोधी वर्तमानपत्र 'सिराज-अल्-अखबार' भडक लेख लिहून, साथ देत होते. महेन्द्रप्रतापानी पुढे प्रसिद्ध केलेल्या आपल्या आठवणीमध्ये ५१ पानावर हा स्पष्ट खुलासा केलेला सापडतो.

२२ ऑक्टोबर १९१५ ला अमिराने शिष्टमंडळाला मुलाखत दिली व हाजी अबदुल रज्जाक ह्या आपल्या मंत्र्याला हिंदुस्थानातील क्रांतिकारकांच्याबरोबर वाटाघाटी करण्यास आज्ञा केली. जर्मनांनी अफगाणिस्तानातील तरुणांना लष्करी शिक्षण देण्यासाठी अधिकारी धाडून दिले. हिंदुस्थानातील 'मुजाहिद' ह्यांना भेटून नंतर अफगाणि-स्तानामधून जर्मन, तुर्की व बलुची सैन्यांनी हिंदुस्थानच्या सरहद्दीवर २९ जानेवारी १९१५ ते ५ सप्टेंबर १९१५ ह्या मुदतीत सात वेळां जबरदस्त हल्ले केल्याचा उल्लेख लॉर्ड हार्डिंजने 'My Indian years' ह्या आपल्या ग्रंथात पान १३१ वर केलेला आहे. कलकत्त्याच्या 'अल् हिलाल' ह्या वर्तमानपत्राने संपादक अबुल कलम अझाद व देवबंदच्या 'दार-अल-उलम्' ह्या वर्तमानपत्राचे संपादक मौलाना ओबेदुल्ला सिंधी व तिसरा दिल्लीचा वजनदार पुढारी अबदुल अहंमद ह्यानी अफगाण टोळ्यांशी संपर्क ठेवून १९ जून १९१५ ला लाहोरहून काबूलला १४ हुषार तरुण मुसलमान विद्यार्थी धाडून दिले. लगोलग ऑगस्टमध्ये ओबेदुल्ला, फत्तेमहमद, महंमदअल्ली व अबदुल्ला (सर्व पॅन-इस्लामिस्टस) हिंदुस्थानातून काबूलला गेले. पूर्वीचा एक हिंदू संस्थानिक, ब्रिटिशांनी आपले संस्थान खालसा केले म्हणून ब्रिटिशांचा सूड घेण्यासाठी उद्युक्त झालेला व हिंदुस्थानच्या बाहेरील सशस्त्र क्रांतिकारकांच्यामध्ये मिसळलेला राणा महेन्द्रप्रताप उल्लू बनला व पॅन-इस्लामिस्टच्या मदतीने, त्याने १ डिसेंबर १९१५ ह्या दिवशी काबूल येथे 'स्वतंत्र हिंदुस्थाचे तात्पुरते सरकार' जाहीर केले. स्वतः अध्यक्ष, बर्कतुल्ला पंतप्रधान व ओबेदुल्ला गृहमंत्री, अशी नेम-णूकपण केली. महेन्द्रप्रतापवाचून कोणीही हिंदू-क्रांतिकारक त्या सरकार-स्थापनेत सामील झालेला नव्हता. हाजची यात्रा करण्याच्या निमित्ताने महंमद हसन व महंमद मिय्या अन्सारी हे दोन कडवे मुसलमान मुंबईहून १८ सप्टेंबर १९१५ ला निघाले. त्यानी अनवर पाशाची मुलाखत घेतली व त्यानी अन् ओबेदुल्ला आणि बर्कतुल्ला ह्यानी हिंदुस्थानात 'जेहाद' कसा केव्हा पुकारावयाचा ह्याचा आराखडा तयार करून घेऊन ते दोघे हिंदुस्थानला येण्यासाठी निघाले. २० जुलै १९१६ ला ब्रिटिशानी त्यांना पकडले. झडतीत त्याच्या सिल्कच्या डगल्यामध्ये शिवून ठेवलेले महत्त्वाचे कागदपत्र मिळाले. त्यावरून SILK LETTERS CONSPIRACY खटला चालला व लष्करी कोर्टाकडून त्यांना फाशीच्या शिक्षा झाल्या!

महेन्द्रप्रतापानी अफगाण-नागरिकत्व घेतले. १९१७ मध्ये युद्धाचे पारडे फिरल्याचे दिसल्याबरोबर त्यांनी रशिया गाठला. तेथे काही डाळ शिजली नाही म्हणून त्यांनी २८-३-१९१८ ला बर्लिन गाठले.

तरखनाथ व इतर हिंदू क्रांतिकारक तुर्कस्थानमध्ये १॥ वर्ष तळ ठोकून होते; परतु १९१७ च्या अखेरीस त्यांनाही तो देश सोडून युरोपला जावे लागले. जर जर्मनीचा पराभव झाला नसता तर, हर-दयाळांनी भाकित केल्याप्रमाणे जर्मनी व मुसलमानराष्ट्रे एक होऊन त्यांनी सबंध हिंदुस्थानचे इस्लामीकरण करून टाकले असते! मुसल-मानांचे डावपेच पहिल्या महायुद्धाचे वेळी कसे चालले होते हे ध्यानात येण्यासाठी स्पष्टपणाने इतके लिहावे लागले.

'इंडिया— बर्लिन' संघटनेशी संबंध तोडल्याचे जर्मनांना जेव्हा कळले तेव्हा त्यानी हरदयाळांना अटक केली व १० ऑक्टोबर१९१८त त्याना मुक्त करून व्हिएन्ना येथे मोकळे केले. ४ डिसेंबर १९१८ ला 'सॅनफ्रान्सिस्को पोस्ट' ह्या साप्ताहिकात हरदयाळानी आपले निवे-दन प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात : 'जर्मनीतील माझे वास्तव्य एका दृष्टीने उपकारकच ठरले जर्मन हे साम्राज्यवादी राष्ट्र आहे. अखिल मानवजात त्याना पायाखाली तुडवावयाची आहे. अमेरिकेने त्याच्या विरुद्ध शस्त्र उचलले, हे योग्यच केले.' त्यानंतर 'इंडिया' ह्या लंडनला निघणाऱ्या साप्ताहिकाकडे १४ मार्च १९१९ ला त्यांनी एक तार धाडली.

तारेचा आशय असा : ' I bow publicly my conversion to the principle of Imperial unity with progressive self Government for all civilized nations of the British Empire ' तसेच लंडनच्या ' न्यू स्टेटसमन ' मध्ये २२ मार्च १९१९ च्या अंकात त्यांचे एक विस्तीर्ण निवेदन छापून आले. The future of British Empire in Asia हा होता लेखाचा मथळा. निवेदनाचा सारांश असा : ' ब्रिटिश साम्राज्य हे वरदान आहे व हिंदुस्थानने ते जतन करणे हे त्याच्या हिताचे आहे. हिंदूनी इंग्लिश वाङ्मय व इतिहास शिकावा व अभ्यास करावा. ' ह्या सबंध निवेदनाला न्यूयॉर्क टाइम्सने प्रसिद्धी दिली व टोकियोतील ब्रिटिश राजदूताने त्याच्या छापील प्रती काढून निरनिराळ्या देशांतील वर्तमानपत्राकडे प्रसिद्धीसाठी पाठवून दिल्या. जपानात ह्या वेळी क्रांतिकार्यात मग्न असलेले रासबिहारी बोस ह्यांना ते निवेदन वाचून मनस्वी दुःख झाले. धक्काच बसला ! अलाहाबादच्या ' लीडर ' ने हरदयाळाची चांगलीच खरडपट्टी काढली व ' हरदयाळ म्हणजे राजकारणात वाघाचे कातडे पांघरून भटकणारा एक ढोंगी व भ्याड कोल्हा ' अशी संभावना केली. फक्त मानवेंद्रनाथ रॉयनी हरदयाळांनी धाडसी व स्पष्ट विचार मांडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, शाबासकी दिली.

हरदयाळाचे हे चमत्कारिक वर्तन पाहूनच मला असे विधान करणे भाग पडले की, हरदयाळांचा राजकीय मृत्यु २२ मार्च १९१९ ह्या दिवशी झाला ! ते हाडाचे स्वातंत्र्य-सैनिक वा सशस्त्र क्रांतिकारक नव्हते, हे १९१९ मध्येच स्पष्ट झाले.

### दुसरे लग्न व अखेरचे दिवस

सशस्त्र क्रांतिकारक हा महासागरातील दीपस्तंभाप्रमाणे शांत व निश्चल असतो व जन्मभर झिजतच असतो. ' मायभूमी स्वतंत्र होईपर्यंत मी परसत्तेशी झगडतच राहीन ! ' अशी वयाच्या तेविसाव्या वर्षी सावरकराच्या अभिनव भारताची शपथ घेणारे १९०७ मधील हरदयाळ १९१९ मध्ये आपले ध्येय पार विसरून गेले शपथ घेतली होती ती श्रद्धायुक्त अंतःकरणाने,अश्रद्धेने नव्हे. बुद्धिमंत हरदयाळाना ते श्रद्धास्थान टिकवता आलेच नाही. ह्याला कारण म्हणजे मानसिक अस्थैर्य व ध्येयनिष्ठेचा अभाव. अग्नी प्रज्वलित होतो तो श्रद्धेने व आहुती अर्पिली जाते ती पण श्रद्धेनेच !

सन १९१९ नंतर पुढील वीस वर्षे हरदयाळ स्वीडन व अमेरिकन देशातच वास्तव्य करून होते. इंग्लंड व हिंदुस्थान येथे जाण्यास त्यांना परवानगी पुढे मिळाली. दैववशात् १९२६ च्या नोव्हेंबर महिन्यात स्वीडनमधील अगडा एरिकसन् ह्या दयाळू व सुस्वभावी अंत करणाच्या तरुण समाजकार्यकर्तीबरोबर हरदयाळाचा परिचय झाला. ते एकत्र राहू लागले व पुढे १९३२ सालात दोघानी विवाह केला. त्याच्या वयात फक्त दोन महिन्याचेच अंतर होते. दोघांनाही क्षयरोगाची बाधा होती. विवाहानंतर दोघेही लंडनला स्थायिक झाले. अगडाच्या वडिलानी बऱ्यापैकी पैसा ठेवला होता. त्याच्यावर दोघे आपली वाटचाल करीत होते. लंडनला त्यांनी ' बुद्धवादा'वर पुस्तके लिहिली व नेहमीच्या सवयीप्रमाणे फावल्या वेळेचा उपयोग म्हणून ' Modern Cultural Institute ह्या नावाची संस्था काढली. संस्थेचे ध्येय काय ?

' खा-प्या अन् मजा करा ! सकल प्राणिमात्रावर प्रेम करा ! '

स्वदेश-स्वातंत्र्याकरिता तळमळ दाखविणाऱ्या हरदयाळाचे किती चमत्कारिक जीवन हे !

हरदयाळाचा हा द्वितीय विवाह हिंदुस्थानातील त्याच्या आप्तांना माहीत पडला, तो त्याच्या मृत्यूनंतर जी पुस्तके त्यानी लिहिली ती सर्व ह्या अगडा एरिकसनला अर्पण ! १९३८ मध्ये त्यानी ' जगांतील प्रमुख १२ धर्म " म्हणून ग्रंथ लिहिला, त्यात ज्युडाइझम, झोरोस्ट्रिआनिझम, शिंटो, ताईझम, हिंदुइझम, कॉन्फ्यूशिॲनिझम,


**अभ्यासकास उपयुक्त**
**शेतकऱ्यास प्रेरक**

" श्री. विजय परुळकर यांनी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्याच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे ' योद्धा शेतकरी ' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्याच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्याबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्मयात भर टाकणारे आहे. "

—प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

**योद्धा शेतकरी**

**ले. : विजय परुळकर**

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
किंमत : रुपये छत्तीस
नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पंचरंगी मुखपृष्ठ

जैनिझम, बौद्धिझम, ख्रिश्चिॲनिटी, इस्लाम, सुफिझम अन् पॉझिटिव्हिझम–ह्या १२ धर्मांची संगतवार माहिती देऊन तुलनात्मक संकलन केलेले आहे.

हरदयाळांना एकंदर १४ भाषा येत होत्या. My Divine Madness हा त्याचा शेवटचा लेख ५ मे १९३९ च्या पुण्याच्या 'मराठा' साप्ताहिकात उद्धृत केलेला आहे. त्यावरून त्यांना हिंदू साम्राज्य, हिंदुस्थानात हिंदूचेच राज्य, अशा विषयावर किती प्रेम होते व ते किती मुद्देसूदपणे लिहीत असत ते प्रत्ययास येते. लेखात ते म्हणतात: ' बरेचसे मुसलमान माझी गणना एका वेडयात करतात. करू देत बिचारे ! पण माझ्यासारखे कोटचवधी हिंदू जर वेडे झाले तर हिंदूचे राज्य दूर नाही, हे निश्चितच. हिंदूमध्ये स्वतंत्र विचार करण्याची शक्ती पार नष्ट झाली आहे अन् त्याला कारण आपण हिंदूच !' १९११ ते १९१५ ह्या कालात ' हिंदू–जर्मन एकी ' व ' हिंदू–मुसलमान एकी ' ही स्वातंत्र्यसंपादनाकरता अत्यंत आवश्यक आहे, असे अट्टाहासाने लेखन करणारे हरदयाळ, १९१९ ते १९२७ ह्या काळात स्पष्टपणे लिहू लागले की, जर्मनी व मुसलमान राष्ट्रे ही हिंदुस्थानवर आक्रमण करणार होती. हिंदुस्थान त्या संकटातून वाचला. निदान आता तरी हिंदूनी हे ध्यानात घ्यावे की, ब्रिटिश साम्राज्यातच रहाण्यात हिंदुस्थानची सर्वांगीण प्रगती व उन्नती होईल ! १९२७ नंतर त्यांच्या लिखाणातील सूर बदलला. ' जात-पात, धर्म, प्रदेशभिन्नता हे सर्व खोटं आहे. जगभर एकाचेच राज्य, एकच निशाण, एकच ध्येय, एकच समाज, एकच धर्म व एकच भाषा असणे उत्तम !' त्याच्यानंतर १९३७ साली त्यांनी टोपी फिरविली. नंतरच्या दोन वर्षांत लिखाण असे : ' हिंदू संघटन झाले पाहिजे व हिंदूनी आपल्या हिंमतीवर राज्य स्थापन केले पाहिजे व मुसलमानांना आणि ख्रिश्चनांना हिंदू करून घेण्याची प्रचंड चळवळ उभारली पाहिजे ! '

असे दिसते की, सावरकरांच्या त्या वेळच्या वैचारिक क्रांतीचे निनाद ६००० मैल दूर राहिलेल्या हरदयाळांच्या कानावर जाऊन आदळले असावेत.

स्वपत्नीचा १९०८ सालात त्याग करून सक्रिय राजकारण करावयास उद्युक्त झालेले २५ वर्षीय हरदयाळ परदेशात राहून, सशस्त्र क्रांतिकारकांच्या सहवासात येऊन तल्लख बुद्धी असून, आयुष्यात काहीच भरीव कार्य करू शकले नाहीत !

१९०५ ते १९१९ ह्या कालखंडात हिंदू क्रांतिकारक दुसरे स्वातंत्र्य-युद्ध लढले. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्याबरोबर त्यांनी चांगलीच टक्कर दिली. दुर्दैवाने त्यांना पराभव पत्करावा लागला परंतु त्या स्वातंत्र्य–युद्धात अनेक सशस्त्र क्रांतिकारक धारातीर्थी पडले, अनेकांचे जीवन उध्वस्त झाले, अनेक हालअपेष्टा भोगून वेडेपिसे झाले अन् कित्येक फासावर लटकले !

१९३८ च्या एप्रिल महिन्यात हरदयाळ आपल्या द्वितीय पत्नीला घेऊन अमेरिकेस गेले. लंडनच्या त्यांच्या पत्त्यावर २५–१०–१९३८ ह्या तारखेस ब्रिटिश सरकारचे पत्र येऊन पडले होते व त्याद्वारे त्यांना हिंदुस्थानला जाण्याची परवानगी देण्यात आली होती. मुख्य हेतू म्हणजे ते ह्या वेळेस पूर्ण ब्रिटिश साम्राज्यवादी झाले होते प्रकृति-अस्वास्थ्यामुळे ते जाऊ शकले नाहीत व अखेर ४ मार्च १९३९ रोजी त्यांचा देहांत झाला. आगडा त्यांची रक्षा घेऊन स्वीडनला निघून गेली. काही दिवसानंतर हरदयाळांची पहिली पत्नी जिवंत असल्याचे तिला कळले व अत्यंत दु:ख झाले. ११ जानेवारी १९४० ला तिचाही अंत झाला.

हरदयाळांच्या बाबतीत दुःख होतं, यातना होतात त्या ह्या कारणासाठी की एक प्रखर तेजस्वी बुद्धीचा हिंदू देश स्वतंत्र करण्याची शपथ घेतो अन् मोडतो; पहिली हिंदू स्त्री जिवंत असताना, गौरकायेबरोबर विवाह करून परदेशात संसार थाटतो !

क्रॉमवेलनी म्हटले आहे, 'मी जसा आहे तसेच माझे चित्रण करा! अवास्तव मूल्यमापन करणे हे ऐतिहासिकदृष्टचा दोषार्ह ठरेल !' पहिल्या महायुद्धाच्या वेळचा एक महान सशस्त्र क्रांतिकारक हे पूर्वी रंगविले गेलेले हरदयाळाचे व्यक्तिचित्र किती अवास्तव होते, हे प्रत्येक हिंदूने समजावून घेतले पाहिजे. ☐

जन्म : १६ ऑक्टोबर १८८४ मृत्यू : ४ मार्च १९३९


# टॉलस्टॉय – एक माणूस

**दुसरी आवृत्ती**

## लेखिका : सुमती देवस्थळे

**किंमत : ५५ रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

रंगलेल्या गप्पा

# तीन नाटके आणि स्त्री-प्रेक्षक

विनया खडपेकर

लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले येथे स्त्री-शाखेतर्फे 'सावित्री', 'पंखांना ओढ पावलांची' आणि 'कमला' या तीन नाटकांवर चर्चा आयोजित केली होती. चर्चेसाठी सूत्रधार म्हणून मला निमंत्रण होते. कार्यक्रमाच्या संयोजक सौ. प्रभा जोग यांनी मला सांगितले, 'नाटकात आधुनिक स्त्रीचे प्रश्न आले आहेत. त्यावर चर्चा करावयाची आहे. चर्चेचे स्वरूप तूच ठरव!'

सोमवार दि. २२ मार्च या दिवशी दुपारी हा कार्यक्रम झाला. चर्चेचे स्वरूप व्याख्यानरूप ठेवायचे नाही, केवळ गप्पांचे ठेवायचे, (म्हणजे प्रेक्षकांचे उत्स्फूर्त उद्‌गार ऐकायला मिळतात) असे मी ठरविले होते. बरोबर चार वाजता आम्ही चर्चेला सुरुवात केली. सुमारे वीस-पंचवीस स्त्रिया होत्या. नाटके सगळ्यांनी पाहिली आहेत का, हे मी आधी विचारले. तीनपैकी कोणती तरी दोन नाटके सगळ्यांनी बघितली होती. दूरदर्शनवरचे नाट्यावलोकन आणि तिन्ही नाटकांवरचे वर्तमानपत्रातले अभिप्राय सगळ्यांनी वाचले होते. हे खूप बरे वाटले. म्हणजे चर्चेचा उत्सव साजरा करायला महिला जमल्या नव्हत्या. त्यांना त्या चर्चेत मन:पूर्वक रस होता. मी प्रत्येक नाटकाचे अगदी थोडक्यात कथानक सांगितले. मग माझ्या मनातले काही प्रश्न मांडले व त्या आधाराने गप्पात्मक चर्चा सुरू झाली. महिलांनी नाटकासंबंधीच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. नंतर मी माझा निष्कर्ष सांगितला. एकेका नाटकावर साधारण वीस मिनिटे चर्चा झाली. फार क्वचितच ती विषयापासून दूर गेली. उपस्थित असलेल्या जवळजवळ सर्वजणी बोलत होत्या. ही चर्चा साराशाने येथे देत आहे. प्रथम घेतले श्री. जयवंत दळवींचे 'सावित्री'.

**प्रश्न :** सावित्रीची समस्या ही नोकरी करणाऱ्या सर्वसामान्य स्त्रीच्या समस्येचे प्रतिनिधित्व करते का? नोकरी करायला बाहेर पडलेल्या 'स्त्री'च्या आयुष्यात 'बॉस' अशा प्रकारे घुसणे अपरिहार्य आहे, असे तुम्हाला वाटते का?

**प्रतिक्रिया :** असं काही सांगता येत नाही; पण शक्य आहे. माझ्या ओळखीत एक मुलगी आहे. तिला अगदी रूपाच्या जोरावर प्रमोशन मिळालं आहे. हे असलं येतंच ऐकू.

**प्रश्न :** एखाद्या स्त्रीचं एखादं प्रकरण असेल; पण मी सर्वसामान्यपणे तुमचा अनुभव विचारते, तुमच्या भोवताली किंवा नात्यात तुम्ही नोकरी करणाऱ्या स्त्रिया पहाता. त्यातल्या कितीजणी स्वत:चा संसार सोडून बॉसच्या मागे गेल्या?

**प्रतिक्रिया :** एकदम कोणी नाही असं वाटतं! पण अहो, संबंध आला की असलं काही तरी घडणारच. आपण नोकरी करीत नाही. मग कसं सांगणार? तुम्ही स्वत: नोकरी करता, तुमच निरीक्षण आम्ही मानू.

**प्रश्न :** मी नोकरी करते. माझे निरीक्षण असे—बॉसशी इतकी अमर्याद सलगी क्वचित-फारच क्वचित. नोकरी करणाऱ्या स्त्रिया प्रामुख्याने स्वत:च्या संसाराला हातभार लावण्यासाठी नोकरी करतात. त्यांची बोलणी बहुतेक नवरा आणि मुलेबाळे, त्यांचे खाणे-पिणे, कपडे, वाढदिवस याभोवतीच फिरत असतात. सावित्रीही अशीच आहे. म्हणूनच मानसीसारखी फॉरवर्ड मुलगी मैत्रीण म्हणून चांगली, पण पत्नी म्हणून तुझ्यासारखी साधीभोळी मुलगीच छान, असे नवऱ्याने म्हटल्यावर सावित्री खुशीने हसते. तर अशी ही सावित्री संसार की नोकरी या द्वंद्वाने ग्रासली न जाता सरळ नोकरीतल्या यशामागे जाते, हे तुम्हाला पटतं का?

**प्रतिक्रिया :** हे मात्र खरं. ती करिअरच्या मागे लागणारी स्त्री वाटतच नाही. इतकी साधीभोळी नुसती मॅट्रिक झालेली स्त्री नवऱ्याने नोकरी सोड म्हटलं की सोडणार! महत्त्वाकांक्षा तिच्यावर लादल्यासारखी वाटते. लग्नाशिवाय बॉसबरोबर रहाणंही सावित्रीच्या बाबतीत खटकतं. मानसीच्या बाबतीत खटकत नाही. सावित्री मुळी म्हणतेच; मी मानसीसारखी नाही, म्हणून. मला हे दु:ख सहन करायला लागतं. ती मानसी-सारखी नाही, म्हणूनच नको ती नोकरी, हा विचार तिच्या मनात तीव्रतेने यायला पाहिजे होता.

**प्रश्न :** सावित्री जेथे रहाते ती वस्ती मध्यमवर्गीय दिसते. माणसे सहजपणे एकमेकांच्या घरात जाता-येतात. आपल्या घरातून दुसऱ्या घरातल्या माणसाशी ओरडून बोलतात. अशा ठिकाणी नवरा निघून गेल्यावर सावित्री बॉसबरोबर राहू लागते, तेव्हा तिचा शेजाऱ्यांशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संघर्ष होत नाही, हे कितपत पटतं? क्षाताबाई-सारखी बोलभाड, चाकोरीतून जाणारी स्त्रीसुद्धा सावित्रीचे बॉसबरोबर रहाणं सहजपणे कसे स्वीकारते?

**प्रतिक्रिया :** अहो, हल्ली काय, कोणी दुसऱ्याच्या भानगडीत पडत नाही. त्यामुळे हे शक्य आहे. । छे:, कुठेही जा. चांगलं लक्ष असतं लोकाचं. जुहूच्या बंगल्यावर नाही कोणी लक्ष घालणार एकमेकाच्या गोष्टीत; पण सावित्री ज्या वस्तीत रहाते तिथे मात्र भोवतालचे लोक कॉमेंट्स करणारच; पण सावित्रीचा नं, स्वभाव खूप चांगला आहे; म्हणून शेजारच्या बायकांनी केलं असेल तिचं हे वागणं सहन.

**प्रश्न :** नाटकाच्या शेवटी सावित्री बेभान होऊन खिडकीतून उडी टाकते, अर्थात् मृत्यू पावते. याबद्दल मी वर्तमानपत्रात वाचलं की, 'बायका घराबाहेर पडल्या की, हे असं होतं' असा या शेवटामुळे नाटकाचा परिणाम होतो, याबद्दल तुम्हाला काय म्हणायचं आहे?

**प्रतिक्रिया :** हा असा अक्षरश: परिणाम लोकांवर होतोच. असा काही भयंकर शेवट दाखवलाच पाहिजे असं नाही. यांना चांगला शेवट दाखवायला काय होतं? । वाईट परिणाम होईल असा शेवट लेखक मुळी करतातच का? कसा शेवट करावा हे आपण

कसं सांगणार ? लेखकाला पाहिजे तोच शेवट तो करणार. पण समाजाची काही बाधिलकी लेखकाला आहे की नाही ? । दळवींना मुळी आत्महत्या आवडतेच. म्हणून दाखवली हे मात्र खरं. ' संध्याछाया 'मध्ये आत्महत्या. ' महासागर 'मध्ये शेवटी आत्महत्या. अरे आहे काय ? । लेखकाचा निराशावाद । पुरुष लेखक हे अस्संच दाखवणार. । म्हणजे या लेखकांना म्हणायचं आहे काय ? तुम्ही बायका घराबाहेर पडलात की, चुकणार आणि चुकलात की, आत्महत्या करणार ! याला काय अर्थ आहे ? । मी अगदी बायकांना म्हणते, पडा घराबाहेर. खुशाल करा करीअर, पण मुळीच आत्महत्या करू नका ! काय थोडं वागणं मेलं चुकलं तर चुकलं. सुधारून घ्यायचं. इथं लग्नाच्या वेळी मुलाला मुलगी हवी असते नोकरी करणारी. हे लेखक उगीच काही तरी फालतू प्रश्न काढतात !

निष्कर्ष : अपवादात्मक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एका स्त्रीची समस्या या नाटकात चित्रित झाली आहे. तिचे वागणेही अपवादात्मक म्हणावे असेच आहे. हे माझ्या जीवनाशी भिडलेले नाटक आहे, असे सर्वसामान्यपणे बहुसंख्य स्त्रियांना वाटणार नाही. तरीही आधुनिक स्त्रीच्या काही प्रश्नांना हे नाटक नक्कीच स्पर्श करते.

## पंखांना ओढ पावलांची

प्रश्न : बुद्धिमान स्त्रीची संसारात गुतल्यामुळे होणारी मानसिक ओढाताण आणि संघर्ष या नाटकात चित्रित करण्याचा प्रयत्न आहे. नायिका साधना महाजन हिची अभ्यासाची आत्यंतिक ओढ दाखविणारे आणि ती संसारात गुरफटून गेलेली आहे, हे दाखविणारे नाटकातले प्रसंग कोणते ?

प्रतिक्रिया : साधना पहिल्यापासून शेवटपर्यंत इगोइस्टिक वाटते. आश्रमात अभ्यासासाठी जायचे ठरवते तेव्हा एकदा मुलीला जवळ घेते तेवढेच. बाकी ती संसारात गुतलेली नाहीच. । अभ्यास की संसार । या भोवऱ्यात ती सापडली नाहीच. ती झटकन अभ्यासच स्वीकारते. । पण काही दिवस ती या गोष्टीचा विचार करते आहे असे एकदा राजवड्याशी बोलताना म्हणते. । पण तिच हे विचार करणं आपल्याला दिसतच नाही. । साधना हेकट आहे. घरी–दारी कुठेच कोणाला ती समजून घेत नाही । बहुतेक बायका जशा घरात गुतलेल्या असतात तशी ती गुतली नाहीच. म्हणून शेवटी आश्रम सोडून ती मुंबईला जायला निघते तेव्हा नवऱ्याने बोलावूनसुद्धा ती घरातल्या माणसांना, निदान मुलीला भेटायला पण घरी जात नाही. ' पंखांना ओढ पावलाची ' हे नावसुद्धा त्यामुळे पटत नाही. ।

प्रश्न : साधना बुद्धिमान आहे, असे प्रा. राजवाड्यांच्या बोलण्यातून आपल्याला एकसारखे ऐकायला मिळते. पण साधनाची बुद्धी दिसणारे प्रसंग नाटकात कोठे आहेत ? मला तर ती भावनेच्या आहारी जाऊन प्रामाणिकपणे पण एकांतिकतेने वागणारी स्त्री वाटते. देणगीदारांचे दबाव, नोकरांचा कमजोरपणा, काही गैरव्यवहार या गोष्टी सार्वजनिक संस्थेच्या पाचवीलाच पुजलेल्या असतात, हेही जिला कळत नाही तिला बुद्धिमान म्हणावे का ?

प्रतिक्रिया : ती हुषार आहेच. म्हणून तर पुढचा अभ्यास करण्यासाठी घर सोडते. । अभ्यास करायला घर सोडलं म्हणजे हुषारी सिद्ध होते का ? । पण अभ्यास करण्यासाठी काही तरी त्यागाची तयारी दिसते ना ! । शिवाय तिला जो अभ्यास करायचा आहे त्यासाठी घर सोडायला पाहिजेच होतं. । तिला बुद्धी नाही असे नाही. तिला अनुभव नाही. म्हणून संस्थेतल्या गैरव्यवहाराने ती चिडते. । पण बुद्धी असेल तिला जनरल नॉलेज म्हणून सार्वजनिक संस्थेतले गोंधळ अपेक्षित पाहिजेत. ती कधी सारासार विचारच करत नाही. फार इमोशनल आहे. । शिवाय ती वकिलाची बायको आहे. म्हणजेच नवऱ्याच्या कामाची बायकांना जी जाताजाता माहिती असते तसे तिला कायद्याचे पण जुजबी ज्ञान पाहिजे. हुषार म्हटल्यावर तर पाहिजेच पाहिजे. पण साधना कायद्याच्या दृष्टीनेही सगळ्या चुकाच करून ठेवते. । म्हणजे परीक्षा पास होत जाणारी पुस्तकी हुषार अशी असेल. । रस्त्यावरून आलेली चंदना, तिची काही माहिती नसताना तिला घरात कामाला ठेवून घेते, हे तर फारच चूक वाटतं. अगदी नको इतकं इमोशनल. त्यापेक्षा तिची सासू जे म्हणते, तिला बाहेर काम देऊ, पण काही माहिती नसताना घरात ठेवायला नको, ते अगदी बरोबर आहे. । पण तिला केस–स्टडी करायचा असतो. म्हणून ती चंदनाला ठेवते. यात तिची बुद्धीच दिसते.

प्रश्न : आश्रमात गेल्यावर साधनाला ज्या संघर्षाला तोंड द्यावं लागतं ते कोणत्याही ध्येयवाद्याच्या जीवनातले संघर्ष आहेत. तिच्या स्त्रीत्वामुळे हे संघर्ष निर्माण होत नाहीत. एखाद्या पुरुषाच्या आयुष्यातही ते येऊ शकतात. ध्येयवादी वृत्ती विरुद्ध व्यवहारी जग, असा तो संघर्ष आहे. याबद्दल तुम्ही काय म्हणाल ?

प्रतिक्रिया : प्रामाणिक माणूस आणि त्याची कोंडी याचंच हे चित्र आहे. स्त्री म्हणून जरा जास्त कोंडी होणारच. । असं कशावरून गृहीत धरता ? इथेच चुकतं. । पण ती घर सोडून आली म्हणजे फ्रस्ट्रेशन जास्त येणारच. । कायमचं कुठे घर सोडलं ? थोडे दिवस अभ्यासापुरतं सोडलं. त्याचं काय एवढं ? । यात मुळी स्त्रीची समस्याच नाही. आज-कालच्या परिस्थितीचं ते चित्र आहे. । स्त्री जेव्हा घराच्या दूर राहून अभ्यास करायचा ठरवते तेव्हा तिनं ते एक चॅलेंज म्हणून स्वीकारल्यासारखं वाटतं. त्यामुळं अपयश तिला पुरुषापेक्षा जास्त भिडणारच. । हे असं नाटकात नीट दाखवलेलं नाही. ।

प्रश्न : राजवाडे–साधना याचे अस्फुट परस्पराकर्षण फार संयमाने आणि योग्य भावाने व्यक्त झाले आहे. त्याचप्रमाणे चंदना या कामवालीला साधनाचा नवरा संजीव याच्याबद्दल वाटणारे आकर्षणही अतिशय सहजपणे व्यक्त झाले आहे. हे चित्र अतिशय वास्तव वाटते. त्यात ढोबळपणा नाही. याबद्दल तुम्ही काय म्हणाल ?

प्रतिक्रिया : तिला राजवाड्याबद्दल जरा जास्तच वाटतं. । म्हणून तर ते येणार तेव्हा ती चांगली साडी नेसते. पण नवऱ्याला सांगत नाही. । खरं म्हणजे ते येणार हे ती नवऱ्याला सांगत नाही हेच खटकतं. सांगायला काही हरकत नव्हती. त्यांचं काही लफडं असं नव्हतं. । दोघाचंही वागणं संयमी आहे. । पण राजवाड्यांच्या आग्रहामुळेच ती आश्रमात येते. तसं त्यांना एकमेकाबद्दल खूप वाटतंच. । राजवाड्याचा आग्रह नसता तर ती आश्रमात आली असती का, हा प्रश्नच आहे. । तिला आश्रमात यायला अभ्यास आणि राजवाडे ही दोन्ही कारण असू शकतील. । पण ते गुरु-शिष्य आहेत मोह आवर-

तात. । हो. हो. अगदी बरोबर. शेवटी राजवाडे तिच्या खांद्यावर ठेवण्यासाठी हात पुढे करतात, पण तो ते तिच्या डोक्यावर ठेवतात. । चंदनाचं काम छानच आहे. । संजीवला तिच्याबद्दल काहीच नाही. । चंदनाचं एकतर्फीच वागणं तिच्या वयाला आणि अडाणीपणाला शोभून दिसतं. । पण संजीवला तिच्या त्या वागण्याची गंमत वाटते हं. त्याच्या ते लक्षात येतं. । साधनाच्या सासूच्याच ते आधी लक्षात येतं.

**प्रश्न :** साधनासारखी ध्येयवादी स्त्रीही अपवादात्मकच म्हणावी लागेल का ?

**प्रतिक्रिया :** हो. अर्थातच । सगळ्या बायकांना कुठे एवढा अभ्यास करावासा वाटतो ? खरं म्हणजे, पुरुषामध्येसुद्धा किती पुरुषाना असं वाटतं की, घर-दार सोडून आश्रमात राहून तिथल्या परिस्थितीचा अभ्यास करावा?

**निष्कर्ष :** 'पंखाना ओढ पावलाची' हे सर्वसामान्य आधुनिक स्त्रीच्या समस्येचे प्रतिनिधित्व करीत नाही; पण ध्येयवादी स्त्रीच्या काही प्रश्नांना स्पर्श करते.

### कमला

**प्रश्न :** 'कमला' हे नाटक नायकप्रधान आहे की नायिकाप्रधान आहे ?

**प्रतिक्रिया :** सगळं महत्त्व जयसिंगलाच आहे. म्हणजे नायकप्रधान नाटक आहे. । पण सरिताचं दु.ख खरं म्हणजे लेखकाला सांगायचं आहे. । सगळी पत्रकारांवर चर्चा आहे. पत्रकारावरचंच हे नाटक आहे । नाही. 'कमला' ही खरा मुख्य प्रश्न आहे. नाटकाचं नावसुद्धा तेच सांगतं.

**प्रश्न :** या नाटकात एका महत्त्वाकांक्षी पत्रकाराच्या हातातलं 'कमला' हे खेळणं आहे. कमलाचं सुख-दु ख आपल्याला फारसं दिसतच नाही. जयसिंगचं व्यक्तिमत्त्वच नाटकात भरून राहिलं आहे असं वाटतं; पण सरिता शेवटी ठासून म्हणते, 'मी या माणसाची गुलाम म्हणून रहाणार नाही !' म्हणून हे नाटक सरिताच्या प्रश्नाचं आहे असा भास होतो. पत्रकारांच्या प्रश्नावरून नाटक एकदम स्त्री-मुक्तीवर उडी मारतं, असं मी म्हणते. तुम्हाला काय वाटतं ?

**प्रतिक्रिया :** हे म्हणणं पटतं. । सरिताला नाटकात काही महत्त्वच नाही. एकसारखी ती चहा घेऊन येते आणि जाते. ते बघणं मला कंटाळवाणं झालं. । सरिताचं दु:ख अचानक उफाळून येतं. ते पटत नाही. हळूहळू क्रमाक्रमानं आलं असतं तर बरोबर वाटलं असतं. । पण कमलाकडे बघून सरिताला स्वतःच्या दु:खाची जाणीव अचानकच होते. म्हणून सरिताचं दु:ख अचानक येतं. त्यात काही पत्रकाराच्या प्रश्नांवरून स्त्रीच्या प्रश्नांवर एकदम उडी मारली असं होत नाही. । उडीच वाटते. जुने पत्रकार-नवे पत्रकार हे सगळं चाललं असताना सरिता आपली एकदमच उसळते. कमलाला घरात ठेवायची नाही, असं नवरा बोलल्याचं निमित्त होतं, आणि हिला आपण गुलाम आहोत, असं वाटायला लागतं. सरिताची चिडचिड, धुसफूस सगळं उगीचच चाललं आहे, असं वाटतं.

**प्रश्न :** जयसिंग कमलाला जसं बातमीचं साधन म्हणून वापरतो तसंच सरिताला स्वतःच्या कार्यासाठी, सुखासाठी वापरतो, असं सरिताला वाटतं, असा एकंदर सूर आहे. सरिताला स्वतःमध्ये आणि कमलामध्ये गुलामगिरीचं जे साम्य वाटतं ते तुम्हाला पटत का ?

**प्रतिक्रिया :** मुळीच नाही ! सरिता आरामात आहे. तिला बंगला, गाडी, हाताखाली नोकर-चाकर आहेत. कमला अत्यंत दरिद्री, दीन आहे. । शिवाय कमला अडाणी, सरिता सुशिक्षित. कमलाला स्वतःवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव नाही. भोवताली काय चाललं आहे ते समजण्याची बुद्धी नाही. तिच्याशी सरितान स्वतःची तुलना करणं म्हणजे तिचा शुद्ध वेडेपणा आहे. । पण वापरलं जाणं हे दोघीमध्ये कॉमन आहे नं ! । कसचं आलं आहे वापरलं जाणं ? हल्लीच्या तुम्हा मुलींचं काय झालंय, तुमचं सुख दुखतंय. सगळं जरी व्यवस्थित असलं तरी कुरकुरायचं, अशी तुम्हाला सवयच लागली आहे. नवऱ्याला आवडेल ती साडी आपणच नेसायची आणि वर त्याला गुलामगिरी म्हणायचं. सरिता त्यातलीच आहे. सगळी सुखं तिच्यापुढं उभी आहेत.

**प्रश्न :** बंगला, नोकरचाकर असणं म्हणजे गुलामगिरी नसणं, हे समीकरण मांडणं बरोबर होणार नाही. सरिताला गुलामगिरीची जाणीव होते, असे काही प्रसंग दाखविले आहेत. ती नवऱ्याचे फोन टिपून घेते. ते काम नोकराने न करता तिनेच करावे, याबद्दल त्याचा कटाक्ष आहे. त्याच्या लहरीने तो तिचे शरीर जवळ करू इच्छितो. कमलाला घरात ठेवून घेऊ, असे ती म्हणत असताना, या घरात माझाच निर्णय मानला पाहिजे, मी मालक आहे, असं म्हणून तो कमलाला अनाथाश्रमात पोहोचवतो. सरिताला न विचारता तिच्यासह पार्टीला जायचं ठरवतो. तिला फक्त कळवतो. या प्रसंगामधून गुलामगिरीची जाणीव व्हावी हे स्वाभाविकच आहे, असे तुम्हाला वाटते का ?

**प्रतिक्रिया :** 'गुलामगिरी' हा शब्दच या प्रसंगांना फार भयंकर वाटतो. हे अगदी किरकोळ प्रसंग आहेत. । नवऱ्याचे फोन टिपणे या कामात एवढं आहेच काय, मला कळत नाही. उलट नवऱ्याचा तिच्यावर असलेला विश्वास दिसतो । कमलाचं प्रकरणसुद्धा जयसिंग इतर कोणाला सांगत नाही. पण सरितालाच सांगतो. यात त्याचा विश्वासच दिसतो. जयसिंग जेव्हा सरिताला जवळ घ्यायला जातो तेव्हा तिची इच्छा नाही म्हटल्यावर तो फक्त कारण विचारतो. तिच्यावर तो जबरदस्ती करीत नाही. म्हणजे तो तिला गरजेसाठी वापरतो, अस म्हणता येत नाही । तेंडुलकराचं सेक्सशिवाय भागतच नाही. म्हणून ते असलं काही तरी दाखवणारच । अगदी असतंच ते तेंडुलकरांच. सखाराम बाइंडरपासून त्यांच सेक्स, सेक्स चाललंय्. अजून ते घोळणं चाललच आहे । म्हणून मला तेंडुलकर अजिबात आवडत नाहीत। मलासुद्धा नाही आवडत । सरिताला जर पार्टीला जायचं नव्हतं तर नवरा जेव्हा फोनवर संध्याकाळी पार्टीसाठी तयार रहा, म्हणतो तेव्हाच नाही म्हणायला तिला काय झालं होतं ? । समजा, हिला नंतर बरं वाटेनासं झालं तर तिनं नवऱ्याला तसा उलट फोन करायला हवा होता, ही नवऱ्याची अपेक्षा बरोबर आहे. तो कामात, ही घरात मोकळीच. म्हणजे हिनेच फोन करायला पाहिजे होता। काही न सांगता एकदम पार्टीला येत नाही, म्हटल्यावर आई मुलीवर भडकेल, मैत्रीण मैत्रिणीवर चिडेल. बायको नवऱ्यावर चिडेल. तसा नवराही बायकोवर चिडणारच। कमलाला घरात ठेवलं तर जयसिंगवर माणूस खरेदी करण्याचा गुन्हा शाबीत होऊ शकत होता. त्यामुळे कमलाला

घरात ठेवावी हा सरिताचा विचारही चुकीचाच वाटतो. त्यामुळे तिला समजच कमी आहे असं वाटतं. । या बाबतीत मला वाटतं, वेळ इतकी महत्त्वाची असते की जयसिंग सरिताला गुंडाळतो ते बरोबर आहे. पण तो असं जे म्हणतो, या घरात माझी सत्ता आहे म्हणून मी म्हणतो ते झालं पाहिजे, ते मला खटकतं आणि अशा वेळी नवरा साधारणपणे काय म्हणेल ? गप बस ग. तुला काही माहिती नाहीए. ऐनवेळी घोटाळे करू नकोस. इथे ' माझा शब्द महत्त्वाचा ' असलं काही लाबलचक नवरा बोलणार नाही. असं पण मला वाटतं । मला आणखी एक सागायचं आहे. सरीताच चित्र बरोबर नाहीए. तेंडुलकरानी सत्यघटनेवर आधारित हे नाटक लिहिलं आहे. तर ज्या वार्ताहरानो–आश्विन सरीन यानी हा माणसांचा बाजार उघडकीला आणण्याची कामगिरी केली, त्यांनी ' कमला ' नाटक पाहिल. सत्यघटनेपासून ते दूर गेल आहे, असे ते म्हणाले. त्यांना नाटक आवडलं नाही. त्यानी सागितलं, या कामात माझ्या पत्नीनी मला अतिशय सहाय्य केलं होतं. जयसिंग जाधवसारखं मला नोकरीवरून काढून वगैरे मुळीच टाकलं नाही. सपादक, मालक यांचंही मला शेवटपर्यंत उत्तम सहकार्य होतं. त्यांनी मला अॅप्रीशिएट केलं. माझी कदर केली. म्हणून मी म्हणते, सरिताचं दु ख वगैरे खोटं आहे.

प्रश्न : ' सत्य घटनेवर ' नाटक आधारीत असले तरी ते घटनेच्या तपशीलाप्रमाणेच लिहिले पाहिजे, असे बंधन नाटककारावर नसते. कोणत्याच लेखकावर नसते. चरित्रात्मक कादंबरी, चरित्रावर आधारीत नाटके यात काल्पनिक मिसळण्याचे स्वातंत्र्य लेखकांनी यापूर्वीही घेतलेच आहे तसेच ते 'कमला' या नाटकाच्या बाबतीतही लेखकाने घेतले आहे यात काही गैर नाही. एखाद्या फुलातून डिझाईन बनविण्याचा अधिकार चित्रकाराला असतो. मग ते डिझाईन मूळ फुलापेक्षा वेगळे झाले तरी काही बिघडत नाही. भोवताली दिसणाऱ्या घटनामधून स्वतःच्या प्रतिभेने कथा, कादंबरी, नाटक लिहिण्याचा लेखकांनाही अधिकार असतो. मग त्या कलाकृतीचे मूळ स्वरूप सत्यघटनेपेक्षा वेगळे झाले तरी हरकत नाही. सत्य घटना जशीच्या तशी हवी, असे का ?

**प्रतिक्रिया :** मग हे नाटक सत्यघटनेवर आधारित असल्याचे आवर्जून जिकडे तिकडे सागितले कशाला जाते ? 'पुस्तकातसुद्धा त्यानी मुद्दाम, सत्यघटनेवर नाटक आहे, असं लिहिलं आहे. । तेंडूलकराना नेहमी वाईट काही तरी दाखवायला फार आवडतं. त्या वार्ताहराच्या कामाची कदर झाली. बायकोने सहाय्य केलं, असं नाही ते दाखवणार. त्याचं कसं त्या कामगिरीमुळं नुकसान झालं तेच ते दाखवणार. अप्रामाणिकपणाचा, लबाडीचा जय आणि प्रामाणिकपणाचा पराभव असंच ते दाखवणार. 'आक्रीत 'मध्येही तेच.। पण माणसाचे व्यवहारच तसे दिसतात. आपण भोवताली पहातो ना, सचोटीनं वागून निभाव लागत नाही. ॥ अहो पण आश्विन सरीन यांची नोकरी गेली नाही, हे धडधडीत सत्य याच भोवतालच्या परिस्थितीतलं आहे ना ? तरी तेंडुकलरांच्या वार्ताहराची नोकरी का गेली ? समाजात निराशा येईल असलंच काही तरी दाखवायची हल्लीची फॅशन आहे. त्या वार्ताहराच्या बायकोनं सहाय्य केलं तसं यांनी दाखवलं असतं तर काय 'बिघडलं असतं ? बायको विरोध करते, हेच सत्य का ? सहाय्य करते, हे का नाही ?

**निष्कर्ष :** या नाटकातील सरिताची समस्या ही आधुनिक स्त्रीची समस्याच वाटत नाही. किरकोळ गोष्टीचा बाऊ करून कृत्रिम समस्या निर्माण केली आहे.

## समारोप

सुशिक्षित मिळवत्या स्त्रीचे म्हणून काही वेगळे प्रश्न आधुनिक समाजात निर्माण होऊ लागले आहेत, याची आमच्या नाटककारानी दखल घेतली आहे. नोकरीमुळे येणारा परपुरुषाशी संपर्क, ध्येयासाठी संसारापासून दूर जाण्यातून होणारे संघर्ष, नवऱ्याची असह्य हुकमत या प्रकारचे प्रश्न त्यांनी आपल्या नाटकातून माडले आहेत. आधुनिक स्त्रीला ज्या संघर्षाला सामोरे जावे लागते, त्याचे हे वास्तव आणि सूक्ष्म चित्र आहे, असे वाटत नाही.

स्त्री नोकरी करू लागली तरी घरातल्या कामात तिला पुरुषाकडून मदत होत नाही. सोमवार ते शनिवार नोकरी झाल्यावर रविवार पुरुषासाठी जसा आरामाचा असतो, तसा तो स्त्रीसाठी नसतो. आपण नोकरी करतो म्हणून आपलं घर वाईट, असं कोणी म्हणायला नको म्हणून ती अधिकच राबते. लग्नाच्या बाजारात फोटो मुलीचाच दाखवला जातो, मुलाचा नाही. मुलगी 'दाखवली,' मुलीला ' दाखवायला नेली ' हे शब्द सर्रास रूढ आहेत. म्हणजे मुलगी परीक्षा देणारी आणि मुलगे परीक्षक, हेच यातून व्यक्त होते. हा घराघरातून दिसणारा आधुनिक स्त्रीवरचा अन्याय आहे. त्याचे कारण पुरुषवर्ग नाही. तर आमची शेकडो वर्षांची परंपरा आहे. स्त्री-पुरुष दोघेही या परंपरेच्या संस्कारांनी बांधलेले आहेत. पुरुष श्रेष्ठ, स्त्री कनिष्ठ, हा विचार आमच्या मनात खोल कोठे तरी रुजलेला आहे. आता आम्ही त्यातून सुटण्याची धडपड करीत आहोत. या धडपडीला अनेक फाटे स्वाभाविकपणे फुटत आहेत. एका बाजूला पुरुष शोषक, स्त्री शोषित असे ढोबळ वर्गीकरण करून स्त्रियांना पुरुषांच्याविरुद्ध संघर्षासाठी तयार करणारा एक वर्ग आहे. दुसऱ्या बाजूला पाश्चात्यांच्या अंधानुकरणामागे धावणारा वर्ग आहे. जीवशास्त्राची कसोटी लावून स्त्री-पुरुष यात श्रेष्ठ-कनिष्ठता आहे किंवा नाही, हे पारखू इच्छिणारेही आहेत. हे वेगळे विचारप्रवाह आमच्या कुटुंबजीवनावर, समाजजीवनावर, व्यक्तिजीवनावर परिणाम करू लागले आहेत. नवी जीवनमूल्ये भराभर स्वीकारली जात आहेत, पण जुनी जीवनमूल्ये त्या वेगाने नष्ट होत नाहीत. स्त्रीचे शिक्षण, स्त्रीचे अर्थार्जन आम्ही जलद स्वीकारले. पण तिच्यावरच्या जुन्या कौटुंबिक जबाबदाऱ्या विचारपूर्वक कमी केलेल्या नाहीत. स्त्रीशिक्षण, आणि अर्थार्जन यांच्यामागोमाग स्वाभाविक येणाऱ्या स्वातंत्र, समान हक्क या कल्पनाचा गाभीर्याने विचार करून त्यांना योग्य वळण देण्याचा प्रयत्न आम्ही केला नाही, परिस्थितीच्या रेटयाने जीवनपद्धती बदलू लागली आहे, पण जुनी मूल्ये अजूनही मनात घर करून आहेत. वेळाअभावी खाण्याचे आयते पदार्थ विकत आणले जातात, पण तसे करताना आपण कोठे तरी कमी पडतो आहोत, अशी अपराधी भावना स्त्रीच्या मनात असते. अशा प्रकारच्या जीवनक्रमातून मानसिक ताण स्त्रीला सहन करावा लागतो. नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या जीवनात वरची जागा मिळण्यासाठी आवश्यक असलेली बदली स्वीकारावी का, हा प्रश्न बहुतेक वेळा समोर उभा ठाकतो, ' बॉस' हा प्रश्न खरे म्हणजे एखादीच्याच वाटयाला येतो. ट्रेनिंगसाठी बाहेरगावी जाणेही स्त्रिया शक्य तितके दूर ढकलत राहतात. बऱ्याचजणी वरच्या जागा नाकारतात, यात नेहमीच ' नवरा' कारण असतो असे नाही- स्त्रीची स्वतःची अनेक शतकांच्या संस्कारांनी बनलेली मनोवृत्तीही याला कारण असते. आधुनिक स्त्रीचा सामना आहे, तो या परंपरेशी ! आमच्या नाटककारांनी आजच्या स्त्रीचे प्रश्न लक्षात घ्यायला सुरुवात केली आहे, त्याचे आम्ही स्वागतच करतो. पण त्या बरोबर एक विनंती आहे– त्यांनी कृपया या विषयाला सनसनाटी किंवा शोषक-शोषित असे प्रचारी रूप देऊ नये ! □

**उत्तरमीमांसा : पृष्ठ ६ वरून**

गाडीवरची सरबतं पितात. दर सिनेमाचा त्यांचा खर्च आणि तुमचा अभिरूचिसंपन्न खर्च यात दहा एक रूपयाचा तरी फरक सहज पडत असेल.'

मित्राने आक्रमकता सोडली नव्हती,

'पण गरीबही ब्लॅकनं सिनेमा बघतातच की.' माझा स्व-समर्थनाचा तिरका प्रयत्न.

'बघतात ना. फक्त लोअर स्टॉलचा दर दोनला तीन असा पडतो. आणि बाल्कनीचा दर चाराला दहा असा पडतो. तुमच्या जास्त पैशामुळे काळ्या फरकाचे माप वाढते. मुद्दा सरळ आहे. जादा पैसा असला की जादा सुविधा मिळतात. तसंच जादा सुविधा मिळवून दिल्या म्हणजे जादा पैसा मिळतो. पावणे दहाला पोचूनही आयत्या वेळी सव्वानऊच्या खेळाचं चार रुपयाचं तिकिट अलगद हवं ना ? मोजा तर जादा सहा रुपये. मिळालेल्या सेवेचा हा मेहेनताना समजा.' मित्राने स्वतः-चा युक्तिवाद तडीला नेला होता.

पण मी माझा पाप-पुण्याचा भेद सोडायला तयार नव्हतो. मी म्हटले, 'सेवा-सुविधेचा हा मेहेनताना म्हणता येणार नाही. एकमुठीने सर्व तिकिटं खरेदी करायची आणि नतर शक्य तितका नफा मिळवायचा, अशी ही नफेखोरी आहे. हातात खूप पैसा असणारेच असा सट्टा खेळतात आणि सामान्य प्रेक्षकाना पिळतात, प्रामाणिक अंगमेहेनतीने केलेली सेवा ही नव्हे.'

तात्त्विक फरक करता आला, म्हणून मी जरा आनंदात आलो खरा. पण मित्राचा जोर कायमच होता. तो हसून म्हणाला,

'नफा आणि सट्टा याना तुमच्या पैसेवाल्यांचा दुनियेत सर्वाधिक महत्त्व आहे. यासाठीच तर तुम्हाला 'फ्री इकॉनॉमी' हवी आहे ना ? हळद, मिरची, तबाखूचे वायदे संरक्षित असतात. वायदेबाजारांसाठी आयोग नेमलेले असतात. वायदा कोण खेळू शकतो? जो एका फोनवर एका मुठीने सारी हळद अडवू शकतो तोच ना ? मग, एकमुठीने हळद रोखण काय, अन् एकमुठीन सिनेमाची तिकिट रोखणं काय, एकच ते.'

'कायदेशीर नफा, वायदा आणि ब्लॅक, यात फरक करायला नको का ?' पुन्हा माझी तात्त्विकता.

'फरक फक्त रकमेचा. आणि परीटघडी तत्त्व तेच.' मित्राचा उत्साह आता वाढलाच होता. 'पुलंनी लिहिलं आहे ना, प्रम तेच. वाट पाहणं तेच. फक्त ऊर्वशीचा सौध आणि चंपीची ग्यालरी. हा फरक फक्त रिस्पेक्टिबिलिटीचा आणि तो तुम्ही पैसेवाल्यांनी ठरविलेला.'

त्याच्या तुम्ही–तुम्हीने मला जास्त राग येत होता. मी म्हटलंच, 'तुम्ही–तुम्ही करू करू नको, मी काही पैसेवाला नाही.'

मित्र हसला. आज तो फॉर्मात होता. म्हणाला–

'माझं तुम्ही-तुम्ही. मराठीतलं तुम्ही-तुम्ही आहे. तिथे तुम्ही म्हणजे समोरचा ऐकणारा नसतो, तर मनातला 'सामनेवाला' असतो. आणि तसंच म्हणत असशील तर मला तूदेखील अभिप्रेत आहेसच. तुम्ही म्हणजे पैसेवाले तर आलेच, पण त्यांच्याबरोबर तुम्ही आलात. तुम्ही म्हणजे, पैसेवाले नसलेले. पण पैसेवाल्यांच्या संस्कृतीचं समर्थन करणारे.'

'आम्ही काय म्हणून त्यांचं समर्थन करू? तुझा आरोप हा केवळ आरोप आहे.' माझा सांस्कृतिक युक्तिवाद.

'तुम्ही उच्चभ्रू ना? उच्च संस्कृतीवाले. तुम्हाला तुमचा 'खासपणा'(exclusiveness) प्रिय असतो. पैशाच्या जोरावर श्रीमंत गरिबाकडून जसं काहीही खरेदू शकतात, तसा आपल्यासाठी पैशानं हा exclusiveness खरेदी करता येईल, असं तुम्हाला वाटत असतं आणि तो तुम्हाला मिळाला नाही म्हणजे तुम्हाला वाईट वाटतं, राग येतो.'

आता मी गप्प झालो होतो. त्याचं बोलणं जास्त शातपणाने ऐकून घ्यावे, असे मला वाटू लागले होते. तो बोलत होता.

'नाटकाला तुम्ही दहा–पंधरा रुपयांचं तिकिट काढता, ते केवळ पुढच्या रागेत बसायला मिळावं म्हणून नाही; तर चार आणि तीन रुपयामधील लोकाच्या गर्दीत आपण गुदमरून जाऊ नये म्हणून. कारण चार किंवा तीन रुपयेवाल्यांना तुम्ही बरोबरीचे मानत नाही, हलके मानता. अन् अशात जेव्हा, तुमच्या दृष्टीनं अभिरूचीनं हलका पण पैशान तुम्हाला कडोसरीला लावू शकणारा असा एखादा पहिल्या रागेत येऊन बसला, की तुमचा फणकारा बघावा...

'सिनेमाची तिकिटं जास्त रक्कम घेऊन विकणाऱ्यावरील तुमचा खरा राग असा सांस्कृतिक आहे. या पोराचे कपडे मळकट असतात. केस पिंजारलेले कोरडे असतात. अशी पोरं जेव्हा गुर्मीच्या खर्जात तुमच्याजवळ येऊन, 'चारचे दहा' असं बजावतात, आणि दहा रुपये देऊन तुम्ही तिकिटं घेतली नाहीत, की तुमच्याकडे 'कारकुनच आहे,' अशा हेटाळणीनं बघतात, तेव्हा तुम्हाला खरा राग येतो. म्हणजे तुम्हाला दोन नंबरच्या वाटेचा राग येत नाही, तर त्या वाटेचे हे सोबती तुमच्यासारखे परीटघडीचे नाहीत याचा राग येत असतो...

'विमान, रेल्वे यांची तिकिटं काढून देऊन कमिशन घेणारे तुम्हाला चालतात. त्यांचा धंदा, नव्हे व्यवसाय, तुम्हाला सन्मान्य वाटतो. सामानाची ने-आण करणारे कार्टिंग एजंटस् चालतात. विक्रीची हमी घेऊन. ५० ते ६० टक्क्याच्या कमिशनवर सारा माल खरीदणारे 'सोल सेलिंग एजटस्' चालतात. एकदम एवढा माल घेणं, म्हणजे वायदा अजमावून पाहणंच नाही का ? हे व्यावसायिक. हे श्रीमंत. हे घराणेदार. रोटरी, लायन्स, जायन्टस् अशा आंतरराष्ट्रीय सन्मान्य संघटनांचे हे सदस्य व पदाधिकारी असतात. 'डायनर्स क्लब' चे कार्ड बाळगणारे असतात. दोन नंबरच्या वाटेवरचे हे यात्रेकरू सहप्रवासी म्हणून तुम्हाला चालतात...

'माझी खात्री आहे, ज्या एखाद्यानं 'सिनेमा तिकिटांचे कमिशन एजंटस्' अशी पाटी लावून ऑफिस थाटलं, आधुनिक रचनेनं ते सजवलं, मधाळ बोलणारी स्वागतिका स्वागत कक्षात बसविली आणि सिनेमा थिएटरवर तिकिटांचे आदान-प्रदान करण्यासाठी प्रशिक्षित, गणवेशधारी, रुबाबदार कार्यकर्ते ठेवले तर आजच्या या टाकाऊ धंद्याचा जीर्णोद्धार होईल. तो आधुनिक व कार्यक्षम असा व्यवसाय बनेल. व्यवसाय मार्गदर्शन-केन्द्रात या व्यवसायाची नव्यानं नोद होईल. या व्यवसायाचं तंत्र नि मंत्र शिकविणारे प्रशिक्षण केन्द्र सुरु होईल. या व्यावसायिकांची एक भक्कम संघटना होईल आणि असं झालं की, तुम्ही त्यांचा तिरस्कार करणार नाही. उलट, 'हा नवा विचार आपण समजून घ्यायला पायजेलाय' अशी त्यांची शिफारस कराल...

'असा सारा विचार कर आणि ब्लॅकनं सिनेमा पाहिल्याबद्दल अशी डोक्यात राख

घालू नको.' मित्राने चर्चेचा समारोप केला. ☐

तो निघून गेला. बराच वेळ मी गप्पच राहिलो होतो. दोन नंबरची वाट परीटघडी कपड्यात अधिक सुखाची होते, हे तर मी आजूबाजूला बघतच होतो. पण आपण सारेच ही दोन नंबरची वाट, कमी-अधिक प्रमाणात चोखाळत असतो, हे सांगून मित्र निघून गेला. ते मला पटू लागले होते.

दोन नंबरची वाट सोपी असते. तो शॉर्ट कट असतो. या वाटेवर तत्त्व थोडे सोडावे लागते. पण सगळेच सोडू लागले म्हणजे प्रत्येकालाच धीर येतो. थोडी तडजोड करावी लागते. तिला इंग्रजीत adjustment म्हटले की कसे, आधुनिक वाटते.

मला ज्ञानदेवांचे 'योग–दुर्गा'चे रूपक आठवले. योगी आणि भक्त. दोघानाही दुर्गाच्या माथ्यावर जायचे आहे. योगी डोंगरावरून, अंगलग्या कड्यांवरून जाणारा; खरचटून घेणारा. जखमा सोसणारा. भक्त युक्तिबाज, आतली, मर्माची वाट शोधणारा. डोंगराच्याही पोटात शिरून कार्य साधणारा. म्हणून भक्तीच्या मार्गाला ज्ञानदेवांनी सोपा मार्ग म्हटले आहे.

जरा वेगळ्या अर्थाने, दोन नंबरचा मार्ग हा सोपा मार्ग असतो. म्हणून सारे जण हा मार्ग अंगिकारतात. 'एकमेकां साह्य करू। अवघे धरू सु–(सोपा) पंथ ॥' असे धोरण व तशी धारणा असते. एरवी दिसत नाहीत, इतके परस्परसहकार्य, विश्वास, सहनशीलता, क्षमाशीलता या दोन नंबरच्या सोप्या वाटेत दिसतात.

दोन नंबरची ही वाट नेहमी दोन नंबरच्या पैशाच्या दिशेने जाते असे नाही. पैशाचे नसले, नुसते बिनकष्टाचे सोपेपणाचे आश्वासन असले, तरीही या दोन नंबरच्या वाटेने ईप्सित साधता येते.

मी प्राध्यापक, मला आमच्या सेमेस्टर पद्धतीची आठवण झाली. खरे म्हणजे सेमेस्टर पद्धती अवघड. कष्टाची. शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा जीव खाणारी. पण आम्ही साऱ्यांनी मिळून ती अगदी सोपी केली आहे.

या पद्धतीत शिक्षक–विद्यार्थ्यांचे प्रमाण एकास दहा–वीस असे आदर्श मानले जाते. आम्ही प्रथमच विसाचे साठ केले. यासाठी 'आदर्श' या कल्पनेचा अर्थही आम्ही अगदी सोप्या रीतीने लावला. 'आदर्श' म्हणजे आदर्श. तो व्यवहारात कसा आणता येईल? आणि व्यवहारात आदर्श आणू म्हटले तर तो आदर्शाचा अपमानच नव्हे का? म्हणून 'वीस' हा आदर्श तर साठ हा व्यवहार, हे कसे छान जमले. पण साठाशी थांबता आले नाही. साठाचे पहिल्याच वर्षी नव्वद झाले. कारण फार सोपे अन् खरे. वास्तवता. विद्यार्थ्यांची एकूण संख्याच जास्त. शिवाय त्यांची मागणी. मग नव्वद होणारच. नव्वदाचे नव्याण्णव होतात. कारण तर्कसंगत परिणती, दहा टक्के गैरहजेराचे वाढवायचेच असतात. आता हा नियम सेमेस्टरमधला नाही, जुन्या पद्धतीतला आहे, असे तुम्ही म्हणाल. तर उत्तर आहे, जुन्यानव्याची सांगड म्हणतात ती ही. नव्याण्णवाचे दुसऱ्या वर्षी एकशेदहा झाले. पुन्हा समर्पक कारण आहे. कनवाळूपणा किंवा प्रतिष्ठित नाव म्हणजे, मानवता.

टयुटोरियल्सचे तसेच. टयुटोरियल्स घेता येतात का? तर नाही. छोटे वर्ग नाहीत. म्हणून टयुटोरियलसाठी वेळापत्रकात वेगळी तरतूद करता येत नाही. आम्ही म्हटले, हरकत नाही. सेमेस्टर पद्धतीच्या अंतरंगाशी आम्ही प्रामाणिक राहू. मग व्यवहारात तडजोड, फेरफार करावे लागले तरी चालेल. व्यवहार, वास्तवता, मानवता अशा पायऱ्यांनी हेही काम उतरत आले आहे.

पण सेमेस्टर पद्धती सध्या खरी चालू नाही; विद्यापीठाला परीक्षा फी देण्यापुरती, बहि:स्थ विद्यार्थ्यांची परीक्षा–संख्या वाढविण्यापुरतीच ती फलदायी ठरली आहे–असे आम्ही म्हणणार नाही. कारण, 'पोपट मेला आहे', असे स्पष्टपणाने म्हणणे हे या सोप्या वाटेत बसत नाही.

ही वाट सहकार्याची आहे. परस्परांना सांभाळण्याची आहे. 'चुकत कोण नाही?' अशा उदार नैतिक सूत्रावर ही वाट आधारलेली आहे. भक्तिमार्गातील नम्र वृत्ती येथे सर्वांत आवश्यक असते. 'हेच काम आणि याच पद्धतीने व्हायला हवे', असा आग्रह या सोप्या वाटेवर कार्यक्षमतेचा द्योतक मानला जात नाही, तर हेकटपणाचा द्योतक मानला जातो. 'कशानेच काही साधत नसते. मग हेकटपणाने तरी काय साधणार?' असे व्यापक तत्त्वज्ञान या वाटेला शेवटपर्यंत सोबत करते.

कधी तरी या वाटेचा (आणि आपलाही) शेवट येतो. तेव्हाही काय म्हणायचे ते ठरलेले असते. 'मी चुकलो असेन. पण जसे जमले तसे मी केले. सारे हेच करतात. आता पुढची जबाबदारी पुढिलांची आहे. त्याच्यावर माझा भरंवसा आहे. मी समाधानाने जात आहे.' ☐


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

जीपचं इंजिन सुरू केलं. परंतु कल्पनाला पाहून कलिजा खलास झालेला मुकुंदराव मनातून सैरभैर आणि हलका होऊन गेलेला होता. त्याने झुक्कन जीप वाऱ्यावर सोडून दिली आणि कल्पनाचा सुंदर चेहरा आठवत तो उसाच्या मळ्याकडे निघाला.

¤

देसाई कुटुंबाचं एरणगावातलं आगमन तसं शिस्तबध्द रीतीने झालेलं होत. गावच्या पोस्टात जादा वाढवलेला कारकून म्हणून जरी तो तेथे आला होता तरी स्थानिक पोस्टमास्तरानी पोस्टाच्या माडीवरची एक डबलरूम त्याला कबूल केलेली होती त्याबाबतचा पत्रव्यवहार पुण्याहून अगोदरच पार पडलेला होता. एस. टी. च्या पाठोपाठ सामान घेऊन लॉरी आली. देसाई कुटुंबाचं बिऱ्हाड पोस्टाच्या माडीवर स्थानापन्न झालं. ही बातमी काही क्षणात एरणगावभर पसरली. एरणगाव पोस्टात एक माणूस वाढावा ह्यासाठी खास आप्पासाहेबांनी प्रयत्न केलेले होते. त्याचं वजन कारणी लागलं होतं. अर्थात आप्पासाहेबांना जिल्ह्याच्या ठिकाणी एवढं वजन लाभायला कारणीभूत एरणगावचीच जनता होती.

हा हा म्हणता दिवस उडत होते वाणि देसाई हळूहळू एरणगावकर झाले होते ओळखी वाढल्या होत्या. बाजार, दुकानं, रस्ते सगळं अगवळणी पडत होतं. एकदा स्वतः आप्पासाहेब पोस्टात आले आणि नव्या कारकूनाची ओळख करून घेतली. एरणगावचा एकदर रिवाज महिन्यात श्यामकांत देसाईंच्या लक्षात आला. एवढ्या अवधीत मुकुंदराव मात्र पार वेडा होऊन गेला होता. त्याची कुणालाही कल्पना नव्हती.

देसाई कुटुंब एरणगावात आल्यापासून मुकुंदरावाने आपला जीपचा रस्ता बदलला होता. कधीही पोस्टावरून न जाणारा मुकुंदराव मुद्दाम त्या आडरस्त्याने जात होता. रोज सकाळी सूर्योदय होताच मुकुंदराव जीप बाहेर काढी आणि पोस्टाच्या माडीसमोर ती उभी करून भेटेल त्याच्याशी फुटकळ गप्पा करण्यात तो वेळ घालवे. एरवी समोरून येणाऱ्याकडे ढुंकूनही न पाहणारा मुकुंदराव सकाळचा तास तास गप्पा मारतो, ह्यामागचा त्याचा अकाली आलेला निगर्वीपणा, पोस्टाच्या माडीकडे चाललेल्या त्याच्या नेत्रपल्लवीतून काही वेळा उघडा पडत असे. बुजुर्ग गावकरी जे समजायच ते समजत. मुकुंदराव करतोय ते चागलं नाही, हे समजत असूनही काहीही बोलता येत नसे. पण ह्याच प्रकरणात मुकुंदराव आप्पासाहेबांच्या खानदानाला डाग लावेल, असं मात्र कुणालाही वाटत नव्हतं. पण ते घडल.

तो जवळजवळ दीड महिना मुकुंदरावाना शात झोप नव्हती. त्याच्या त्या निद्रानाशाला कारणीभूत होता तो कल्पनाचा सुंदर चेहरा. आपल्या सौंदर्यामुळे कुणी एक मुकुंदराव आपली झोप गमावून बसलाय, याची सुतराम कल्पना त्या साध्वीला नव्हती. आपण, आपला सत्शील, प्रामाणिक प्रेमळ नवरा आणि सोनेरी केसांची गोड छोकरी नीलू याच्यासह ती बिचारी आपल्या बिऱ्हाडात रमून गेलेली होती. 'सुख आले माझ्या दारी' किंवा 'असावे घरटे अपुले छान' वगैरे गाण्याच्या ओळी स्वत.शी गुणगुणत आपल्या ससारात गर्क होती. मुकुंदराव दिवसेदिवस अस्वस्थ होत चालला होता. वेडा झाला होता.

तो दिवस मुकुंदरावाला कल्पनाला आणि एरणगावात कुणालाच चांगला नव्हता. सकाळी दहाची गोष्ट. श्यामकात देसाई पोस्टातल्या आपल्या खुर्चीत मनिऑर्डरच्या कामात गर्क होता. पोस्टाचं दैनंदिन काम मशिनसारखं आपसुक चाललेलं होत. नीलू आजूबाजूच्या पोराटोरांबरोबर पोस्टामागच्या पिंपळाच्या पारावर खेळण्यात रमली होती. आपली वेणी-फणी आटपून दुपारच्या स्वयंपाकाच्या तयारीत कल्पनाची घाई चालली होती. एरणगावातले इतर व्यवहार रोजच्या खतावणीसारखेच चालू होते... आणि मुकुंदरावाची जीपगाडी देवळाच्या मागे चोरट्यासारखी येऊन उभी राहिली. देऊळ आणि पोस्ट ह्याच्यात तीन मिनिटाचं अतर होत. मात्र देवळाच्या पिछाडीला लागून डाबरी हमरस्ता होता.

मुकुंदराव जीपमधून उतरला त्यावेळी त्याच्या हातात एक खाकी कागदी पिशवी होती. त्यात काहीतरी होतं. मुकुंदराव देवळामागून हळूहळू चालत निघाला तो थेट पोस्टापाशी आला. तेथे आल्यावर त्याने आजूबाजूच्या वातावरणाचा हलकेच कानोसा घेतला. मग हलक्या पावलाने तो पोस्टाची माडी चढू लागला. पोस्टाचं आढ खूपच उंच होत. त्यामुळे लावलचक जिना चढून त्या मन.स्थितीत मुकुंदरावाला किंचित दमल्यासारख वाटल. पाय तसेच ओढून तो देसाई बिऱ्हाडापाशी आला. खाकी पिशवीत क्लोरोफॉर्म शिंपडून ठेवलेला एक मोठा बोळा होता. हा क्लोरोफॉर्म एरणगावच्याच सरकारी दवाखान्यातला होता.

कल्पना घरात काहीबाही काम करीत होती. दरवाजा उघडाच होता. मुकुंदराव थेट घरात शिरला. कल्पना पाठमोरी उभी होती. तिला मागून जाऊन मिठी मारायची आणि क्लोरोफॉर्मचा बोळा जोरात तिच्या नाकावर दाबायचा, हा मुकुंदरावाच्या डोक्यातला पहिला विचार होता. त्यानंतर बहुधा तिला पळवून नेण्याचाच त्याचा बेत असावा.

मुकुंदराव हलकेच पुढे सरकला आणि त्याने कल्पनाला मागून मिठी मारली. कल्पना जोरात ओरडणार एवढ्यात दुसऱ्या हाताने आपल्या नाकाजवळ येणारा बोळा तिला दिसला. जीव एकवटून तिने त्या बोळ्यावर आपला हात आपटला आणि तो बोळा क्षणात कोपऱ्यात जाऊन पडला. मुकुंदराव गडबडला. तो दरवाज्याकडे धावला. त्याला कडी लावून घ्यायची होती. कल्पना जिवाच्या आकाताने किंचाळली. मुकुंदराव पुन्हा मागे वळला. वाघासारखा तिच्या अंगावर धावला. कल्पनाने कोपऱ्यातला झाडू उचलून फाटकन त्याच्या तोंडावर मारला. झाडूची काडी लागून मुकुंदरावाच्या ओठाशी खरचटल आणि रक्त येऊ लागलं. तो पिसाळला. एकीकडे कल्पनाच ओरडणं चालू होतं .. आणि एकाएकी खाली माणमाची गडबड झाल्याचं मुकुंदरावाच्या कानात शिरल आपल रक्त पुसून कल्पनाला त्याने जोराचा ठोसा लगावला. मग घाईघाईने कडी उघडून तडफडत तडफडत जिना उतरून तो पळून गेला. मुकुंदरावाच्या

ठोशाने डोळ्यापुढे अंधेरी येऊन कल्पना खाली कोसळली.

एका बाजूने मुकुंदराव पळून गेला आणि दुसऱ्याच बाजूने श्यामकांत, पोस्टमास्तर आणि इतर मंडळी माडीवर आली. मुकुंदराव रक्त पुसत पळून जाताना किमान आठ-दहा माणसानी पाहिलेलं होतं. एकीकडे मुकुंदरावाच्या ठोशाच्या वेदनेतून कल्पना सावरून उठत होती, तर मुकुंदराव देवळाच्या पिछाडीला उभ्या असलेल्या आपल्या जीपचं इंजिन धबाधब चालू करून ऐंशीच्या वेगात तिथून पळून गेलेला होता.

¤

एकंदर घटना घडून गेल्यानंतर एरणगाव अवाक् झालं. चव्हाणाचं खानदान उभ्या एरणगावात बदनाम झालं. आपल्या पत्नीवरचं गंडांतर टळलं म्हणून श्यामकांत देसाईने देव्हाऱ्यासमोर मनोभावे हात जोडले. मुकुंदराव ह्या घटनेमागे होता. हे कळून पोक्त पोस्टमास्तर हादरून गेले... आपला चष्मा हातात घेऊन पुसत त्यांनी हताशपणे श्वास सोडला. गावच्या पोलीसचौकीत बातमी पोचल्यावर आता पुढं काय करायचं, हे विचारायला फौजदाराने एक शिपाई हवेलीवर पाठवला. कल्पनाच्या डोळ्यातून भीतीने अश्रूंची धार वहात होती. पोस्टासमोर पोरा-सोरांची निष्कारण गर्दी जमू लागली होती.

सगळा बडेजाव विसरून आप्पासाहेब पडल्या चेहेऱ्याने चालत चालत श्यामकांताकडे आले आणि त्याचे पाय धरून त्यानी माफी मागितली. झाल्या प्रकाराने देसाई कुटुंब व्यथित होऊन गेलं होतं. कोण-याही परिस्थितीत एरणगावला आता रहायचं नाही, हे श्यामकांत देसाईने पक्कं ठरवून टाकलेलं होतं. तिरीमिरीने उठून त्याने आपल्या मुंबईच्या काकांना – नाथाकाकांना – पत्र लिहून टाकलं. पुढल्याच आठवड्यात कल्पना आणि नीलूला मुंबईला नेऊन ठेवायचं त्यानं मनाशी निश्चित केलं. झाला प्रकार थोडक्यात लिहून विभाग कचेरीकडे त्यानं बदलीचा अर्ज पाठला आणि सुन्न, चिंताक्रांत चेहेऱ्याने तो पलंगावर पडून राहिला. एकट्या नीलूलाच फक्त समजलं नाही, नक्की काय घडलंय ते.

¤

'याऽऽ. कोण पाहुणे आलेत पाहिलत का?' नाथाकाकांनी आत काकूंना हाक मारीत म्हटलं. काकू लगबगीनं बाहेर आल्या.

'वाऽ श्यामकांत तू. आज सकाळीच ह्यांनी आठवण काढली होती. बस, पंखा लावते.' काकूंनी त्याच्या पद्धतीने स्वागत केलं. श्यामकांत बाहेर कोचावर नाथाकाकांबरोबर गप्पा मारत बसला. कल्पना आत स्वयंपाक घरात काकूंच्या समाचाराला गेली. नीलू बाहेर गॅलरीत मुलं खेळत होती तिकडे जाऊन उभी राहिली. प्रवासाचं सामान भिंतीजवळ सरकून बसलं.

आत कल्पनाने काकूंजवळ विषय काढला. बाहेर श्यामकांताने एरणगाव प्रकरणाचा इतिहास नाथाकाकांना ऐकवला. नाथाकाका आणि काकू ते ऐकून सुन्न होऊन गेले आणि 'अरिष्ट टळलं ग बाईऽ देवीची ओटी भरून टाक एकदा,' एवढं बोलून काकू निश्वास सोडत्या झाल्या.

नाथाकाकांनी क्षणभर विचार केला आणि स्वतःच्या नखाकडे पहात त्यानी श्यामकांताला सांगितलं, 'इतःपर तू एरणगावला न रहाणं हे हिताचं आहे. ह्या बडच्या धेंडांच्या नादाला लागण्यात अर्थ नाही. तू बदली करून घे इथे मुंबईला!'

'बघायचं आता. अर्ज तर करून ठेवलाय.' श्यामकांत खालच्या पट्टीत म्हणाला. त्यातला हताशपणा जाणवून नाथाकाका म्हणाले– 'हे बघ, मी तुमच्या पोस्टमास्तर–जनरलकडे ओळख काढतो. त्याचा भाऊ आमच्या अर्जुन गोळेचा चांगला दोस्त आहे. उद्याच आपण गोळेशी बोलू ह्याबद्दल.'

'कोण हा गोळे नाथाकाका?' श्यामकांताने उत्सुकतेने प्रश्न केला.

'आहे. ट्रेनी इंजिनीयर म्हणून आला होता आमच्या कंपनीत पाच वर्षं माझ्याबरोबर काम केलंय त्यानं. छान गप्पिष्ट माणूस आहे. तो काम करील आपलं. नुकतीच त्यानं आमची कंपनी सोडली. दुसऱ्या कंपनीत गेला आता, ॲक्झिक्युटिव्ह म्हणून. उद्याच फोन करू त्याला.'

श्यामकांतनं ह्यावर मान हलवली आणि तो आशेचा किरण हृदयात ठेवून दिला.

¤

टॅक्सीचं बिल देऊन गोळे नरीमन पॉईंटवर उतरला. मुंबईच्या उन्हाळ्यामुळे टॅक्सीतल्या टॅक्सीतसुद्धा त्याच्या गोऱ्यापान चेहेऱ्यावर घाम जमा झाला होता आणि घाऱ्या डोळ्यांत किंचित तांबडेपणा डोकावत होता. स्वतःशीच हुश्श करून त्यानं घाम पुसला आणि केव्हा एकदा आपल्या कंपनीच्या ॲअरकंडिशन्ड ऑफिसात जाऊन बसतोय असं त्याला होऊन गेलं. आपलं सुखवस्तु माफक स्थूल शरीर डोलवीत डोलवीत तो ऑफिसच्या पायऱ्या चढू लागला.

परचेस डिपार्टमेंटचं काम नेहमीच्या चालीवर सुरू होतं ठिकठिकाणी फोन घणघणत होते. माणसं आतून बाहेर आणि बाहेरून आत जात-येत होती. एकीकडे गोळे आपल्या सेक्शनचं काम पहात फायली चाळत बसलेला होता.

'साहेब'.

'हॉं' गोळेनं मान वर न करता विचारलं. त्याच्या खात्यातला एक तरुण कारकून काही तरी सांगू इच्छित होता.

'आज संध्याकाळी आमच्या घरी या.'

'कशाला? काय पार्टी–बिर्टी ठेवलीय काय?' गोळेनं आपले घारे डोळे वर करून हसत विचारलं.

'नाही साहेब, लग्नाचा सत्यनारायण ठेवलाय. तीर्थप्रसादाला न विसरता यायचं संध्याकाळी.'

'हे बघा पट्टेकर, तुमच्या त्या तांब्यावर ताम्हण आणि वर तुळशीचा पाला ह्या देवाला मी मानत नाही. ह्या तेहतीस कोटी देवाची वसाहत कुठेय ते सालं बघायचंय मला एकदा.' हे ऐकून पोरगेल्या पट्टेकरने आपला चेहेरा सताड पाडला आणि बिचारा नाराज झाला.

'सोऽ, मिस्टर पट्टेकर, मी कोरडा ठणठणीत आणि नास्तिक माणूस आहे. लोक देवाला नमस्कार करतात, आरती करतात. मी चक्क आई-बहिणीवरून शिव्या घालतो, फॉलोड?' गोळेनं मान हलवत विचारलं. 'इतर प्रसंगी बोलवा, अवश्य येईन. ही पूजा–बिजा पटत नाही आपल्याला. ओके?'

गोळेचा नास्तिकपणा पाहून पट्टेकर सर्द झाला. काही क्षण तो. तिथंच रेंगाळत राहिला. मग गोळेनं पुन्हा मान वर करून विचारलं,

'अेनीथिंग अेल्स ?'

'साहेब, आज दुपारी हाफ-डे रजा पाहिजे होती. म्हणजे काय ... पाहुणे येणारेत नं पुष्कळ, आणि घरी तसा पहाणारा मी एकटा म्हणजे ...'

'ओकेऽ ओके. अर्ज भरून आणा. माझी सही घ्या.'

'थॅंक्यू सर. थॅंक्यू.' पट्टेकरचा चेहरा फुलला. साहेबाचा नास्तिकपणा विसरून तो अर्ज भरायला गेला. ते सर्व पाहून गोळे गालातल्या गालात हसला आणि आपल्या शर्टाच्या बाहीवर सकाळी निघताना टाकलेल्या इंटिमेटचा धुंद सुगंध काही क्षण मुद्दाम हुंगत राहिला.

'मिस्टर गोळेऽ एक्स्टर्नल कॉल फॉर यू', कोणी तरी बोललं. इंटिमेटच्या सुगंधातून भानावर येऊन गोळेने फोन घेतला ... 'हॅलो गोळे हियर.'

'हा, विश्वनाथ देसाई बोलतोय. कसं काय चाललंय ?'

'अरे हां बोला विश्वनाथराव, काय म्हणतोय आमचा एक्स एम्प्लॉयर ?'

'चाललंय, मागील पानावरून पुढे. दुसरं काय? बर, आज सध्याकाळी काय करताय ?'

'आज सध्याकाळी ... काही नाही बुवा ... फार तर ईरॉस नाही तर स्टर्लिंगला जाऊन बसणार नेहमीप्रमाणे.'

'आज संध्याकाळी या जरा गप्पा मारायला.'

'काही सत्यनारायण वगैरे नाही ना ?'

'नाही नाही, डोन्ट वरी. त्याला तुमच्यासारख्या यांत्रिक मानवाला मी तरी नाही बोलावणार. एक फार महत्त्वाचं काम होत तुमच्याकडे. माझा पुतण्याही आलाय. त्याचीही ओळख करून देतो."

'जरूर जरूर. संध्याकाळी सातपर्यंत येतो.'

'वाट पहातोय मग –'

'पण काम काही विशेष ?'

'प्रत्यक्षच बोलू सध्याकाळी.'

'ओके ... येतो मी संध्याकाळी.' गोळेन टेलिफोन ठेवला.

¤

सव्वासातच्या सुमारास गोळे नाथाकाकाकडे पोहोचला. नीलू बाहेरच खेळत होती.

'ही कोण परी ?' गोळेनं नीलूचा गालगुच्चा घेत म्हटलं.

'ही आमची सोनेरी परी. नाव साग बेटा काकांना.' नाथाकाका कौतुकाने म्हणाले.

'नी...लू...'

'हां हा, संपूर्ण नाव सांगायच,' नाथाकाकानी लटका आग्रह केला.

'ही काय शाळाय सपूर्ण नाव सागायला ?' नीलू पटकन बोलून गेली.

गोळे कौतुकाने गडगडाट करून हसला आणि नीलूला उचलून घेत म्हणाला, 'आम्हाला आवडला हा नन्हा फरिश्ता. बरं का, चला, आपण आइस्क्रीम घेऊन येऊ या.'

गोळे आल्यापावली तसाच नीलूला घेऊन आइस्क्रीम घेऊन आला. नाथाकाकांच्या गॅलरीत उभं राहून नीलू कपातलं आइस्क्रीम खाण्यात मग्न झाली होती. गोळे म्हणाला, 'साली, हुशार आहे पोरगी.'

नाथाकाकानी गोळेची श्यामकांताशी आणि कल्पनाशी ओळख करून दिली. आपले घारे डोळे हलवत गोळे कल्पनाला म्हणाला, 'छोकरी तुमचा चेहेरा घेऊन आलीय.'

गोळेनं श्यामकाताच्या बदलीचं काम ऐकून घेतल आणि 'उद्याच करू टाकू, त्यात काय' असं तो बेफिकीरपणे बोलला. चांगल्या दीड-दोन तास दिलखुलास गप्पा मारून गोळेनं सर्वांचा निरोप घेतला. आग्रह करूनही तो जेवायला थाबला नाही. 'एका पार्टीला जायचय, जेवायला पुन्हा कधी तरी येईन.' म्हणाला.

गोळे गेल्यानतर नाथाकाका श्यामकाताला म्हणाले, 'गोळे काम करतो म्हणाला, म्हणजे तो नक्की करणार.' नाथाकाकाचे शब्द ऐकून श्यामकाताच्या चेहेऱ्यावर टवटवीतपणा आला. आनंदाच्या भरात नीलूला उचलून त्यानं तिचा मुका घेतला.

¤

वास्तविक गोळेला कोणत्याही पार्टीला जायचं नव्हतं. घरी गेल्यानंतर तसं कोणी वाट पहाणारंही घरी नव्हतं. बत्तीस वर्षांचा रंगेल आणि दिलदार गोळे अजूनही ब्रह्मचारी होता. बत्तीस वर्षांचं स्थूल शरीर बाहेरून नेहमी झकपक आणि भारी कपड्यात असायचं. आत पोटात जाणारे पदार्थ नेहमी चमचमीत आणि झणझणीत असायचे. कंपनीच्या परचेस डिपार्टमेंटला असल्याने वरकड कमाईतून मिळणारा त्याचा बहुतेक पैसा बेफाम चैनीवर खर्च व्हायचा.

गोळे नाथाकाकाकडून टॅक्सीने निघाला तो थेट, थ्री स्टार बारमध्ये येऊन बसला. वेटरला रमचा एक मोठा पेग आणायला सागून त्या अंधुक उजेडात सिगारेट शिलगावली. तोडातून बाहेर फडफडणाऱ्या धुरातून तो मेनूकार्ड वाचू लागला. त्याच मन आता किंचित भिरभिरत होतं. रम पोटात गेल्यानंतर त्याच्या मनाचा गिच्च-गोळा होणार होता. गोळेच्या डोक्यात श्यामकाताचे आणि विशेषत: कल्पनाचे विचार येत होते. ते जोडपं त्याला प्रथमदर्शनीच विजोड वाटलं. क्षणभर त्याच्या डोक्यात एक विचार घुटमळला. आपली बहीण जर अशीच सुदर असती तर एव्हाना तिचं लग्न होऊन...बहिणीचा विचार डोक्यात येऊन गोळेचं मन आणखी भिरभिरलं. बारमधल्या त्या अेअरकंडिशन्ड शीत हवेमुळे तो किंचित थरथरला. त्याच क्षणी वेटरनेही रमचा ग्लास समोर आणून ठेवला. घाईघाईने त्यात सोडा ओतून गोळेन रमचा मोठा घोट घेतला. तो दहा वर्षांपूर्वीचा प्रसग त्याच्या डोळ्यासमोर तरळू लागला......

¤

अर्जुन गोळे आपल्या होस्टेलच्या रूमवर इंजिनियरिंगचा अभ्यास करण्यात गढला होता, तेवढ्यात त्याच्या नावे आलेली ती तार प्यूनने त्याच्या पुढ्यात आणून टाकली. तार वाचून बावीस वर्षांचा अर्जुन गोळे एकदम स्तिमित होऊन गेला. काय करावं काही कळेना, ताबडतोब गावाला पोहोचणं आवश्यक होत. आपण पोहोचेपर्यंत कदाचित आईचं देहावसानही होऊन जाईल, अस त्याला वाटल. मामा

## गोळे काम करतो म्हणाला, म्हणजे तो नक्की करणार

तार करणार म्हणजे गंगेचं पाणी संपल्यावरच, ह्याची त्याला खात्री होती. ताबडतोब त्याचे रूम पार्टनर्स जमा झाले. इकडून तिकडून पैसे गोळा झाले. अर्जुन गोळे आपल्या अत्यवस्थ आईला पहायला गावी निघाला. ती तार म्हणजे त्याला खरोखरीच एक धक्का होता.

मिळेल ते वाहन पकडून गोळे गावी पोचला. वाड्याबाहेर काही मंडळी अस्वस्थ येरझारा घालीत होती. गोळेनं हातातलं सामान तिथंच टाकलं आणि अत्यंत अधीर मनाने तो आईच्या मृत्युशय्ये-जवळ आला. मामीच्या डोळ्यांतून अखंड अश्रुधारा वहात होती. ताराच्या तोंडून नुसताच हुदक्यांचा आवाज बाहेर पडत होता. अश्रू केव्हाच संपले होते. मामा एका बाजूला कोरड्या चेहेऱ्याने बसले होते. आईचा जीव अर्जुनासाठी अडकला होता. तो आल्याचं कळताच तिचा मृत्युमुखी चेहेरा किंचित उजळला. आपले दुबळे हात वर करून ती अर्जुनाला जवळ बोलावू लागली. भाऊ वेळेवर पोहोचल्याचं पाहून ताराच्या डोळ्यातून कुठेतरी उरलेले आणखी दोन अश्रू बाहेर पडले. भाऊऽऽ. असा हुंबरडा फोडून ती गोळेच्या अंगावर येऊन पडली. गोळेचं हृदय आतल्या आत थरथरू लागलं. त्याला काही बोलताच येईना.

'इकडे ये भाऊ.' आईने मंद करुण आवाजात हाक मारली.

'काय आई?' अर्जुन तिच्या हाताजवळ गेला.

'आपल्या तारीचं लग्न अजून...' तिचा थरथरता आवाज दाटला. मामीनी एक चमचा गंगाजल आईच्या मुखात ओतलं. मृत्यू-समयी आईच्या डोक्यात ताराच्या लग्नाची काळजी होती.

'तू काही काळजी करू नकोस आई. मी करून देईन तिचं लग्न.' अर्जुन म्हणाला.

'तुझं शिक्षण...'

'झालं आई आता. पुढल्याच वर्षी मी इंजिनियर होणार.' आईला धीर देत अर्जुनने शब्द रेटले.

'मला तारीची काळजी वाटते... देवानं तिला रूपही दिलेलं नाही. तुझ्यासारखी... गोरी पण नाही.'

'त्याची काळजी करू नकोस, आई. मी पाहीन तिला स्थळं.'

'तू इंजिनेर होणार... लग्न करून मोकळा होशील. तारी बिचारी दुसऱ्याच्या दारात तशीच...' अशिक्षित, कष्टाळू आईच्या मरणोन्मुख तोंडून काळजी बाहेर पडत होती.

'आई, मी तुला वचन देतो. तारीचं लग्न झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही...' अर्जुन निर्धारपूर्वक म्हणाला. त्याच्याकडून हवे असलेले शब्द ऐकून आईने समाधानाने आपला थरथरता हात वर करून आपल्या दोन्ही पोरांना आशीर्वाद दिला. मग काही क्षणा-तच शेवटची उचकी देऊन तिनं ह्या जगाचा निरोप घेतला. दोन दिवसाच्या तापाचं निमित्त होऊन गोळेची आई आपला प्रवास संपवून गेली होती. मामा आपल्या बसल्या जागेवरून कोरड्या चेहेऱ्यानेच उठले आणि पुढल्या व्यवस्थेला लागले. मामीनी जोराचा हुंबरडा फोडला आणि क्षणभर ते चुना-मातीचं खेडेगावी घर दुभग-ल्यागत झालं....

¤

आठवणीच्या वावटळीत गोळेचे पाच पेग होऊन गेले होते. बिल देण्यासाठी म्हणून त्यानं आपलं पाकिट बाहेर काढलं आणि त्याला ताराचा फोटो त्याच्या नजरेस पडला. स्थळांना देण्यासाठी म्हणून आतापर्यंत त्या फोटोच्या शेकडो प्रती त्यानं काढून घेतल्या होत्या. दहा वर्षांच्या कालावधीत किमान दोन-तीनशे जणांबरोबर पत्रव्यवहार, चौकश्या हे प्रकार केले होते आणि कुरूप ताराला, मोजून एकशेदहा स्थळाकडून नकार आलेला होता. आईला मरताना दिलेलं वचन आणि तो प्रसंग ही गोळेची भिरभिरती अस्वस्थता होती. जोपर्यंत ताराचं लग्न होत नाही तोपर्यंत अर्जुन गोळे चतुर्भुज होत नाही, हे पक्कं होतं. ताराच्या लग्नाचे प्रयत्न गोळे अजूनही कसोशीने करत होता. मामा-मामीच्या सोबतीने आणि तिथल्या पूर्वापारच्या ओळखीमुळेच तारा त्या खेडेगावात आपलं मन रमवू शकत होती. नेहमी मुंबईला पत्र टाकून लग्नाचं कुठपर्यंत आलय, याची चौकशी ती उद्विग्नपणे करत रहायची. गोळे त्या प्रत्येक पत्राच्या उत्तरात तिला धीर द्यायचा. इरॉस नाही तर स्टर्लिंगमध्ये बसून हाणामारीचे चित्रपट पहात ताराला आलेले नकार तो विसरून जायचा. विसरण्यासाठी नवे नवे नाद स्वतःला लावून घ्यायचा.

गोळेला आपल्या बहिणीच्या लग्नाची एवढी काळजी होती की, स्वतःच्या लग्नाबद्दल विचार करायला त्याला सवडच नव्हती. सुंदरलाल-शेठच्या वाड्यात साध्या डबलरूम घेऊन गोळे गेले कित्येक वर्षं तेथे रहात होता. त्या तेवढ्या डबलरूममध्ये फ्रीज, टी. व्ही. पासून ते स्टिरिओपर्यंत सर्व अद्यावत यंत्रे गोळेच्या दिमतीसाठी तयार असायची. गोळेच्या घरात फक्त दोनच वस्तु नव्हत्या. त्याच्या नास्तिकपणामुळे त्याच्या घरात देव-देव्हारा नव्हता आणि पलंगावर ब्रह्मचर्य जास्त टोचतं, अशी गोळेची समजूत असल्यामुळे घरात पलंगही नव्हता. भरपूर चैनबाजी करून आणि गावी पैसे पाठवूनही बँकेत त्याच्या खात्यात हजारो रुपये साठून पडले होते. एवढं असूनही गोळे आपल्या डबलरूम-मध्ये जमिनीवर साध्या पातळ अंथरुणावर झोपायचा.

रात्रीचे पावणेअकरा होऊन गेले होते. गोळे बारमधून बाहेर पडला आणि टॅक्सीने आपल्या घरी निघाला. गुंडाळून ठेवलेल्या पातळ अंथरुणावर एखादं तरी झुरळ इकडे तिकडे करत असणार, याची कल्पना त्याला त्या रमच्या नशेतही होती.

¤

गोळेने काय उद्योग केला कोण जाणे, पण श्यामकांताच्या बदलीची ऑर्डर ताबडतोब निघाली. तीन दिवसात त्याला मुंबईला पोस्टात हजर व्हायचं होतं. बदलीची ऑर्डर निघाल्याचं कळताच नाथाकाकां-नाही हायसं वाटलं. एरणगावाहून सामान हलवण्यासाठी श्यामकांताने पुन्हा लॉरीची सोय केली. पण आता श्यामकांतापुढे प्रश्न होता, 'मुंबईत हे सामान ठेवायचं कुठे?' कुणाच्या जागेत ती लॉरी खाली करायची? मुंबईत रहायचं कुठे? नाथाकाकांकडे किती दिवस रहायचं? जागेचो अडचण कशी सोडवायची.

त्या वेळेला श्यामकांताचं नशीब एकंदरीत जोरदार असावं. गोळेनं जागेच्या बाबतीतही मोलाची मदत केली. मुंबईतल्या त्या उपनगरात अखेर भाड्याच्या दोन खोल्या श्यामकांताला मिळाल्या. त्याची स्वतःची शिल्लक अधिक नाथाकाकाकडून घेतलेले पाच हजार रुपये आणि गोळेनं ओळखी काढून कमी करून दिलेली पागडी ह्यामुळे देसाई कुटुंबाला मुंबईत निवारा मिळू शकला. शेवटी कमी पडलेले दोन हजार रुपये गोळेनं भरले. गोळेची एकंदर मदत पाहून श्यामकांत

ओशाळून गेला. त्यानं आपली कृतज्ञता खालच्या मानेने गोळेकडे कबूल केली. गोळे म्हणाला, ' छोडो यार, ये कुछ भी नही. तुझा भाऊ असता तर त्यानेही तुला केली असती इतकी मदत.'

श्यामकांताच्या बाबतीत गोळे म्हणजे एक परमेश्वराचं रूपच ठरलं होतं. गोळेच्या दिलदार वृत्तीमुळे तो प्रभावित होऊन गेला होता. त्याच्या दिलखुलास गप्पा मारण्याच्या सवयीमुळे त्याच्याकडे आकर्षिला गेला होता. गोळेच्या बहिणीचा इतिहास ऐकून आपण ह्याबाबत गोळेला काहीतरी मदत करावी, असंही त्याला वाटू लागलं होतं. गोळेची छानछोकी, चैनबाज उधळेपणा, नादिष्टपणा आणि व्यसनं ह्यात काहीतरी बदल व्हायला हवा असं त्याला आतल्या आत जाणवत होतं. तो गोळेच्या जवळजवळ चालला होता.

¤

मुबईच्या जागेत मुहूर्त करून श्यामकाताने आपलं नवं आयुष्य सुरू केलं. मिळालेली जागाही त्याला मनापासून आवडली होती. एखाद्या छोटेखानी चाळीचं वातावरण असावं अशी ती पाढरीशुभ्र इमारत होती. आजूबाजूला बढे, सावे, कर्णिक, धारगळकर अशा नावाची इतर बिऱ्हाडं होती. त्यात देसायाची नवी भर पडली. ओळखी झाल्या. देसाई मुबईकर बनून गेले. मागे एरणगावला असताना काही झालं होतं याची आठवणही कधी येईनाशी झाली. नीलूला नव्या मित्र-मैत्रिणी मिळाल्या. तिथे तीही आपल्या भातुकलीच्या खेळात रमून गेली. काय हवं-नको विचारायला गोळे अधूनमधून येऊन जायचा. परिणामी श्यामकात आणि गोळे अरे-तुरेतले जिवलग मित्र बनले. घरोबा म्हणून एकमेकांकडे फेऱ्या मारू लागले. निपुत्रिक नाथाकाकांना शहरात सांगण्यासारखा एक आधार मिळाला. चिमुरड्या नीलुचाही त्यांना लळा लागला.

दिवस भराभरा जात होते. मुंबईला सगळ बस्तान व्यवस्थित बसलं होतं. एकदोन वेळा नाथाकाका आणि काकू येऊन नवं बिऱ्हाड बघून गेला होत्या. मध्यंतरी जोडून सुट्टी आली तेव्हा जयंताही पुण्याहून आला होता. ही सगळी घरची माणसं होती तसाच गोळेही होता. चार-दोन दिवसातून एकदा तरी त्याची फेरी असायचीच. येताना नीलुसाठी लॉलीपॉप. त्याची बगबग आणि खाऊ आणणे यामुळे नीलुची आणि त्याची तर चागलीच गट्टी जमली होती. काका, काका म्हणून ती त्याच्या मागे असायची. मध्येच एकदा तर ती एकटी गोळेबरोबर गेली आणि सर्कस पाहून आली. महिन्यातून एखादे वेळी एखाद्या रविवारी श्यामकात गोळेला जेवायला बोलवायचा. गोळे, श्यामकात, कल्पना, नीलु ह्याच जणू चार जणाचं कुटुब होतं.

¤

एकदा एका रविवारी गोळे सकाळीच आला. श्यामकांत दाढी करत होता. गोळे तसाच नेहमीसारखाच ओरडत ओरडत आत आला आणि 'कॅलेंडरवरची तारीख फाडायला विसरलास.' असं म्हणत टर्रकन तारखेचं पान फाडलं. मात्र गोळे आज रिकामा आला नव्हता. हातात काहीतरी लोंबकळत होत.

' गोळे हातात काय आहे ?' श्यामकातान विचारल.

' तु पयिले दाढी आटप, मग सागतो.' गोळे उत्तरला.

श्यामकातनं दाढी आटपली. सामान आवरलं. मग गोळेच्या समोर येऊन टॉवेल घेऊन बसला.

' जरा वहिनींना बोलव.' गोळे एकदम म्हणाला.

' काय रे. आज विशेष ?'

' तू बोलाव तर खरा.'

श्यामकांतान कल्पनाला हाक मारून बोलावलं. कल्पना आत कामात होती म्हणून कल्पनाला बोलवायला श्यामकांत आत गेला.

' कल्पना, गोळे बघ काय म्हणतोय. जरा बाहेर ये.'

कल्पना आणि श्यामकांत बाहेर आले. एका पिशवीतून गोळेनं दोन भारी किंमतीच्या अमेरिकन जॉर्जेट साड्या काढल्या. एक गुलाबी होती. दुसरी चटणीकलरची हिरवट. दोन्ही साड्या दृष्ट लागण्यासारख्या होत्या. त्या पुढे टाकत गोळे म्हणाला,

' वहिनी, बघा कशा वाटतात ?'

' छान आहेत. पण किंमतही भारी असणार !'

' किंमत सोडा हो. फक्त कशा वाटतात ते सागा.' गोळे म्हणाला.

' काय किंमती आहेत रे. साड्या चागल्या आहेत नाही ?' श्यामकात कल्पनाकडे पहात म्हणाला.

' ह्या स्मगल्ड साड्या आहेत. बाजारात तुम्हाला अशा शोधून मिळायच्या नाहीत; पण मित्राकडून उचलून आणलाय हा माल.' गोळे सागत होता. ' वहिनी, ही गुलाबी साडी बघा कशी वाटते? '

' छान आहे.' कल्पना म्हणाली. तिला हे माहीत होतं की साड्यांचं बजेट काही आपल्याला जमणार नाही.

' आवडली असेल तर ठेवा.' गोळे चटकन म्हणाला.

' पण बेट्या, किंमत सागशील का नाही ?' श्यामकांतने विचारल.

' किंमत कसली ? अशीच उचलून आणलोय झालं.'

गोळे ती गुलाबी साडी ठेवून गेला. कल्पनाने ती साडी नेसली तेव्हा मात्र ती एखाद्या सिनेमा-नटीसारखी आकर्षक दिसत होती. कल्पनाच्या सौदर्याची तो जातच वेगळी होती.

गोळे पुन्हा कधीच त्या साडीबद्दल काही बोलला नाही. साडीचे पैसेही घेतले नाहीत. श्यामकाताने एक-दोन वेळा विचारले तेव्हा त्याने विषय फिरवला. मात्र एकदा त्याने त्या साडीत कल्पनाला पाहिले तेव्हा तो म्हणाला, ' वहिनी, छान दिसते तुम्हाला ही साडी. '

¤

मुबईत आल्यापासून देसाई कुटुबाचे दिवस सुखात जात होते हे खर, पण आर्थिक ओढाताण फार होत होती. महिनाअखेर तर फारच जड जायची. एखादी महिनाअखेर अशी यायची की शामकाताच्या खिशात पाच रुपयेसुद्धा नसायचे. एखादे वेळी नीलुच्या खाऊसाठीसुद्धा पैसे अपुरे पडायचे. मग बोलण्यात काही तरी सारवासारव करावी लागायची. अशा वेळी कल्पना मनातून खट्टू होई.

ह्याबाबतीत गोळे नेहमीच मदत करायचा. विशेष म्हणजे माणसाचा चेहेरा पाहूनच तो सारं काही ओळखायचा. न मागता पैसे हातात कोबायचा. देता देता म्हणायचा, ' बँकेच्या तिजोरीत बद करून ठेवण्यापेक्षा कोणाच्या उपयोगी पडलेले बरे. ' गोळेची पद्धतही वेगळीच होती. दहादहाच्या पाच-सहा किंवा हाताला येतील तेवढ्या नोटा तो द्यायचा. त्यातल्या आपल्याला हव्या तेवढ्या घेऊन बाकीच्या, उसने घेणाराच गोळेला परत द्यायचा. बारेमाप चैन आणि व्यसन असली

तरी गोळेच्या पाकिटात शभराची एखाददुसरी नोट हमखास शिल्लक असायची. कुणाला पैसे उसने द्यावेत, खरा गरजू कोण, लफंगा कोण, कुणाची किती रकमेची लायकी वगैरे व्यवहारात, गोळेचा हातखंडा होता. शामकांत किती घेत होता आणि किती देत होता ह्याचा हिशेब गोळेकडे नव्हता पण शामकांत हिशेबात चोख होता.

खरोखरीच एखाद्या भावाची झाली नसती एवढी गोळेची मदत शामकांताला होत होती.

¤

हल्ली हल्ली कल्पनाचं काही तरी बिनसल्यासारखं वाटायचं. तिच्या सुंदर चेहेऱ्यावरच्या खळ्या कुठे तरी गळून पडल्यायत असं वाटायचं. कुणी एखादी जड छटा तिच्या चेहऱ्यावर पसरून मळभ आणते आहे असं भासायचं. श्यामकांताला ते विचित्र वाटायचं. चमत्कारिक वाटायचं. नकोसं व्हायचं. कल्पनाचं कोमल हास्य परत आणायचा प्रयत्न त्याला करायचा होता.

त्या दिवशी दमून-भागून शामकांत घरी आला. ऑफिसमध्ये काही बिनसलं असावं. कामात काही चूक झाली म्हणून वरिष्ठ बोलला असावा. काही असेल; पण शामकांताचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. आल्याआल्या झटपट पाय धुऊन त्यानं चहा मागितला. तो होईपर्यंत सुद्धा त्याला धीर नव्हता. कल्पनाचा चेहेराही नेहमीसारखाच होता. म्हणजे ते कोमल हास्य तिथे नव्हतं जड छटा होती.

चहा झाला. तो पिता पिता कल्पना एकदम म्हणाली, 'तुम्ही गोळे भावोजीकडून काही पैसे उसने घेता?'

'आँ?' शामकांत एकदम बधिर झाला. खरं तर ह्या संदर्भात कल्पना एखाद्या कोऱ्या कागदासारखी होती.

—आणि अचानक त्यावर ठिपका...शामकांत गडबडला. आणि सावरून म्हणाला,

'आँ ..का बरं?'

'नाही. घेत असाल तर घेऊ नका. जे काही तुमच्या कष्टाचे येतील त्यात मी भागवीन. पुन्हा त्याच्याकडून पैसे घेऊ नका. माझी शपथ आहे तुम्हाला!'

'अग, पण असं का? आज एकाएकी हे काय तुझ्या डोक्यावर भूत चढलं? गोळे काही बोलला का?'

'नाही.'

'मग इतर कुणी काही बोललं का?'

'च्यक् ऽऽ'

'मग हे एकाएकी काय?'

'...............'

कल्पना स्वैपाकघरात निघून गेली. शामकांतानं खाटेवर आपलं शरीर ढकलून दिलं. त्याचं किरकोळ शरीर थरथरत राहिलं. मनानंही त्याला साथ दिली. नीलू 'बाबा ऽ बाबा ऽऽ' असं ओरडत आली. शामकांतानं तिला नेहमीसारखी उचलून घेतली नाही. तिचे पापे घेतले नाहीत. तो नुसतं म्हणाला, 'ओ ऽ बेटा...'

¤

कल्पनाने घातलेली शपथ शामकांताच्या मेंदूवर कोरली गेली. तो एवढंच समजला की, कुठून तरी ह्या गोष्टीचा पत्ता तिला कसातरी लागलेला आहे. त्यासरशी त्याने एक मात्र ठरवून टाकलं—गोळेकडून एक पैसाही घ्यायचा नाही, जीव गेला तरी! एखादा निर्णय भावनेच्या तागडीत एकदम जीवाशी बरोबरी करतो, तो असा.

कालच गोळे रस्त्यात भेटला. सिगरेटचं थोटुक हातात होतं. 'आज कॅज्युअल मारलीय!' म्हणाला. त्याचे घारे डोळे नेहमीसारखेच हसत होते. कपड्यांवर नेहमीप्रमाणे धुंद सुगंध होता. कानात लखनवी अत्तराचा बोळा होता. इस्त्रीने तरारलेले रंगीबेरंगी डिझाइनचे दिमाखी कपडे होते. त्यांत होता गोरापान स्थूल देहाचा, चपळ तोंडाचा चतुर गोळे! शामकांत शरीरानं हलका आणि मनानं जड होता.

'काय बेटचा, आज मूड नाही दिसत?' गोळे म्हणाला.

'नाही रे तसं काही नाही.' शामकांत चेहेरा ओढत म्हणाला.

'काही अडचण आहे का? पैसे देऊ?' गोळेनं विचारलं.

'नाही, नको!'

'का रे?'

'काही नाही. काही अडचण नाही.'

'पण हवे तेव्हा माग. संकोच नको करू!' गोळे दिलदारपणे म्हणाला.

'हाँ, गोळे, निघतो. घाईत आहे थोडा आज. घरीच आहेस ना? येईन संध्याकाळी.' शामकांताने झपाट्याने स्वत:ची सुटका करून घेतली.

दोघांची फाटाफूट झाली.

¤

तो दिवस पुन्हा असाच क्लेशाचे काटे खुपसून गेला. शामकांताच्या घरापासून पाचवं बिऱ्हाड कर्णिकाचं होतं. समोरून एक मोठी गॅलरी एखाद्या सरळ रस्त्यासारखी पसरली होती. त्याच्यावरून कर्णिकांचा छोटा उन्मेष नवी मोटारगाडी चालवत होता. लाल रंगाची सुन्दर टुमदार मोटार होती ती. उन्मेष ती पायानं चालवीत आणि स्टिअरिंग फिरवीत गॅलरीभर फिरत होता. त्या नव्या मोटारीचं नीलूला आकर्षण वाटलं. तिला बसायचं होतं त्यात आणि झालं, त्याच्यावरून नीलूची आणि उन्मेषची भांडाभांडी आणि झोंबाझोंबी! ओरखडे काढणं. नीलू डोळे चोळत ओक्साबोक्शी रडत घरी आली. शामकांत नुकताच आला होता.

नीलूच्या रडण्याचं कारण ऐकून शामकांतही विचारात पडला. त्याच्या छोट्या परीला एक छोटी मोटार तो आणून देऊ शकत नव्हता. झटक्यात त्याला असं वाटलं, उठावं आणि गोळेकडे जावं. त्याच्याकडून पैसे घ्यावेत आणि आत्ताच एक चांगली मोटार आणून द्यावी नीलूला; पण झटका ओसरला. शामकांत हतबल झाला आणि 'आणू आणू' असं दुबळेपणानं त्या लहान पोरीला समजावीत राहिला. तिच्या सोनेरी केसांवरून हात फिरवत राहिला.

नीलूचं रडणं ऐकून कल्पना बाहेर आली. गॅलरीत फिरत असलेली उन्मेषची मोटार तिनं पाहिली आणि ओळखलं, ही गोष्ट काही परवडणारी नाही. कल्पना जळफळली, जळफळली, खूप जळफळली... एका खेळण्यातल्या मोटारीनं खरे राजा राणी व्यथित होऊन गेले. डोकं धरून बसले.

सोनेरी केसांची नीलू थोड्याच वेळात सगळं विसरून जुन्या कॅटमधल्या पत्त्याशी खेळत राहिली. एकटीच, भान विसरून. तासभर.

चार दिवस गोळे भेटला नाही. शामकांताला बेचैन होऊ लागलं. संध्याकाळी घरी आल्यावर किराणा आणायच्या निमित्ताने त्याला बाहेर पडावं लागणार होतंच. शामकांत बाहेर पडला. बाजारहाट करण्यापूर्वी प्रथम गोळेचं घर गाठलं. बाहेरच्या बागेतून चालत येत असतानाच त्याला गोळेचं दार अर्धवट लोटलेलं दिसलं. वास्तविक चोवीस तास दार सताड उघडं ठेवून बसणारा गोळे आणि आज हा बदल कसा काय बुवा? शामकांत बुचकळ्यात पडला. त्यानं वर पाहिलं. गॅलरीत घरमालक सुदरलालशेठ लोडाला टेकून तंबाखू चोळत होता. आभाळात पहात होता, मग्न असल्यासारखा.

शामकांताने गोळेच्या घराच दार किरकिरलं 'कोणंय?' गोळेचा सुस्ती भरलेला आवाज ऐकायला आला. घरात अंधार करून गोळे एकटाच बसला होता. शामकांताला चाहुलीवरून ओळखत गोळे म्हणाला, 'नको, लाईट नको लावूस. लाईट नकोय मला.'

'अरे तुला काय झालंय काय?' असं म्हणत शामकांतानं लाईट लावला. झक्कन गोळे प्रकाशमान झाला. उघडाबंब, नुसती लुगी लावून खुर्चीत विसावून स्टुलावर पाय पसरून बसलेला. बाजूला ग्लास, एक बाटली–जवळ जवळ रिकामी होत आलेली. गोळे प्यायला होता. ते वातावरण संभ्रमात टाकणारं होतं. गोळेचे विपुल केस आज अस्ताव्यस्त पसरलेले होते. धुंद सुगंध आज कुठेतरी हरवला होता. दारूचा आंबटचिंबट वास नाकात आरपार जात होता.

'गोळे, आज आहे काय?' शामकांताने विचारलं. गोळे खुर्चीवर मान टाकून, डोळे मिटून पडून राहिला. त्याला हालवत शामकांत म्हणाला, 'गोळे, अरे काय तब्येत बरी नाही का?'

एक क्षण शांतता राहिली आणि गोळेने मोठा हुंबरडा फोडला! घळघळा अश्रू येत राहिले त्याच्या डोळ्यांतून. मग स्वतःच्या लुगीने ते टिपत गोळे मानेला आचके देत निपचित पडून राहिला. शामकात भांबावून गेला.

'गोळे, अरे काय झालं काय?' तरीही शामकातानं विचारलं.

'माझी बहीण गेली रेऽऽ, माझं वचन अर्धवट ठेवून गेली रेऽऽ!' सतत हसतमुख गोळेला असा शोक करताना पाहून शामकातच्या अंगावर काटा उभा राहिला.

'कधीची गोष्ट ही?'

मान हलवत बोटाने दाखवत गोळे म्हणाला, 'आजची, आजची!' टेबलावर तार पडली होती. गोळे बहिणीच्या अन्त्यदर्शनासाठीसुद्धा गेला नव्हता.

थोडा शांत झाल्यावर शामकांत म्हणाला, 'गोळे, चल बरं ऊठ. थोडं खाऊन घे. मग बरं वाटेल. तुझ्या जिवाचे हाल करून घेऊन का ती परत येणार आहे? चल ऊठ!' उरलेली बाटली पुन्हा उचलून गोळेनं ती ओठात ठेवली आणि दारूतून बुडबुडे येऊ लागले

'गोळे, बस कर! तुझी तब्येत बिघडेल. ठेव खाली!' शामकांत बोलत राहिला आणि बाटली रिकामी झाली. गोळेला ग्लानी आली. मध्येच काही तरी तो बहिणीच्या लग्नाबद्दल बडबडत राहिला. त्या वेळेस त्याचं चित्तही एवढं बेसुमार झालं होतं की, तो चटकन झोपेच्या आधीन गेला. त्याला व्यवस्थित झोपवायला हवं होतं. अर्थात जमिनीवरच. कारण त्याच्याकडे पलंग नव्हता.

¤

बरेच दिवस उलटले. गोळे ताळ्यावर आला. मनाने स्थिर झाला. चांगली लांबलचक रजा ऑफिसकडून मंजूर करून घेतली. गोळे म्हणाला, 'एवढी मोठी रजा मी कधीच घेतली नव्हती!'

त्याच्या बहिणीच्या लग्नासंबंधी झालेला पत्रव्यवहार, चिठ्याचपाट्या. कुंडल्यांच्या प्रती आणि त्याच्या बहिणीचे अनेक फोटो याचं बाड घेऊन गोळे घरातून बाहेर आला आणि बागेत एका कोपऱ्यात त्याने जागा निवडली. सर्व कागदपत्रं, फोटो जमिनीवर ठेवले आणि सिगरेट पेटवायला ओढावी तशी काडी ओढन ते सगळं बाड पेटवून दिलं. त्या कागदांनी आपला चेहरा काळा करून घ्यायला सुरुवात केली. त्याच्या बहिणीचे फोटोही जळत होते. गोळे स्थितप्रज्ञासारखा पहात होता. धूर नाकातोंडात जाऊ नये म्हणून नाकासमोर हात उडवत होता. बागेत धूर निघालेला पाहून आणि तो गोळेने केलेला पाहून सुदरलालशेठने कपाळावर हात मारून घेतला, घरात जाऊन शेठाणीला हाताला धरून बाहेर आणली आणि जळणारे फोटो दाखवत दबक्या आवाजात म्हटलं,

'आ, गोले देख, पुरा गांडा थई गयो, देखाने देखाने!' सुदरलालशेठने शेठाणीच्या खांद्यावर ठेवलेला हात झटकून शेठाणी आत तंबाखू जाळायला निघून गेली तिला वाटलं, आज शेठला मस्करीची लहर आली. तिला उद्याला तंबाखूची मिशरी नव्हती. ती गेलेली पाहून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात सुदरलालशेठने हात उडवला आणि तो गोळेच्या राशीला गेला. गॅलरीत उभं राहूनच गोळेला त्यानं विचारलं

'अरे गोले, हे काय जालते एकटा एकटा कोपऱ्यामंदी? झाडाच्या सैत्यानाश करून टाकेल. तिते ध्यान ठेव हाँ!'

'शेठजी, तुम्हाला समजलं नाय माझी बहीण वारली ते?'

'हाँ हाँ, ते समाजला, ते समाजला!'

'समजला नं? तिचंच प्रेत जाळतोय इथे!'

'प्रेत जाळते? आँऽ पुना बोल काय जाळते, आँ?'

तेवढ्यात शामकांत आला. गोळेला कागद जाळताना पाहून तो तिकडे गेला. अर्धवट जळलेले त्याच्या बहिणीचे फोटो पाहून शामकांत अवाक् झाला.

'अरे गोळे, हे काय, बहिणीचे फोटो?'

'हाँ यार, जळू दे, जळू दे. साफ जळू दे. तिच्या लग्नासाठी काढले होते. त्याचा आता काय उपयोग? जळू दे!'

'अरे, पण एखादा ठेवलायस नं घरात?'

'छाऽ एक फोटो नाही की एक निगेटिव्ह नाही ठेवलेली घरात. बहीण मेली. सगळं संपलं! आपल्याला यादे नकोत दोस्तऽ, त्रास होतो त्याचा!'

'कमाल आहे तुझी गोळे!'

'कोणाला वाटेल गोळेची बहीण मेली म्हणून गोळेला दुःख

**त्या कागदांनी, फोटोंनी आपला चेहरा काळा करून घ्यायला सुरुवात केली.**

झालं...नाही, त्याला दुःख झालं ते एवढ्याचसाठी की, शेवटच्या श्वासाला आईला दिलेलं वचन पाळता आलं नाही. वहीण गेली ती गेली. एक वचन आता कायमचं अर्धवट राहिलं. त्याचं ओझं घेऊन मस्त जगायला गोळे मोकळा झाला!'

'काय बोलणार तुझ्यापुढे?' शामकांत हताश झाला.

'शामकांत, एक गोष्ट फक्त नक्की झाली.'

'कोणती?'

'वचन पुरं झालं नाही. आयुष्यात आता लग्नाचा योग नाही पुन्हा. असंच जगायचं!' आणि गोळे खदाखदा हसत सुटला. शामकांताला बोलायला शब्दच नव्हते, गोळेची बकबक पुढं चालूच राहिली. जाळलेल्या कागदांचा काळा कचरा तसाच सोडून गोळे आणि शामकांत खोलीकडे वळले. वरती गॅलरीत सुंदरलालशेठनं कपाळावर हात मारला!

मूड बदलण्यासाठी म्हणून हाताला येईल ती रेकॉर्ड उचलून गोळेने रेकॉर्डप्लेअरवर ठेवली. मुकेशचा दर्दभरा सूर ऐकू आला, 'ओ, जानेवाले हो सके तो लौट के आना.'

¤

त्या दिवशी कल्पनाने अचानकपणे तो विषय काढला.

'माझ्या डोक्यात एक विचार आहे.'

'विचार? कसला बुवा?' शामकांताच्या अरुंद चेहेऱ्यावर प्रश्नार्थक आठी उगवली.

'आपली सध्या फारच ओढाताण चाललीय. पगाराचे पैसे कुठे उडतात ते कळतसुद्धा नाही! नीलूही आता तशी मोठी झालीय. बाहेरच्या पोरांचं काही तरी बघते आणि घरी येऊन हट्ट धरून बसते. तुम्हालाही मोजके कपडे. ह्या सगळ्या काटकसरीचा वीट आलाय अगदी!'

'अग. पण हे डिपॉझिटचे हप्ते संपले की, सगळं होईल व्यवस्थित. पुढच्या महिन्यात बहुतेक मला प्रमोशनसुद्धा मिळतंय!'

'पण मी म्हणते—' कल्पना अडखळली.

'काय आणखी?' शामकांत कोड्यात पडला होता.

'मी म्हणते, मला मिळाली नोकरी तर करायला काय हरकत आहे? तेवढाच आपल्या संसाराला आधार!'

'तसला आधार मला नकोय कल्पना. तुला काही कमी पडलं तर सांग, मी कुठूनही आणून देईन; पण पुन्हा नोकरी करण्याबद्दल मला विचारू नकोस! नीलू अजून लहान आहे. तिला कोण साभाळणार?'

'नीलूची काही काही काळजी नाही वाटत मला. बढेआजीचा तिला एवढा लळा लागलाय की, सहज दिवसभर राहील ती त्यांच्याकडे!'

'पण मला नकोय तुझी नोकरी. शामकांत जोराने ओरडला. त्या छोट्याशा घरात तणाव वाढला. शामकांताची सहनशक्ती संपली होती. आपल्या सुंदर बायकोवर ती केवढ्यादा खेकसला होता बहुधा आयुष्यात पहिल्यांदाच. शामकांतासारख्या सोशीक, शांत माणसानं एवढं चिडावं? कल्पना रागावून आत स्वयंपाकघरात निघून गेली. पैशाच्या ओढाताणीचे प्रसंग आठवून ती मुसमुसत राहिली. शामकांताशी तिने अबोला धरला!

आपल्या सुंदर बायकोने कोणतीही नोकरी करू नये, असं शामकांताला सारखं वाटत होतं. खेरीज, घरातल्या लक्ष्मीने नोकरी करायची नाही, हा देसाई कुटुंबात चालत आलेला एक अलिखित रिवाज होता.

¤

चाळीत कसली तरी चर्चा रंगली होती. हातवारे होत होते. ताटकळत उभं राहून जो तो गप्पांमध्ये रंग भरत होता. ज्याला त्याला आश्चर्ययुक्त कौतुक वाटत होतं. शेजारी-पाजारी एकमेकांमध्ये कुजबुजत विषय वाढवत होते. कर्णिकांचं बिऱ्हाड खाली होणार होतं, हा विषय सर्वांनाच महत्त्वाचा वाटत होता.

ते कुजबुजणं ऐकून कल्पना बाहेर गॅलरीत आली. कोंडाळं करून इतर बिऱ्हाडातल्या बायका गप्पांमध्ये रंगून गेल्या होत्या. त्यांच्यात बढेआजीसुद्धा होत्याच. शिवाय पलिकडच्या बाजूला राहणाऱ्या कुलकर्णीवहिनी, शिवाय सावेकरांची मालू, धारगळकरांच्या काकू. त्यांच्यात कल्पना जाऊन मिसळली. 'अहो समजलं का? कर्णिकांनी मोठा फ्लॅट घेतलाय म्हणे. एवढी लंबी चौडी जागा आहे. पाच-पाच खोल्यांची. पाणी चोवीस तास!'

'न घ्यायला काय झालंय, काळा पैसा येतोय. करताहेत त्यांच्यावर चैन. नाही का हो कल्पनाताई?' मालू चेहरा उडवीत ओठ गालावर घेत बोलत होती. कल्पनाने होकारार्थी मान फिरवली. खरं म्हणजे ती हे ऐकून गोंधळूनच गेली होती.

'पण त्या कस्टमवालीला अजून इंगा माहीत नाहीय्ये. पडेल एक दिवशी धाड घरावर म्हणजे कळेल मग. आठवेल आईचं दूध. पन्नास पन्नास साड्या वापरतेय आज पण उद्या उलटी वेळ येऊ नये म्हणजे झालं. आम्हाला मेलं काय करायचंय; पण एक वाटतं,' धारगळकरांच्या काकूंना धाप लागली तेव्हा त्या बोलायच्या थांबल्या.

'नशिबानं खाताहेत. आपण कशाला बोला! आपण गेल्या जन्मी पाप केलंय खूप. त्या कर्णिकीनं पुण्य केलं असेल. तिला मिळतंय सुख. आपण कशाला बोला.' कुलकर्णी वहिनी त्राग्याने बोलत होत्या. खरं म्हणजे त्यांना खूप बोलायचं होतं. पण 'आपण कशाला बोला' हे वाक्य त्यांच्या तोंडून फटकन बाहेर पडायचं. एकसारखं. मग त्या वाक्याचा मान ठेवायचा म्हणून त्याना बोलणं आवरल्यासारखं करावं लागे.

'पण कस्टममध्ये एवढा पैसा मिळतो?' कल्पनानं अवाक होऊन विचारलं.

'अहो, काम काय असतं तिकडे दुसरं? दिवसभर नुसतं खा. मग संध्याकाळी खिसे भरून घरी यायचं. त्यानी म्हणे सोन्याची बिस्किटंसुद्धा आणली होती मागे. काय केलं पुढे त्याचं देवास ठाऊक! आमच्या भाच्याला लावायला सांगितलं कस्टममध्ये तर लावला नाहीन. त्यांचे छक्के पंजे उघडयावर येतील ना. त्याला लावल्यावर. चांगला बी. ए. होता. मी म्हटलं, कस्टम नाही तं नाही, गेलं उडत' बढे आजी तावातावाने बोलल्या.

तेवढ्यात मालूने हळूच शूः ऽऽ असा हलकेच इशारा केला. सगळ्या एकदम थबकल्या आणि बोलायच्या थांबल्या. पलीकडून कर्णिकबाई आपला स्थूल देह डोलवीत त्यांच्याकडेच येत होती. एकदम बोलायच्या थांबल्या म्हणून कर्णिकबाईला आपल्याबद्दलच बोलतायत, असा संशय आला असता म्हणून धारगळकरांच्या काकूंनी विषय फिरवला.

'आम्ही नाही बाई कढीत लसूण टाकत फोडणीला. तो लसणाचा वाससुद्धा मेला सहन नाही होत मला !'

'आम्ही तरी कुठे टाकतो. पण चटणीला मात्र चव येते हं. काही म्हणा, पण लसूण म्हणतात पोटाला चागला.'

'काय चाललंय?' ऐसपैस आवाज काढत कणिकबाई पुढे आली.

'आज इकडे कशा वाट चुकलात, सूर्य पश्चिमेला उगवला म्हणायचा.' कुलकर्णी वहिनींनी हेल लांबवत विचारलं.

'सूर्य नाही पश्चिमेला उगवला, तुमचीच दिशा चुकली' कणिकबाई काही तरी बोलायचं म्हणून बोलली, पण तिचं नाक वर झालं.

'हे काय मालू तू इकडे ? मी घरी जाऊन आले तुझ्या.' कणिकबाई म्हणाली. त्यावर मालूनं नुसताच 'अय्याऽ !' असा उद्‌गार काढला.

'तुम्ही राजधानी हलवताय म्हणे.' बढेआजींनी टिप्पणी केली.

'छे हो. राजधानी कसली ? इथली जागा पुरेना. ह्यांना म्हटलं एक ब्लॉक घेऊन टाकू. स्वस्तात मिळाला, घेऊन टाकला ! ' ह्यांचा मित्रच होता तिकडे. तो म्हणाला पैशाची नका काळजी करू. नाही तर मेली कसली चाळ सुटत होती !'

'कधी जाताय ?'

'हे काय सामान आज दुपारीच चाललंय. मुहूर्त करून आले होते हे पुढे जाऊन. आम्ही परवा निघतोय!'

'आलं पाहिजे एकदा तुमचा ब्लॉक बघायला.'

'घ्या. तेच तर सागायला आले होते आणि भलतंच बोलत राहिले. ह्या रविवारी चाळीतल्या सगळ्या बायकांना पार्टीला बोलावलंय. तुम्ही यायचं सकाळपासून सगळ्यांनी. वेगळं घरी यायला नको नं ? कणिकबाईच्या बोलण्यावर सगळ्यांनी माना हलवल्या.

'मदतीला येऊ का ? अगोदर.' बढेआजींनी विचारलं.

'छे हो,खाण्यापिण्याचं कॉंट्रॅक्टच देऊन टाकलंय. कोण तो आवरा सावरा घाई न् गर्दी बघत बसणार. शिवाय ह्यांच्या ओळखीचाच होता कॉन्ट्रॅक्टर. म्हणाला तुम्ही कसलीही काळजी करू नका. म्हणून जमलं.'

'हो का ऽऽऽ ?' कॉंट्रॅक्ट दिल्याचं ऐकून त्या कोंडाळ्याचे चेहरे प्रसरण पावले.

¤

कणिकबाईच्या नव्या कोऱ्या ब्लॉकवर पार्टीला जाऊन आल्यानंतर कल्पनाला खूपच वाईट वाटलं. आम्ही काय नशिबाचं घोडं मारलंय, आम्हाला का मिळू नये तसं ? हे प्रश्नचिन्ह तिला सतावत राहिलं. तिला मनातून एकसारखं वाटत होतं, 'येतील, आपलेही दिवस येतील. आपणही कणिकबाईसारखं दिमाखाने हिंडू–फिरू. आपलंही नशीब उजळेल. पण कधी ? कसं ?

विचार करता करता कल्पना एकदम लहान झाली. तिला शाळेत असतानाचा तो दिवस आठवला. एक दिवस त्यांच्या घरी एक ज्योतिषी आला होता.त्याचा चेहेरासुद्धा तिच्या डोळ्यासमोर आला. त्याची ती नक्षीच्या कडांची तपकिरी टोपी. सावळा धारवाडी चेहेरा धोतर, शर्ट त्याचं मान वर करून बोलणं. रोखून अंदाजाअंदाजाने शब्द फेकणं, सगळं सगळं तिला आठवलं. ज्योतिषी तेव्हा तिची पत्रिका पाहून म्हणाला होता, 'ही मुलगी ज्या घरात पडेल त्या घराची भरभराट होईल. अगदी इतकी ही मुलगी मोटारीशिवाय फिरणार नाही. गडी, नोकर, चाकर, बंगला, काही कमी पडणार नाही तिला !'

ज्योतिष्याचा तो लहानपणीचा प्रसंग आठवल्यानंतर तिच्या डोळ्यांसमोर तिचा बंगला आला. त्यात गडी, नोकरचाकर काम करताना दिसले. त्याच्या कामावर कल्पना देखरेख करीत होती. छानशा मखमली कोचावर बसून शामकांत आरामशीर पेपर वाचत होता. नीलू त्याचा हात धरून म्हणत होती, 'चला बाबा, चला नं, मला मोटारीत बसायचंय.' शामकांत 'जाऊ गं, थाब गं' म्हणत पेपर वाचत होता. शेवटी नीलूने त्याला हाताला धरून उठवलंच. मग तिचा कडकडून मुका घेत शामकात म्हणाला, 'चला, राणीसाहेब आपण फिरून येऊ.' मग कल्पना, नीलू, शामकांत तिघेही मोटारीतून खूप फिरले. हॉटेलात गेले. सिनेमा पाहिला. खूप चैन केली. मग कधी तरी ती मोटार घेऊन कल्पना पूर्वीच्या चाळीत आली. तिकडे तच्या मोटारीजवळ सगळ्याजणी जमा झाल्या. ती मोटार घेऊन ती कणिकबाईकडे गेली. सर्वांना आपल्या बंगल्यावर पार्टी देऊन तिनं खूष केलं. कणिकबाईचा टेंभा उतरला.

बराच वेळ ती स्वप्न रंगवत राहिली. एकटीच सुन्न बसून राहिली.

¤

मोटारीचा हॉर्न जोरात वाजला... हॉर्न पुन्हा पुन्हा वाजला. कल्पना एकदन भानावर आली. हॉर्न खाली रस्त्यावर वाजत होता. ती पटकन गॅलरीत आली. गोळे मोटारमधून वर बघत होता. त्याचा कुणी तरी मित्र स्टीअरिंगवर बसला होता. 'शामकांत आहे का घरी ?' गोळेनं मोटारीतूनच विचारलं.

'नाही, कामाला गेलेत. सुट्टी नाहीय्ये आज.' कल्पना गॅलरीच्या लाकडी कठ्ठ्यावर हात ठेवत म्हणाली. मोटारीचा दरवाजा उघडून गोळे बाहेर आला आणि सरळ चाळीच्या जिन्यात शिरला. कल्पनाला कळेना, गोळेभावजींचं आपल्याकडे काय काम आहे.

जिना धडधड वाजवत गोळे वर आलासुद्धा. आल्या आल्या तो कल्पनाला म्हणाला, 'वहिनी एक महत्त्वाचं काम आहे. जरा आत या.' दोघेही गॅलरीतून घरात गेले.

'वहिनी माझं एक काम कराल का ?'

'काय ?'

'आता माझ्याकडे एक हजार रुपये आहेत. पंधरा दिवसांनी मला ते लागतील. ते जरा तुमच्याकडे ठेवाल का, पंधरा दिवस ?'

'माझ्याकडे ?'

'हो ! सध्या बँकांचापण संप चालू आहे नं. माझ्याकडे ठेवले तर कुठे तरी खर्च होऊन जातील. तुमच्याकडे ठेवा पंधराएक दिवस !'

'पण...'

'नाही, शामकांताची काही काळजी करू नका. तो काही बोलायचा नाही; पण त्यापेक्षा असं करा नं, ह्या हजार रुपयांबद्दल त्याला काही बोलूच नका. फक्त तुमच्याकडे ठेवून द्या. प्लीज !'

'पण—' कल्पना पुढे बोलणार, तेवढ्यात खालून मोटारीचा हॉर्न जोरजोरात वाजू लागला. गोळेचा मित्र गोळेला बोलवत होता, मग घाई करून गोळे म्हणाला—

'वहिनी, आम्ही जरा घाईत आहोत. एका महत्त्वाच्या कामाला जातोय. जरा तेवढे ठेवा !' असं म्हणत म्हणतच गोळे बाहेर पडला. धडधड उतरून मोटारीत गेला. कल्पनाकडे पाठ करून मोटर पेट्रोलची फुंकर टाकून निघून गेली. कल्पनाला काही तरी बोलायचं होतं.

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 )

काही तरी सांगायचं होतं. ते तिच्या गुलाबी ओठात तसंच राहिलं.

कार निघून गेल्यानंतर कल्पना भानावर आली. तिच्या हातात शंभर, पन्नास, वीस, दहाच्या नोटांची जाडजूड घडी होती. तिच्या छातीत धडकीच भरली. आपण पैसे मोजून घेतलेले नाहीत.

तिने धडधडत्या छातीने पैसे मोजायला सुरुवात केली दार लोटून घेतलं. शंभर, दोनशे, तीनशे, चारशे...तिचा श्वास वाढत होता. जेव्हा हजार मोजून झाले. तेव्हा तिला दिसलं की, आपल्या दुसऱ्या हातात आणखी एक नोट उरलीय शंभराची.

गोळे शंभर रुपये जास्त देऊन गेला होता. कदाचित घाईगर्दीत त्यानंही नोटा मोजलेल्या नसाव्यात.

कल्पनाने पुन्हा पुन्हा पैसे मोजले. हजार अधिक शंभर बरोबर अकराशे. गणिताचं उत्तर तेच तेच येत होतं. तिनं त्या पैशाची चवड तिच्या विश्वासाच्या डब्यात ठेवून दिली बराच वेळानंतर तिला बाहेर उन्हात खेळणाऱ्या नीलूचा आवाज ऐकू आला.

इतका वेळ ती हरवली होती.

¤

तीन तारखेची सकाळ. शामकांत नेहमीसारखा हसतमुखाने पोस्टात आला होता. मनावर कितीही ताण पडला, मन:स्थिती कितीही बिघडली किंवा कोणताही मूड असला, तरी सर्वांना सारखं असं एकच स्मितहास्य ठेवण्याची कला शामकांताला अवगत होती.

कोणतीही घटना, कोणताही प्रसंग ते हास्य गढूळ करू शकत नसे. तीन तारखेचं तेच स्मित हास्य घेऊन शामकांत पोस्टात आला होता. कदाचित दोनच दिवसांपूर्वी त्याचा पगार झाला होता म्हणून असेल; त्याचं चित्तही प्रसन्नच होतं.

नेहमी सारखेच आठ वाजले. ते न राहवून पोस्टाच्या भिंतीवरचं ते पेन्शनर घड्याळ आठ वेळा ठणठणलं. एव्हाना पोस्टात गर्दीही जमा झाली होती. आत–बाहेर सगळीकडे. शामकांत आपल्या खुर्चीत येऊन बसला आणि आपल्या समोरच्या काउंटरवरची खिडकी त्याने उघडली. बाहेर मनीऑर्डरचे फॉर्म घेऊन काहीजण रांगेत ताटकळत उभे होते. धंदेवाल्यांची बिलं वसूल झाली होती. ते सारेजण गावाकडे मनीऑर्डर करायला रांगेत उभे होते. बिल्डिंग बांधणाऱ्या कामाठ्यापासून, दूध विकणाऱ्या भय्यापासून, कचरेवाल्या खाकी ड्रेसातल्या मुडासेवाल्यापासून, सफेद शर्टातल्या गुळगुळीत दाढीच्या ऑफिसर कारकुनापर्यंत सगळे एकाच रांगेत उभे होते.

तो सबंध दिवस खिडकीवर अशीच गर्दी येत राहिली. धाड धाड शिक्के मारून शामकांत दमून गेला. पैशांचा ढबा तर वसंत ऋतूत झाडानं बहरावं तसा बहरला होता. शामकांत नेहमीसारखा हिशोब करत राहिला. पैसे मोजत राहिला. बेरजा घेत राहिला; पण आज हिशोब जुळत नव्हता. डोकं गरगरून जात होतं. बाकीचे सहकारी मदतीला आले; पण कसे कोणास ठाऊक, आज शामकांतला एकशे दहा रुपये शॉर्ट लागत होते. शामकांत सकाळपासूनचे कामकाज आठवत होता. अनेक जण आले, अनेक जण गेले. एकशेदहा रुपये कुणी कमी दिले की, एकशेदहा रुपये कुणाला जास्त गेले ? शामकांतला आठवणी दगा देत होत्या. एकशेदहाचा कसलाच कयास लागत नव्हता. त्याच्या पोस्टातल्या एवढ्या वर्षांच्या नोकरीत असं कधीही झालं नव्हतं. एकशेदहा रुपये खिशातून काढून हिशोबात भरणं भाग होतं !

पण खिशातून काढायला खिशात होतं काय ?

¤

ती तीन तारीख शामकांताला फारच अस्वस्थतेची गेली. त्याच दिवशी सध्याकाळी नीलूला ताप भरला होता. डॉक्टरानी लिहून दिलेल्या गोळ्या–औषधं तर आणायला हवीच होती. डोक्यातून तो एकशे दहाचा विषय गेलेला नव्हता. आजारी नीलूचे हट्ट पुरवणं हे तर भागच होतं. श्यामकांताच्या डोक्यात विचार आला, असंच उठावं आणि गोळेकडून उसने पैसे घ्यावे; पण हा विचार त्यानं पूर्वीसारखाच झटकून टाकला. 'गोळेकडून पैसे घेणार नाही' असं वचन त्यानं कल्पनाला दिलं होतं, त्याची आठवण झाली.

दिवेलागणीची वेळ होऊन गेली होती. तो तसाच बाहेर पडला. बोटातील अंगठी आणि हातातलं घड्याळ कोपऱ्यावरच्या मारवाडी जवाहिऱ्याकडे त्यानं गहाण ठेवलं. त्यानं दिलेल्या साठ रुपयांतून मग नीलूची औषधं आणता आली तिचे हट्ट पुरविता आले. डॉक्टरांनाही थोडे पैसे देता आले. नीलू झोपल्यावर श्यामकांत आवेगानं जाऊन खाटेवर पडून राहिला. त्याचं डोकं अतिशय ठणकत होतं.

शामकांतला जेवायची इच्छा नव्हती. कल्पनालाही जेवण गेलं नाही. अन्न दुसऱ्या दिवशी शिळंपाकं होऊन गेलं. त्याचाही चेहरा उतरला.

रात्री देवाजवळ समई तेवढी तेवत होती. सगळं आवरून कल्पना शामकांताच्या शेजारी येऊन झोपली. त्याच्या कपाळाला हात लावून पाहिला. शामकांताचं अंग गरम झालं होतं. कल्पनाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. अश्रूंचा ओलावा हाताला जाणवताच शामकांतला जाग आली. आपल्या लाडक्या देखण्या गुणी बायकोला मिठीत घेऊन तो सगळं विसरायचा प्रयत्न करू लागला. कल्पनाच्या डोळ्यांतून अश्रूंची धार वाहात राहिली.

शामकांताच्या हातात घड्याळ नाही, बोटात अंगठी नाही, हे पाहून कल्पनाचं लक्ष नुकत्याच नवीन आणलेल्या नीलूच्या खोट्या घड्याळाकडे गेलं. नीलूच्या हातात ते सदैव थांबलेलं चिमुकलं घड्याळ होतं. तिच्या त्या आजारपणात तिला केवढा विरंगुळा होता ! त्या घड्याळाकडे पाहून कल्पनाच्या डोळ्यासमोर ते शामकांताचं झरझर पळणारं घड्याळ आलं. ती बदामाच्या छापाची अंगठी आली. श्यामकांतचं बोट रिकामं होतं. मनगट रिकामं होतं.

कल्पना तरातरा त्या तिच्या विश्वासाच्या डब्याकडे गेली. अकराशेच्या चवडीतून तिनं शंभराची नोट बाहेर ओढली आणि ऑफिसला निघालेल्या शामकांतला खालच्या मानेनं पुढं करीत ती म्हणाली, 'हे असू देत जवळ.'

'तुझ्याकडे कुठून आले हे ?' श्यामकांतनं निर्विकारपणे विचारल.

'साठवले होते. कधी तरी उपयोगाला पडतील म्हणून बाजूला ठेवले होते कधीतरी.' कल्पना म्हणाली.

त्या दिवशी ऑफिसला जाणाऱ्या त्या पाठमोऱ्या भोळ्या शामकांताच्या मूर्तीकडे पाहून कल्पनाच्या डोळ्यासमोर ती कर्णिकबाई आली आणि मग देवाजवळ जाऊन ती मोठ्याने ओरडून म्हणाली, 'का, का असा अंत बघतोस आमचा ? का ?'

¤ ( क्रमशः- )